# परशुरामीय

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ॥
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥

वर्ष ४० ] जानेवारी १९५६ [ अंक २

## संपादकीय समालोचन

**केसरीचा अमृतमहोत्सव**—नव्या वर्षाच्या १ तारखेस केसरी-मराठा या पत्रांनीं ७६ व्या वर्षांत पदार्पण केलें त्या निमित्तानें त्या संस्थेनें अमृतमहोत्सव साजरा केला. देशभर पसरलेल्या अनेक संस्था, वृत्तपत्रें व पुढारी यांनीं केसरीचें अभीष्टचिंतन केलें. आम्ही सरपरशुरामभाऊ महाविद्यालयातर्फे केसरी-मराठा या वृत्तपत्रांचें अभिनंदन करून त्यांचा उत्तरोत्तर वाढता उत्कर्ष होवो अशी सदिच्छा प्रकट करतों. आपल्या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून केसरीसंस्थेशीं निकटचा संबंध आहे. जून १९१८ रोजीं महाविद्यालयाला बी. ए. वर्ग उघडण्याची परवानगी एका अटीवर मुंबईविद्यापीठ चौकशी समितीनें देण्याचें ठरविलें. ती ही कीं पुणेंशहराचे बाहेर संस्थेनें प्रशस्त जागा मिळवून त्यावर इमारत बांधावी. अशी जागा मिळणें दुरापास्तच होतें. परंतु लोकमान्य टिळक यांचे आपुलकीच्या मध्यस्थीनें श्री. जगन्नाथमहाराज पंडीत यांचेकडून नाममात्र भाड्यानें हल्लींची जागा व प्रशस्त पटांगण विवक्षित मुदतीमध्यें मिळून मे १९१८ मध्यें खरेदीखतहि नोंदलें गेलें, व आपलें कॉलेज डिग्री कॉलेज या प्रतिष्ठेला पावलें. याला कारण टिळकांची सक्रिय सहानुभूति.

केसरीचे माजी सरसंचालक व मुख्य आधारस्तंभ कै. तात्यासाहेब केळकर यांचाहि आपले महाविद्यालयावर फार लोभ होता. १९१९ सालीं श्री. केळकर संमेलनाचे अध्यक्ष असतांना, त्या-

वेळेला लोकमान्य टिळक नुकतेंच इंग्लंडला जाऊन परत आले होते. त्यांनाहि श्री. केळकर यांनीं आपले बरोबर आणून त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना चार उपदेशाचे शब्द ऐकविले. कितीतरी समारंभांचे, वादविवाद सभांचे श्री. केळकर अध्यक्ष किंवा मुख्य वक्ते असत. पुढें तर त्यांनीं आपले महाविद्यालयातर्फें पीच्. डी. चे मार्गदर्शक म्हणूनहि आपलें नांव प्राध्यापकांचे यादींत समाविष्ट करण्याचें मान्य केलें. शि. प्र. मंडळींच्या नियंत्रकमंडळाचे बरींच वर्षे ते अध्यक्ष होते व त्या मंडळींच्या सर्व संस्थांचे कार्यांमध्यें आस्थेनें लक्ष घालीत. म. म. पोतदार यांनीं १९३० सालीं महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन ही संस्था स्थापन केली, तेव्हां त्याचाहि केसरीनें पाठपुरावा केला. व प्रसंगानुसार महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल प्रशंसोद्गारच काढले. लो टिळक व श्री. केळकर यांचे निर्याणानंतरहि जेव्हां जेव्हां महाविद्यालयाचे कार्याचा व कर्तृत्ववान् व्यक्तींचा गुणगौरव करण्याचा प्रसंग आला, तेव्हां तेव्हां केसरीनें पूर्वींचेंच सहानुभूतीचें धोरण चालू ठेवलें आहे, अशा-रीतीनें स. प. महाविद्यालय केसरीचे ऋणानुबंधि आहे. या अमृतमहोत्सव-शुभप्रसंगीं आम्ही थोडा कालावधि झाला असला तरी कर्तव्यबुद्धीनें केसरी-मराठा संस्थेचें अभीष्ट चिंतितों.

**इंग्रजीचें भवितव्यः**—आपल्या विद्यापीठानें पहिल्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमामध्यें मराठी माध्यमाचा स्वीकार केलेलाच आहे, व पदवीपरीक्षेपर्यंत तें माध्यम नियुक्त करणें आतां अटळ आहे. माध्यमाचा प्रश्न हा सर्वस्वीं सरकारी धोरणाचा प्रश्न आहे, व प्रादेशिक व मध्यवर्ति शासनसंस्थांचे धोरणाला अनुसरूनच विद्यापीठांनीं तो प्रश्न हाताळावयाचा आहे. त्याच दृष्टीनें पुणें विद्यापीठ पुढें पाऊल टाकीत आहे. इंग्रजी ही अधिष्ठात्री देवता म्हणून आतां पंचायतनामध्यें मिरवूं शकणार नाहीं. परंतु इतर परकीय भाषांपेक्षां आपणांस ती अधिक जवळची. मुंबई, कलकत्ता व मद्रास विद्यापीठांचे स्थापनेनंतर जवळ जवळ १०० वर्षें माध्यमिक व उच्च शिक्षणामध्यें इंग्रजींचेंच माध्यम असल्यामुळें त्या भाषेशीं आपला घनिष्ठ संबंध निर्माण झाला आहे. हा संबंध लक्षांत घेतां या स्थित्यंतराचे काळामध्यें इंग्रजीविषयीं जास्त औत्सुक्यानें व कळकळीनें चर्चा व्हावी हें उचित होय. या चर्चेमध्यें इंग्रजीचें कायमचें उच्चाटन करण्याचे भाषेऐवजीं, इंग्रजीला योग्य तें स्थान शिक्षणक्रमामध्यें कसें मिळेल याचीच विवंचना प्रमुख विद्यापीठांचे कुलगुरु, उपकुलगुरु, तसेंच शिक्षणमंत्री, शिक्षणतज्ज्ञ व भाषापंडित यांचे वक्तव्यांतून प्रतिबिंबित झालेली दिसेल. या दृष्टीनें श्री. रामस्वामी अय्यर, श्री. मुनशी यांचीं दीक्षांत भाषणें विशेष महत्त्वाचीं आहेत. अलीकडे राजभाषा-समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब खेर यांनीं मद्रास येथें ( १२ जाने. ) केलेल्या भाषणामध्येंहि हेंच आवर्जून सांगितलें आहे कीं इंग्रजी भाषेची हेळसांड करून चालणार नाहीं. केवळ इंग्रजीच्या द्वारेंच मिळणारें ज्ञान भारताची तांत्रिक प्रगति व आर्थिक उन्नति होण्यास व ज्ञानाची उच्च पातळी गांठण्यास कारणीभूत होईल. शास्त्रें व वाङ्मयशाखा यांमध्यें प्राविण्य मिळविणारे पदवीधर निर्माण करण्याचें विवक्षित हेतूनें इंग्रजीचा वापर बरींच वर्षें करावाच लागेल.

कटक येथें भरलेल्या सहाव्या इंग्रजीशिक्षकपरिषदेनें याच शिष्टसंमत मतांचा पुनरुच्चार केला आहे. परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य दोरायस्वामी ( उस्मानिया विद्यापीठ ) हे भारतीय विद्यापीठ प्रतिनिधींच्या चीनच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांचा अनुभव उद्बोधक आहे. चीनसारख्या नवराष्ट्रनिर्मितीच्या महान् खटपटींत असलेल्या राष्ट्रामध्येंहि इंग्रजी ही एक आंतरराष्ट्रीय महत्त्वाची उपयुक्त भाषा आहे हें जाणून चिनी विद्यापीठामध्यें

इंग्रजीचा ५ वर्षे पर्यंत, आंतरराष्ट्रीय राजकारणाला लागणारें एक प्रभावी हत्यार व उपयुक्त साधन म्हणून, कसोशीनें अभ्यास केला जातो. या दृष्टीनें प्राचार्य दोरायस्वामी यांनीं अशी सूचना केली कीं इंग्रजी भाषा पदवीपरीक्षेच्या (बी. ए; बी. कॉम व बी. एस्सी) अभ्यासक्रमामध्यें एक आवश्यक विषय म्हणून ठेवावीच, परंतु आतांपर्यंत वाङ्मयीन इतिहास व टीका यांवर दिलेला भर कमी करून, भाषाविषयक ज्ञानावर, म्हणजे भाषाशैली, शब्दसंग्रह व इंग्रजीचे आधुनिक वाक्प्रचार यांवर जास्त भर द्यावा. याकरतां नवीन इंग्रजी शिक्षक हे केवळ वाङ्मयावर भर असलेली एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालेले असून भागणार नाहीं. त्यांना इंग्रजीचें भाषाविषयक सखोल ज्ञान होण्याकरतां परिषदेनें रिफ्रेशर कोर्स चालवावा व त्याकरतां तज्ज्ञांचें व विद्यापीठांचें साहाय्य घ्यावें. तसेंच पीच् डी. करतां इंग्रजीचे अभ्यासकांना संशोधनसाहित्य उपलब्ध करून देण्याकरतां व युरोपीय भाषांचें आवश्यक ज्ञान सुलभ करून देण्याकरतां मध्यवर्ति शिक्षण-खात्यानें एक मध्यवर्ति अभ्यास केंद्र स्थापन करावें, व परिषदेनें एक संशोधनपत्रिका चालवावी, इत्यादि बहुमोल सूचना ठरावांचे रूपानें सर्वसंमत झाल्या.

अशा रीतीनें केवळ इंग्रजीच्या दुराग्रहानें, अंधप्रेमानें अथवा वृथा अभिनिवेशानें प्रेरित न होतां, कटक येथील परिषदेनें आधुनिक उच्च शिक्षणक्रमामध्यें इंग्रजी भाषेचें उत्तम, बिनचूक, अद्यावत् ज्ञान विद्यार्थ्यांस कसें देतां येईल याचा प्रामुख्यानें विचार केला. व्यापार, कायदा, शास्त्रें, वैद्यक, स्थापत्य व वाङ्मय या शाखांमध्यें पदवी घेणाऱ्या नवीन पिढीला भारताचे आदर्श नागरिक होण्यास व जागतिक प्रगतिशील ज्ञानविज्ञान ग्रहण करण्यास इंग्रजी भाषेचें ज्ञान कसें उपकारक ठरेल, याच वास्तववादी दृष्टिकोनांतून परिषदेनें चर्चा केली, निष्कर्ष काढले व निर्णयहि घेतले. या इंग्रजी शिक्षकांचे परिषदेला अधिकृत घोषणा करण्याचें सामर्थ्य प्राप्त होवो, व मध्यवर्ति शिक्षणखातें व आंतरविद्यापीठ संस्था यांच्या सहानुभूतिपूर्वक सहकार्यानें, इंग्रजीचें उच्च शिक्षणा-मधील स्थान भारतीय विद्यापीठांचे अभ्यासक्रमांमध्यें एकदांचें निश्चित होवो, अशी सदिच्छा व्यक्त करतों.

**क्रीडांगणावरील विजय:—**आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत हुतुतु, बास्केट बॉल व कुस्ती ह्यांमध्यें सांघिक नैपुण्य मिळविल्याबद्दल त्या संघांतील खेळाडूंचें आम्ही अभिनंदन करतों. आंतरविद्यापीठ सामन्यासाठीं क्रिकेट व फुटबॉलसाठीं पुणें विद्यापीठ संघांत निवड झालेल्या खेळाडूंचेंहि अभिनंदन करतों. कुस्तीगीर श्री. दराडे ह्यांनीं अमृतसरला भरलेल्या आंतरविद्यापीठ कुस्तीच्या सामन्यांत १५० च्या वरच्या वजनांत व्यक्तिगत नैपुण्य मिळविलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करून, आंतरराष्ट्रीय सामन्यांत त्यांना आपलें कौशल्य दाखविण्याची संधि लवकरच मिळो असें इच्छितों.

विद्यार्थिनींच्या आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत मोठ्या चुरशीनें सांघिक नैपुण्य मिळ-विल्याबद्दल आम्ही सर्व विद्यार्थिनी खेळाडूंचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. विशेषतः थ्रोबॉल व रिंग टेनिस या सामन्यांतील पहिला क्रमांक मिळविणारे संघ, थाळीफेकीमध्यें उच्चांक निर्माण करणाऱ्या कु. सिन्धु सोमण, व भालाफेकींत पहिला क्रमांक मिळविणाऱ्या कु. शकुंतला गद्रे यांचें विशेष अभिनंदन करावयास हवें. इतर बक्षिसें मिळविणाऱ्या सर्व विजयी विद्यार्थी व विद्यार्थिनींचें अभिनंदन करून आम्ही सर्व विजयी खेळाडूंना सुयश चिंतितों.

**श्रमदान शिबीर—** गेल्या दिवाळीच्या सुटीमध्यें पंधरा दिवस विद्यार्थ्यांचें सासवड-

जवळील कोढीत येथें व विद्यार्थिनींचें शिवरी येथें, अशी दोन श्रमदान शिबिरें भरलीं होतीं. व त्यामध्यें आपल्या महाविद्यालयाचे २२ विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी यांनीं भाग घेतला होता. रस्ता-दुरुस्ती, ग्रामसफाई हीं श्रमदानाचीं कामें त्यांनीं केलींच, परंतु त्याबरोबरच त्या खेडयांची आर्थिक व सामाजिक पहाणी करण्यांत आली. विद्यार्थिनींच्या शिबिरांमध्यें सांस्कृतिक कार्यक्रमावर भर होता. दोन्ही शिबिरांमध्यें आपल्या स्वयंसेवक य स्वयंसेविकांनीं खेडुतजीवनाशीं समरस होऊन, त्यांच्या अडीअडचणी व सुखदुःखें अभ्यासिलीं व उत्साहानें श्रमदान केलें. त्यामुळें त्यांना खचित नवीन सामाजिक दृष्टि प्राप्त झाली; एवढेंच नव्हें तर शिस्त-पालन व नेतृत्वशिक्षण यांचेहि धडे त्यांना अनायासें मिळाले, लोकजागृति करण्याचें तंत्र आत्मसात् करण्याची संधि मिळाली, व तिचा त्यांनीं चांगला फायदा घेऊन भारताच्या ग्रामविकास योजनेला आपल्या परीनें हातभार लावला हें त्यांस भूषणावह आहे. या समाजसेवेबद्दल आम्ही या स्वयंसेवक बंधुभगिनींचें अभिनंदन करतों. व पुढें मे महिन्यांत होणाऱ्या श्रमदान शिबिरामध्यें यांहून मोठ्या संख्येनें विद्यार्थी उपस्थित राहतील कशी आशा प्रकट करतों. कोढीत शिबिराचे प्रमुख श्री. द. व्यं. दाणी यांचें व शिवरीशिबिराचें व्हिजिटर श्री. दि. के. देशपांडे यांचें कुशल मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही अभिनंदन करतों.

**गट स्नेहसंमेलनें**—गेल्या वर्षापासून प्रत्येक वर्गाचें निराळें संमेलन भरविण्याची प्रथा सुरू झाली. त्याप्रमाणें या वर्षीहि डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यामध्यें वर्गसंमेलनें झालीं. वाङ्मय व शास्त्रशाखांच्या प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाचे वर्गांची अशीं सहा गटसंमेलनें साजरीं झालीं. त्यामध्यें नाटकें, विविध गुणदर्शन व भोजनसमारंभ हे विशेष महत्त्वाचे कार्यक्रम होते. सर्व कार्यक्रमांची आखणी व संपादणी त्या त्या वर्गाचे विद्यार्थ्यांनींच केली. प्राध्यापक हे नाममात्रच केवळ मार्गदर्शनापुरते होते व विद्यार्थ्यांनीं सर्व कार्यक्रम जबाबदारी ओळखून, अनुचित प्रसंग होऊं न देण्याची सावधानता ठेवून पार पाडले हें त्यांस भूषणावह आहे.

गटांनीं संमेलनें साजरी करण्यांत मुख्य हेतु हा कीं कार्यक्रम आटोपशीर व्हावे, निरनिराळ्या कलावंतांना आपलें कौशल्य दाखविण्यास भरपूर वाव मिळावा, व एकाच बृहत् संमेलनाचे समारंभांतील अपरिहार्य गोंधळ, बेशिस्त व गैरवर्तन यांना आळा बसावा. तो हेतु सफल झाला आहे यांत शंका नाहीं. व्यवस्थित रीतीनें पार पडलेल्या या वर्षीच्या गटसंमेलनावरून असाच निष्कर्ष निघतो.

या संमेलनाचा दुसरा उल्लेखनीय विशेष म्हणजे गायन, वादन, नृत्य आदि सर्व कार्यक्रम बाहेरचे कलावंतांना निमंत्रणें देण्याची पारंपरिक प्रथा मोडून, त्या त्या वर्गांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनीच पार पाडले, व आपल्या अंगचें नृत्यकौशल्य, गायनवादनपटुता इत्यादि कलागुण प्रकट केले. या तरुण कलावंतांपैकीं ज्यांचेमध्यें गुणप्रकर्ष आढळला अशांची निवड करून, त्यांचें कलागुणांचें विकसनाकरतां मार्गदर्शन करण्याचें आपल्या महाविद्यालयाचें कलामंडळ हातीं घेईल अशी आशा आहे.

**दिल्लीचा युवक महोत्सव**:—या वर्षी प्रा. भुपटकर यांचे नेतृत्वाखालीं आपल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा संघ युवक महोत्सवामध्यें भाग घेण्याकरतां दिल्लीस गेला होता. त्यांपैकीं सतारीमध्यें प्राविण्य दाखविल्याबद्दल श्री. कृ. त्रिं प्रतिनिधि यांना ३ रें व चित्रकलेमध्यें श्री. प्र. वि. दिवाकर यांना २ रें नैपुण्यपदक मिळालें, याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों व कला-



**श्री. प्र. वि. दिवाकर** ज्यू. बा. ए.
यांस दिल्लीच्या युवकमहोत्सवांत
चित्रकलेंत दुसरें पारितोषिक मिळालें.



**श्री. व. य. घारपुरे**, बी. एस्सी.
यांनीं जादूगार व नकलाकार
म्हणून मुंबईच्या राज्यपालांचें
प्रशस्तिपत्र मिळविलें.



**श्री. कृ. त्रिं. प्रतिनिधि** बी. एस्सी. (ऑनर्स) वर्ग
यांस आंतरविद्यापीठ युवकमहोत्सवामध्यें
सतारवादनांत तिसरें बक्षीस मिळालें.



**शिवरी श्रमदानशिबिरांत भाग घेणाऱ्या विद्यार्थिनी**



**कोडीत येथील श्रमदानशिबिरांत
भाग घेणारे विद्यार्थी**





**श्री. प्र. ता. कारंडे** एफ्. वाय. आर्ट्स ( बी )
यांस अखिल भारतीय नेमबाजीच्या स्पर्धेत
दुसरें पारितोषिक मिळालें.

**श्री. प्रभाकर दराडे** एफ्. वाय. आर्ट्स ( बी )
यांनीं अमृतसर येथील आंतरविद्यापीठ
हेवीवेट कुस्तीमध्यें नैपुण्यपदक मिळविलें.





**कु. सिंधू सोमण**
यांनी गोळाफेकीच्या स्पर्धेत २९′–२·५″
चा उच्चांक गांठला.

**कु. शकुंतला गद्रे**
यांनीं भालाफेकीच्या चढाओढींत
पहिला क्रमांक मिळविला.

मंडळाच्या मार्गदर्शनाखालीं तयार होऊन बहुसंख्य विद्यार्थी पुढील युवक-महोत्सवामध्यें प्राविण्य-पदकें मिळवितील अशी आशा करतों. तसेंच मुंबई राज्यक्रीडामहोत्सवास पाठविलेल्या आपल्या विद्यार्थिनी नृत्यसंघानें लोकनृत्याबद्दल पारितोषिक मिळविलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करतों. या सर्व नाट्य, गायन, नृत्यकुशल कलावंतांचें कलात्मक गुण जास्त प्रकर्षानें वाढीस लागोत असें इच्छितों.

**पोहण्याचा तलाव**—आक्टोबर १९५४ मध्यें तलावाची योजना निश्चित होऊन खोदकामास प्रारंभ श्रमदानानें झाला. त्यामध्यें जवळ जवळ १५० विद्यार्थी कांहीं प्राध्यापकांचे समवेत दीड महिना श्रमदान करीत होते. पुढें बांधणीला सुरुवात होऊन तें काम आतां पूर्ण झालें आहे. स्नानगृहें, सूर मारण्याची जागा, वगैरे बांधकाम चालूं असून सर्व सोईंनीं सुसज्ज अशा या तलावाचें उद्घाटन लवकरच होईल अशी अपेक्षा आहे. पोहोण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रमाणानुसार तलावाची लांबी ५० मीटर व रुंदी १२ मीटर ठेवली आहे. महाविद्यालयाचे सर्व आजी विद्यार्थ्यांना पोहोण्याच्या वर्गणींत सवलत देण्यांत येईल व विद्यार्थिनींना पोहोण्याकरतां निराळी वेळ व व्यवस्था निश्चित करण्यांत येईल. या तलावाचे कामीं भारत सरकारनें तीस हजार रुपये देणगीदाखल दिले असून, पांच हजारांच्या इतर देणग्या मिळाल्या आहेत. एकंदर खर्च ९० हजारांचे घरांत जाईल असा अंदाज आहे. या तलावानें विद्यार्थ्यांच्या कायम स्वरूपाच्या सुखसोईंमध्यें एक महत्त्वाची भर पडणार असून, पोहोण्याच्या स्पर्धेसाठीं सरावाकरतांहि मोठीच सोय झाली आहे. तिचा योग्य फायदा घेऊन आपले वितरणपटु विद्यार्थी पुढील आंतर-महाविद्यालयीन व इतर प्रांतिक व भारतीय स्पर्धांत आपलें कौशल्य दाखवून, आपलें व संस्थेचें नांव उज्ज्वल करतील, व आदर्श तलाव बांधण्याचें धाडस करून व मोठी आर्थिक झीज सोसून जलवितरणाला प्रोत्साहन दिल्याबद्दल संस्थेचे उतराई होतील अशी आशा प्रकट करतों.

**माजी विद्यार्थ्यांचें सुयश** :—माजी जिमखाना आर्गनायझर व पी. टी. डायरेक्टर **श्री. झंवर** ह्यांची मुंबई राज्यातर्फे मैदानी खेळांच्या कोचिंगचें विशेष शिक्षण घेण्यासाठीं निवड होऊन ते मद्रासला रवाना झाले. आपल्या कॉलेजचे नामवंत क्रिकेटपटु श्री. बापू नाडकर्णी, यांची या वर्षीं दिल्लीला झालेल्या कसोटीच्या सामन्याकरतां निवड झाली. **श्री. व. य. घारपुरे** बी एससी. ( बी. ई. शेवटचें वर्ष ) हे दोन वर्षें आपले संस्थेमध्यें फिजिक्सचे डेमॉन्स्ट्रेटर होते. त्यांनीं छंद म्हणून निरनिराळ्या देशांचे पत्ते जमविण्यास व पत्त्यांच्या जादूचे व इतर जादूचे प्रयोग करण्यास सुरुवात केली. पुढें गणिताचे चमत्कृतिजनक तोंडी आकडेमोडीचे प्रयोग व निरनिराळ्या क्षेत्रांत उच्चपद पावलेल्या व्यक्तींच्या हुबेहूब नकला करण्यास आरंभ केला. आतांपर्यंत त्यांनीं पत्त्यांच्या जोडांचे ३५० नमुने गोळा केले आहेत व शंभरावर पत्त्यांच्या जादूचे प्रकार मोठ्या हातचलाखीनें करून दाखवितात. या सर्व करमणुकीच्या छंदामध्यें त्यांनीं इतकें प्राविण्य संपादन केलें कीं निरनिराळ्या संस्था व महाविद्यालयें यांचेकडून त्यांना प्रयोगाचीं निमंत्रणें येऊं लागलीं. अलीकडे टाइम्स ऑफ इंडिया स्पोर्ट्स क्लबचे व मुंबईचे राज्यपाल यांचेंहि निमंत्रण त्यांस आलें होतें व डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनीं त्यांचे कौशल्याची तारीफ केली. मुंबईचे इंग्रजी वृत्तपत्रांतूनहि त्यांचेविषयीं गौरवपर लेख आलेले आहेत. **श्री. गो. का. चित्राव** हे आपल्या महाविद्यालयांतून पदवी घेऊन सध्यां तळेगांवच्या पैसाफंड कारखान्याचे ऑफिसव्यवस्थापक आहेत; शिवाय मावळ तालुक्याच्या होमगार्ड युनिटचे ते मुख्याधिकारी आहेत. त्यांनीं अलीकडे स्वाक्षरीसंग्रह या नांवाचें

पुस्तक प्रसिद्ध केलें आहे व तें पुस्तक राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेन्द्रप्रसाद यांस अर्पण केलें आहे. त्या पुस्तकावर डॉ. राधाकृष्णन् श्री. मावळंकर, श्री. मोरारजी देसाई व श्री. हिरे यांचे, तसेच प्रमुख वर्तमानपत्रांचे गौरवपर अभिप्राय आले आहेत. प्रसिद्ध व्यक्तींच्या स्वाक्षरी व फोटो, त्याबरोबर त्या व्यक्तीचे प्रकर्षानें दिसणारे गुण, तसेच स्वाक्षरी घेतांना येणारे विविध अनुभव व सुचणारे विचार, यांचें आकर्षक संकलन केलें असल्यामुळें, व तें पुस्तकरूपानें प्रसिद्धिल्यामुळें श्री. चित्राव यांनीं स्वाक्षरी जमविण्याचा छंद असणाऱ्या तरुणांना मार्गदर्शन केलें आहे.

डॉ. बी. चैतन्यदेव हे मद्रास युनिव्हर्सिटीची इंटरसायन्स परीक्षा पास झाल्यावर संगीत-कलेच्या उपजत आवडीमुळें प्रथम शांतिनिकेतनला जाऊन नंतर पुण्यास आले, व डेक्कन कॉलेज संशोधन संस्थेमध्यें प्रा. शंकरन् यांचे मार्गदर्शनाखालीं फोनेटिक्स प्रयोगशाळेंत तंबोऱ्याचे नादावर संशोधन करूं लागले. ते कांहीं काळ आपल्या कॉलेजमध्यें बी. एससी च्या वर्गांत होते. त्यांचें संगीत शिक्षण श्री. विनायकबुवा पटवर्धन यांचेकडे चालूंच होतें. शेवटीं तंबोऱ्याच्या 'सा' या आधार षड्जाचें भौतिक, मानसशास्त्रीय व तात्त्विक पृथक्करण व संशोधन करून त्यांनीं तंबोऱ्याचे नादाची 'चित्राकृति' हा प्रबंध लिहिला व त्याबद्दल त्यांना डॉक्टरेट मिळाली.

या सर्व माजी विद्यार्थ्यांचें अभिनंदन करून आम्ही त्यांचे पुढील व्यवसायांत सुयश चिंतितों.

**प्राध्यापकवर्ग :**—प्रा. हुल्याळकर यांनीं नागपूर येथें भरलेल्या तत्त्वज्ञानपरिषदेमध्यें Should the State be Secular या परिसंवादाचा उपन्यास केला. प्रा. डॉ परांजपे, आग्रा येथें भरलेल्या सायन्स कॉंग्रेसला प्रतिनिधी म्हणून गेले होते. प्रा. मंगळूरकर व प्रा. गायधनी हे अन्नमलायनगर येथें नाताळांत भरलेल्या प्राच्यविद्यापरिषदेला गेले होते. प्रा. मंगळूरकर यांनीं 'भारतीय संगीतामधील रसविचार' या विषयावर निबंध वाचला. प्रा. काळे यांना बेळगांव येथें तीन महिन्यांच्या लष्करी शिक्षणानंतर नुकतेंच एन्. सी. सी. कमिशन मिळून लेफ्टनंटचा हुद्दा मिळाला. प्रा. रानडे कटक येथें भरलेल्या अखिल भारतीय विद्यापीठांतील इंग्रजी शिक्षकांचे परिषदेला प्रतिनिधी म्हणून हजर होते. प्रा. भुपटकरांनीं दिल्लीच्या युवकमहोत्सवास कॉलेज-युवकांच्या विद्यापीठानें पाठविलेल्या संघाचें नेतृत्व केलें. त्यांनीं मुंबईराज्य नाट्यस्पर्धेमध्यें पुण्याचे कलोपासकातर्फे भाग घेतला होता व त्यांनीं काम केलेल्या 'अपूर्व बंगाल' या नाटकास दुसरें पारितोषिक मिळालें. डॉ. सहस्रबुद्धे हे गेले दोन महिने बरेच आजारी होते. व शस्त्रक्रिया होऊन त्यांची प्रकृति सुधारत आहे. रुग्णशय्येवर त्यांचे मनास विरंगुळा देणारें एक आनंददायक वृत्त हातीं आलें आहे. त्यांचे गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या 'भारतीय लोकसत्ता' या ग्रंथास मुंबई विद्यापीठाचें तर्खडकर पारितोषक मिळालें आहे. प्रा. रा. म. गोखले यांनीं पुणें येथें भरलेल्या भारतीय अर्थशास्त्र व शेतकी अर्थशास्त्र परिषदांमध्यें कार्यकारिणीचे सभासद म्हणून प्रामुख्यानें भाग घेतला. प्रा. सिरसीकर पुणें विद्यापीठ शिक्षकसंघाचे एक कार्यवाह असून पुढील महिन्यांत होणाऱ्या शिक्षकपरिषदेची पूर्वतयारी करीत आहेत. प्रा. देशपांडे यांचे नेतृत्वाखालीं आपलें महाविद्यालयांतील आर्मर्ड कोअरचे पथकानें वार्षिक चढाओढींत बरींच बक्षिसें मिळविलीं, व त्यांचे मार्गदर्शनामुळें आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्यें आपले खेळाडूंना क्रीडानैपुण्याबद्दल बरींच बक्षिसें मिळालीं. प्रा. राजे यांनीं कलामंडळाचे यशस्वी कार्यक्रम घडवून आणले, व मुंबई येथे झालेल्या क्रीडामहोत्सवांमध्यें त्यांच्या व कु. तारा केळकर यांच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या मुलींच्या संघानें लोकनृत्यामध्यें पहिलें बक्षीस मिळविलें प्रा. वाळिंबे यांनीं या वर्षी 'साहित्य मीमांसा' हा साहित्यशास्त्रांतील मूलभूत सिद्धांताची तुलनात्मक दृष्टीनें सांगोपांग चर्चा करणारा ग्रंथ प्रसिद्ध करून मराठी टीकावाङ्मयामध्यें मोलाची भर घातली आहे.

प्रा. चापेकर यांनीं पुणें विद्यापीठानें समाजसेवेच्या शिबिराकरतां, निवडलेल्या विद्यार्थि स्वयंसेवकांचें मार्गदर्शन केलें. श्री. दि. ब. केरूर यांची महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेससमितीनें आपल्या औद्योगिक विकासउपसमितीचे सदस्य म्हणून निवड केली. भारत सरकारच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मराठी अनुवादाचें कामहि त्यांचेवरच सोंपवून म. प्र. कॉं. समितीनें तो आपल्या अधिकृत पत्रिकेमध्यें प्रसिद्ध केला आहे. तसेंच भारतीय अर्थशास्त्र व कृषि अर्थशास्त्र परिषदांचें स्वागतसमितीचे कार्यकारी सदस्य म्हणूनहि त्यांनीं काम केलें, व परिषदेपुढें "Economics of Growth with special reference to underdeveloped Areas" या विषयावर निबंध सादर केला. श्री. दि. के. देशपांडे यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संमेलनप्रसंगीं "अमृतराव पेशवे यांचा तोतया" व "हिंदु कायद्यावरील पहिला इंग्रजी ग्रंथ" या विषयांवर निबंध वाचले. श्री. द. व्यं. दाणी यांनीं गेल्या दिवाळीच्या सुटींत झालेल्या कोडीत येथील श्रमदानशिबिराचें नेतृत्व केलें.

**नवा उपक्रम**—गेल्या वर्षी कॉलेजयुवकांना कांहीं वेळ पुस्तकांतून व कल्पनारम्य जीवनांतून बाहेर काढून, खऱ्या जगाची ओळख पटविण्याकरतां, समाजसेवेची गोडी लावण्याकरतां व अंगमेहनतीची संवय लावण्याकरतां तलावाचे खोदकामाचा उपक्रम सुरू करण्यांत आला. तसाच एक दुसरा उपक्रम यंदा सुरू करण्यांत आला. फी देणें अशक्य होऊन कांहीं गरीब विद्यार्थ्यांना आपला अभ्यासक्रम सोडणें भाग पडतें. त्यांची आर्थिक निकड ओळखून व Work is workship हें कार्लाइलचें उच्च सामाजिक तत्त्वच जणूकाय अमलांत आणण्याकरतां, केमिस्ट्री प्रयोगशाळेच्या इमारतीचें रंगकाम कॉलेजयुवकांकडून करून घेऊन त्यांना योग्य तो मेहनताना देण्याचें ठरलें. त्याप्रमाणें जवळजवळ १२ विद्यार्थी एक पंधरवडा रंगकाम करण्यांत गुंतले होते व त्यांना प्रत्येकाला ६०० रुपये मिळाले. अशातऱ्हेचीं निरनिराळीं कामें येत्या मेच्या सुटींतहि विद्यार्थ्यांकडून करून घेण्याचा कॉलेजाचे चालकांचा मनोदय आहे. या नव्या उपक्रमाचें चीज करून विद्यार्थी स्वावलंबनाचे धडे कॉलेजजीवनामध्येंच गिरवून, आपल्या भावी आयुष्याची पूर्वतयारी मजबूत पायावर करण्यास उद्युक्त होतील अशी आम्हांस उमेद आहे.

**गरीब विद्यार्थि-निधि**—ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति व नादारी मिळत नाहीं, अशा परिस्थितीनें अगतिक झालेल्या विद्यार्थ्यांसाठीं हा गरीब विद्यार्थिनिधीचा उपक्रम केला आहे. आपल्या कॉलेजचे आजी व माजी विद्यार्थि व हितचिंतक यांनीं उदारहस्तानें या निधीस मदत करून हा निधि दरसाल रु. १००० व्याज देईल इतका वाढविण्यास मदत करावी अशी आमची परशुरामीय छात्रगणांस व प्राध्यापकांस विनंति आहे. गतवर्षी या कार्याकरितां प्रा. केरूर, विद्यार्थि श्री. भाटे व श्रीमती सुमति भट यांचे परिश्रम व इतर हितचिंतकांचें साहाय्य मिळून रु. ८९२–२ असा निधि गोळा झाला. कलामंडळ व पी. टी. शिक्षक यांचेहि निधीला मदत मिळविण्याकरितां प्रयत्न सुरू आहेत. यंदाहि बराच निधि जमा होईल अशी आशा आहे.

**एन्. सी. सी. आर्मर्डस्क्वॉड्रन पथक नं. २**—वार्षिक लष्करी शिक्षणशिबिरामध्यें या आपल्या पथकानें लेफ्ट. देशपांडे याचे नेतृत्वाखालीं रायफल ड्रिल, किट लेआऊट व शिस्त यांमध्यें पहिला क्रमांक मिळवून सर्वश्रेष्ठ पथक म्हणून मान मिळविला व मैदानी खेळांचें नैपुण्य-पदहि मिळविलें. याबद्दल लेफ्ट देशपांडे व नं. २ पथकांतील विद्यार्थ्यांचें आम्ही अभिनंदन करतों.

**एन्. सी. सी. ' सी. '** कंपनीचें यंदा मळवली येथें २४ डिसेंबर ते ६ जानेवारीपर्यंत लष्करी शिक्षण-शिबीर भरलें होतें. कंपनीला कुस्ती-नैपुण्याबद्दल व क्रॉसकंट्रीमध्यें पहिला क्रमांक मिळविल्याबद्दल बक्षिसें मिळालीं. सर्वप्रथम येण्याचा मान यंदा मिळवितां आला नाहीं, तरी विशेष प्रयत्नानें पुढल्या वर्षी सी कंपनीला भरघोस यश मिळेल अशी आशा प्रगट करतों.

**परशुरामीय :**—आतांपर्यंत परशुरामियन या इंग्रजी नांवानें आपलें नियतकालिक संबोधिलें जात असें. यापुढें सरपरशुरामभाऊंचे स्मरणार्थ कॉलेजाचें नामाभिधान झालें असल्यामुळें त्या नांवाशीं निगडित अशा 'परशुरामियन' चें नामान्तर करणें आमचें कर्तव्य आहे. या दृष्टीनें 'परशुरामीय' हा पर्याय या प्रजासत्ताकदिनाचे शुभदिनीं आम्ही स्वीकारला आहे.

**लेखकांस सूचना :**—नियतकालिकांत प्रसिद्ध होण्याकरतां पुष्कळ विद्यार्थि लेखक-लेखिका गद्य व पद्य लिखाण पाठवितात, परंतु पानांची मर्यादा लक्षांत घेतां त्यांचे १०।१२ पानांचे लेख छापणें शक्य नसतें. तसेंच कांहीं लेख भाषांतरित वा अर्धवट रूपांतरित असतात. व तें Copy right च्या नियमाखालीं येण्याची शक्यता असते, म्हणून ते बाजूस ठेवावे लागतात. अशा अनेक अडचणींतून संपादकास मार्ग काढावयाचा असतो. म्हणून कांहीं चांगले लेख छापून आले नाहींत याबद्दल त्या त्या लेखकलेखिकांनीं नाराज होऊं नये. कांहीं ललित लेखांत साहित्यविषयक गुणांचा अभाव असतो, तर कांहीं शास्त्रीय लेखांत चिकित्सक दृष्टि नसते. अशा लेखकांना आमची सूचना आहे कीं त्यांनीं प्राध्यापकांचे मार्गदर्शनाखालीं अभ्यास करून, आपले लेख निर्दोष कसे होतील याचा कसोशीनें प्रयत्न करावा. लेखनकला साध्य करण्याकरतां जी तपश्चर्या करावी लागते, ती करण्याची तयारी विद्यार्थि लेखक दाखवितील, तर त्याचें लिखाण निश्चित छापण्यालायक होईल. व्यक्तिशः लेखकांचा निर्देश आम्ही मुद्दाम टाळला आहे. आम्हांस कोणाचा विरस करावयाचा नाहीं, प्रोत्साहनच द्यावयाचें आहे. आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थिलेखकांतूनच साने गुरुजींसारखे कितीतरी प्रथितयश लेखक निर्माण झाले आहेत. तसे लेखक यापुढेंहि निर्माण होतील अशी सदिच्छा आम्ही प्रकट करतों.

आमचे संपादनकार्यांमध्यें साहाय्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानतों.

---

**शोचनीय मृत्यु**:—आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व नू. म. वि. हायस्कूल-मधील शिक्षक श्री. भणगे यांची कन्या कु. लीला अनंत भणगे ही प्रथम वर्ष (वाङ्मय) ब तुकडी मधील हुषार विद्यार्थिनी एकाएकीं दुसऱ्या सहामाहीचे आरंभीं १० नोव्हेंबरला निर्घृण काळाचे भक्ष्यस्थानीं पडली याबद्दल आम्हांस फार हळहळ वाटते. कु. लीला भणगे हिनें शाळेमध्यें पहिला वर्ग सोडला नाहीं व पारितोषिकेंहि बरीच मिळविलीं. एस्. एस्. सी. मध्येंहि ती प्रथमश्रेणींत उत्तीर्ण झाली. हिंदीच्या राष्ट्रभाषाकोविदपर्यंतच्या सर्व परीक्षा प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाली. तसेंच टिळक संस्कृत विद्यापीठाच्या तिन्ही परीक्षांमध्येंहि तिनें प्रथमश्रेणी पटकाविली. अभ्यासाव्यतिरिक्त तिनें गायन व पेटीवादनांत



नैपुण्य संपादन केलें. कॉलेजमध्यें तिला चालू वर्षाची सरकारी शिष्यवृत्ति मिळाली होती व दुसऱ्या सहामाहींत होणाऱ्या वर्गाचे स्नेहसंमेलनाची सेक्रेटरी म्हणून सर्वानुमतें तिची निवड झाली होती. परंतु दैवयोग निराळाच होता. अशा विनयशील, मनमिळाऊ, हुषार विद्यार्थिनीला इतक्या तरुण वयांत काळानें ओढून न्यावें यापरता दैवदुर्विलास तो कोणता? कै. लीलाच्या कुटुंबीयांवर ओढवलेल्या या शोककारक प्रसंगाबद्दल आम्ही हार्दिक सहानुभूति व्यक्त करतों कै. लीलाच्या अपमृत्यूची वार्ता कळल्यावर तिच्या स्मरणार्थ प्रथमवर्ष, ब च्या तुकडीचें कामकाज बंद ठेवण्यांत आलें होतें.

**कै. त्र्यंबक सीताराम कारखानीस**--महाराष्ट्र नाटकमंडळीचे एक संस्थापक व नामवंत नट, तसेंच थोर नाटककार व टीकाकार यांचें ता ८ जानेवारी रोजीं पुणें येथें ८३ व्या वर्षी देहावसान झालें हें कळविण्यास दुःख होतें. मराठी रंगभूमीला Not failure but low aim is crime ह्या ध्येयाचे अनुरोधानें इष्ट वळण लावून लोकाभिरुचीलाहि उदात्त नाटकांचा रसस्वाद घेण्याचें शिक्षण देण्याचें कार्य कै. कारखानीस यांनीं आपल्या नाट्यव्यवसायांत केलें. लोकछंदानुवर्ती नाटकें करून गल्ला गोळा करण्याचें त्यांनीं कधीं मनांतहि आणलें नाहीं. स्वतः निर्व्यसनी राहून आपल्या अभ्यासू व चिंतनशील वृत्तीनें त्यांनीं आपलें आयुष्य कंठिलें. ते केवळ नाट्यभिनयाचे तज्ज्ञ नसून रंगभूमीच्या तरुण अभ्यासूंचेहि आदर्श मार्गदर्शक होते. १९२५ सालापासून त्यांचा नाटककंपनींशीं संबंध सुटल्यावरहि महाराष्ट्र रंगभूमि जगविण्याच्या त्यांच्या तळमळीनें त्यांनीं नाट्यमन्वंतर, महाराष्ट्रीय कलोपासक वगैरे सुशिक्षित तरुणांच्या नाट्यसंस्थांना बहुमोल मदत केली. आपल्या महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त होणाऱ्या नाटकांचे निवडीकरतां व नाटक बसवितांना मार्गदर्शन करण्याकरतां, अनेक प्रसंगीं कै. कारखानीस मोठ्या आनंदानें उपस्थित होत, व अनेकवार तालमींना येऊन प्रयोग निर्दोष होण्याचे दृष्टीनें बहुमोल सूचना करीत. सन १९२७ ते १९३१ पर्यंत महाविद्यालयाचें स्नेहसंमेलनप्रसंगीं झालेलीं 'एकच प्याला', 'बेबंदशाही' वगैरे नाटकें श्री. कारखानीसांनींच दिग्दर्शित केलीं होतीं. श्री. कारखानीस यांचे निधनानें नाट्यप्रेमी तरुणांचा मार्गदर्शक हरपला. आम्ही कै. कारखानीस यांचे सुपुत्र, कन्या व पत्नी यांचे दुःखांत सहभागी आहों. ईश्वर कै. कारखानीस यांचे आत्म्यास सद्गति देवो.

# स. प. कॉलेज जिमखाना

## वार्षिक अहवाल ( १९५५-५६ )

आपल्या कॉलेज जिमखान्याच्या ह्या वर्षीच्या कामाचा वृत्तांत 'परशुरामीय'" च्या वाचकांपुढें ठेवतांना मला अतिशय आनंद होत आहे. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत आपल्या कॉलेजच्या विद्यार्थिनींनी यंदाहि खूप चुरशीचा प्रयत्न करून सांघिक नैपुण्यपद प्राप्त करून घेतलें व आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखलेली आहे. विद्यार्थ्यांच्या सामन्यांमध्येंहि सांघिक नैपुण्य मिळविण्यांत आपला दुसरा क्रमांक आहे.

पहिल्या सहामाहींतील जिमखान्याच्या कामाचा वृत्तांत 'परशुरामीय' च्या सप्टेंबर १९५५ च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहेच. त्यामध्यें जिमखाना मॅनेजिंग कमिटीच्या सदस्यांची यादीहि देण्यांत आली आहे. ह्या वर्षी निरनिराळया खेळांचे "कोच" म्हणून खालील अधिकारी-व्यक्तींनी जिमखान्यास अतिशय साहाय्य केलें आहे. त्याबद्दल जिमखान्यातर्फे मी त्यांच्यांबद्दलची माझी कृतज्ञता व्यक्त करतों.

( १ ) श्री. बा. ज. मोहोनी—क्रिकेट.
( २ ) „ भ. रा. जोशी—जिमनॅशिअम् व ॲथलेटिक्स.
( ३ ) „ मो. जी. फडके—Volleyball, Basket ball and Ladies games.
( ४ ) „ राजाभाऊ वाकणकर—कुस्ती व हुतुतु.
( ५ ) „ वसंतराव देशपांडे—फूटबॉल.
( ६ ) „ पु. पां. बापट—हॉकी.
( ७ ) „ शरदराव कुलकर्णी—सिंगल-बार, डबल-बार व मलखांब.
( ८ ) „ र. शं. गोखले—Indian Games.
( ९ ) „ ना. का. जोशी—वजन उचलणें.
(१०) „ मुकुंद रानडे—Athletics.

तसेंच 'स्टाफ्-रेप्रेझेंटेटिव्हज' म्हणून श्री. गुर्जर व कु. ताराबाई केळकर ह्यांची नियुक्ति कायम करण्यांत आली.

आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत कॉलेजनें मिळविलेले गुण हेंच अजूनहि त्यांच्या क्रीडाविषयक यशाचें निर्णायक गमक ठरले जात असल्यामुळें, त्या सामन्यामध्यें यश मिळवून आपल्या कॉलेजला भूषणभूत होऊन राहिलेल्या पुढील खेळाडूंचा व खेळाडू संघांचा गौरवानें उल्लेख करण्यास मला मोठा आनंद होत आहे.

विद्यार्थ्यांच्या आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत, आपण हुतुतु, बास्केट्-बॉल व कुस्ती ह्यामध्यें सांघिक नैपुण्य मिळविलेलें आहे. विशेषतः 'बास्केट-बॉल' ची ट्रॉफी गेल्या चोवीस वर्षांत वीस वेळां आपल्या कॉलेजनें जिंकलेली आहे. व आपण क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल व बॅड्मिंटन् ( डबल्स् ) ह्या सामन्यांत दुसरा क्रमांक मिळविलेला आहे.



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधील विजयी खेळाडू

★



आंतरमहाविद्यालयीन रस्सीखेचीमधील विद्यार्थिनींचा विजयी संघ



जिमखाना कार्यकारिणी १९५५-५६



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधील विजयी खेळाडू व
आंतरविद्यापीठ स्पर्धांकरतां निवड झालेले खेळाडू

मुंबईला झालेल्या हूतुतूच्या आंतरमहाविद्यालयीन संघांच्या सामन्यांत आपल्या संघानें विजय संपादून "भोईर ट्रॉफी" जिंकलेली आहे. याचें बरेचसें श्रेय आपले संघनायक श्री भा. भा. करंबेळकर, श्री. बापट, श्री. जोशी व श्री. फाटक ह्यांच्याकडे आहे. क्रिकेटमध्येंहि, आंतर-विद्यापीठ सामन्यासाठीं गेलेल्या पुणें विद्यापीठांच्या संघांत आपल्या कॉलेजच्या श्री. दुवें, श्री. करमरकर, श्री. चांदोरकर व श्री. गोडबोले ह्या खेळाडूंची निवड झाली. श्री. दुवें पुणें विद्यापीठ संघाचे कर्णधार होते, व श्री. चांदोरकर ह्यांनीं एका सामन्यांत १०६ (एकशेंसहा) धांवा काढून व रुंगठा ट्रॉफी व देवधर ट्रॉफी सामन्यांत शतकें झळकावून आपल्या कॉलेजला नांव मिळवून दिलें. श्री. करमरकर ह्याचें बॉलिंगहि प्रेक्षणीय झालें. तसेंच आपल्या गेल्या वर्षीच्या क्रिकेट 'टीम' मधील एक नामवंत खेळाडू श्री. बापू नाडकर्णी ह्यांची दिल्लीला झालेल्या 'टेस्ट' सामन्यांत खेळण्यासाठीं निवड झाली. तसेंच श्री. चांदोरकर व श्री. करमरकर ह्यांची रणजी ट्रॉफीसाठीं महाराष्ट्रातर्फें चांचणीकरितां निवड झाली आहे. हे दोघेजण पुणें विद्यापीठातर्फें नागपूरला क्रिकेट सामन्यांत खेळण्यासाठीं गेले होते.

हैदराबादला झालेल्या आंतर-विद्यापीठ फूट-बॉल सामन्यांमध्यें, पुणें विद्यापीठातर्फें आपल्या कॉलेजचे श्री. जनपंडित, श्री. कुडचडकर, श्री. जोशी व श्री. गाडगीळ ह्या चौघांची निवड झाली. ह्या विद्यापीठ संघाचे कर्णधार श्री. प्रसाद हेहि आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. तसेंच आपल्या बास्केट बॉल संघांतील खेळाडू श्री. वागळे ह्यांची मुंबई राज्यातर्फें खेळण्यास निवड झाली आहे.

आपल्या जिमखान्याच्या 'जिम्नॅशियम्' विभागानें यंदा बरीच चांगली कामगिरी केली, व कॉलेजच्या यशास मोठाच हातभार लावला. विशेषतः आपले कुस्तीगीर श्री. प्रभाकर दराडे ह्यांनीं अमृतसरला भरलेल्या आंतर-विद्यापीठ कुस्तीच्या सामन्यांत १९१ पौंडांचे वरच्या वजनांत व्यक्तिगत नैपुण्य मिळवून, आपल्या कॉलेजच्या श्री. नाना काळे ह्यांनीं मिळविलेल्या कुस्तींतील उज्ज्वल यशांची परंपरा कायम राखली.

'जिम्नॅशिअम्' विभागातर्फें यंदा खेळाडूंना 'रिफ्रेशमेंट' ऐवजीं दररोज सकाळीं दूध देण्याची योजना कार्यवाहींत आणली गेली व त्याचा खेळाडूंना पुष्कळ फायदा झाला. आपल्या कॉलेजनें मिळविलेल्या एकूण ८९ (एकूण नव्वद) गुणांपैकीं ४२ (बेचाळीस) गुण ह्या विभागांतील खेळाडूंनीं मिळविलेले आहेत. आपल्या कॉलेजला ह्या वर्षी कुस्तीचें अजिंक्यपद मिळालें. त्या सामन्यांत आपले कुस्तीगीर श्री. दराडे, श्री. कोंडे व श्री. महांगरे ह्यांनीं पहिला क्रमांक, व श्री. ज्ञा. मा. पाटील, श्री. स. शं. कोंडे देशमुख व श्री. गोफणे ह्यांनीं दुसरा क्रमांक मिळविला. तसेंच 'डबल बार' व 'सिंगल बार' मध्यें श्री. नाडकर्णी यांनीं पहिला व दुसरा क्रमांक पटकाविला, व श्री. आठवले हे 'सिंगल बार'मध्यें तिसरे आले. 'मलखांब' स्पर्धेंत श्री. पिंपळखरे व श्री. नेने अनुक्रमें दुसरे व तिसरे आले. वजन उचलण्याच्या स्पर्धेंत श्री. बोरकर व श्री. तांबोळी, श्री. व. म. येवले, श्री. भ. वि. जोगळेकर व श्री. ज. ग. नलावडे हे आपापल्या वजनांत दुसरे व तिसरे आले. याशिवाय "पुणें श्री." ह्या शरीर-सौष्ठवस्पर्धेंत श्री. शाम येवले हे आपल्या उंचींत तिसरे आले. पुणें वजन उचलण्याच्या स्पर्धेंत श्री. ग. वि. गोसावी ह्यांनीं आपल्या वजनांत पहिल्या क्रमांकाचें यश मिळविलें आहे. ह्या सर्व खेळाडूंचें मी हार्दिक अभिनंदन करतों.

ह्या वर्षी मैदानी खेळांचे विभागातर्फेहि दुधाची योजना सुरू करण्यांत आली व ती थोडी-फार यशस्वीहि झाली. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांत या विभागातर्फे, श्री मोने ह्यांनीं भाला-फेंकींत व वैद्य यांनीं पंधराशें ( १५०० ) मीटर्स पळण्याच्या चढाओढींत, दुसरा क्रमांक मिळविला. ह्या दोघांचीहि ' पूना-ग्रुप ' तर्फे निवड होऊन तेथेंहि श्री. मोने ह्यांनीं दुसरा व श्री. वैद्य ह्यांनीं तिसरा क्रमांक मिळविला. तसेंच श्री. आठवले मु. अ. ह्यांनीं सूर मारण्यामध्यें पहिल्या दर्जाचें यश मिळविलें.

श्री. पागे व श्री. देवधर ह्या जोडीनें ' बॅड्मिंगटन डबल्स ' च्या सामन्यांत दुसरा क्रमांक मिळविला. तसेंच आपल्या Basket-ball संघांतील खेळाडू श्री वागळे ह्यांची मुम्बई राज्यातर्फे बास्केट-बॉल खेळावयास निवड झाली. ह्या सर्व खेळाडूंचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

विद्यार्थिनींच्या आंतर-महाविद्यालयीन सामन्यांतील आपलें यश अधिकच गौरवास्पद आहे. मुलींच्या खेळांतील सांघिक नैपुण्यपदासाठीं आपलें कॉलेज व वाडिया कॉलेज ह्यांमधें अटीतटीची चुरस होऊन आपण एका गुणानें विजय सम्पादन केला आहे.

विद्यार्थिनींच्या ' थ्रो-बॉल ' व रिंग-टेनिस ( Ring-Tennis ) ( सिंगल्स् व डबल्स् ) ह्या सांघिक सामन्यांत आपण पहिला क्रमांक मिळविला आहे, आणि ' नेट् बॉल ', खोखो, हुतुतू व टेबल-टेनिस ह्यांमध्यें आपल्या कॉलेजला दुसरा क्रमांक मिळाला आहे

मुलींच्या मैदानी खेळांच्या स्पर्धेत कुमारी सिन्धु सोमण ह्यांनीं गोळाफेकींच्या चढाओढींत २९″ २·५″ ( एकोणतीस फूट अडीच इंच ) थाळी फेकून नवीन आंतरमहाविद्यालयीन उच्चांक निर्माण केला आहे. त्यांची बंगलोर येथें भरणाऱ्या स्पर्धेसाठीं पुणें विद्यापीठातर्फे निवड झाली आहे, याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. त्याचप्रमाणें आंतर-विद्यापीठ खो खो संघांत आपल्या कॉलेजच्या कु. सविता जोशी, कु. शांता देवधर, कु. मीना भोपटकर व कु. शांता गांगल ह्यांची निवड झाली, व बंगलोर येथें बडोदें संघावर अंतिम सामन्यांत विजय मिळविण्याचे श्रेयामध्यें त्यांचा मोठा वांटा आहे.

कु. शकुंतला गद्रे यांनीं भालाफेकीच्या चढाओढींत पहिला क्रमांक मिळविला. कु. सविता जोशी ह्या ८० ( ऐंशी ) मीटर्स ' हर्ड्लस ' मधें दुसऱ्या आल्या व कु. सरल ओक ह्या उंच उडींत दुसऱ्या आल्या.

अशा तऱ्हेनें आंतरमहाविद्यालयीन सामन्यांतील विजयाची आपल्या कॉलेजची परंपरा आपण ह्या वर्षीहि कायम राखली आहे.

' अमृतकौर कोचिंग योजनें 'मध्यें, पुणें विद्यापीठानें आपल्या जिमखान्यांतील " कोच " श्री. राजाभाऊ वाकणकर ह्यांची ' कुस्ती ' साठीं व श्री. देशपांडे ह्यांचीं ' फूटबॉल ' साठीं निवड करण्यांत आली. तसेंच आपले माजी ' जिमखाना ऑर्गनायझर ' व पी. टी. डायरेक्टर श्री. झंवर ह्यांना मुंबई राज्यातर्फे ' मैदानी खेळांच्या ' कोचिंग ' चें विशेष शिक्षण घेण्यासाठीं म्हणून मद्रासला पाठविण्यांत आलें आहे. ह्या सर्वांचें मी जिमखान्यातर्फे विशेष अभि-नंदन करतों.

आपल्या कॉलेजमधील ' इंटर-डिव्हिजन ' खेळांचे सामने आतां जवळजवळ पुरे होत आले आहेत. त्यामध्यें हुतुतूची ' ट्राफी ' ज्युनिअर बी. ए नें जिंकली आहे; व ' एफ्. वाय्. सायन्स बी ' तुकडीनें दुसरा क्रमांक मिळविला आहे. अजून आट्यापाट्या व खोखो ह्यांचे सामने व्हावयाचे आहेत. ह्या सामन्यांच्या व्यवस्थित योजनेचें श्रेय आपले उत्साही पी. टी. डायरेक्टर श्री. भ. रा. जोशी ह्यांना आहे.

आपल्या कॉलेजच्या ' डिबेटिंग युनियन ' चें उद्घाटन १४ जुलै रोजीं श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांचे हस्तें झालें, व त्यातर्फे एक ऑगस्टला ' लोकमान्य टिळक पुण्यतिथि ' साजरी करण्यांत आली. तसेंच २९ ऑगस्ट रोजीं, गोवा सत्याग्रहांत भाग घेऊन परत आलेल्या आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं आपले अनुभव कथन करण्याचा समारंभ मोठ्या प्रमाणांत पार पाडण्यांत आला. व दहा सप्टेंबरला ' हुतात्मा वसंत दाते पुण्यतिथि ' साजरी करण्यांत आली.

डिबेटिंग युनियन विभागातर्फे १६ सप्टेंबरला झालेल्या " रानडे वक्तृत्वस्पर्धेत " भाग घेण्यासाठीं आपल्या कॉलेजतर्फे श्री. गुर्जर व श्री. आठवले ह्या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली होती; त्या स्पर्धेत त्या दोघांनींहि प्रशस्तिपत्रकें मिळविलीं.

तसेंच बेळगांवला होणाऱ्या ' शि. म. परांजपे वक्तृत्व स्पर्धेसाठीं श्री. गुर्जर व श्री. कुलकर्णी ह्यांना पाठविण्यांत आलें होतें.

आपल्या कॉलेजमधील खेळांचे वार्षिक सामने संपले. त्यानंतर जानेवारीचे दुसरे आठवड्यामध्यें जिमखान्यातर्फे सर्व खेळाडूंचें संमेलन एम्प्रेस गार्डनमध्यें झालें. ' जिमखाना-डे ' लवकरच साजरा होऊन जिमखान्यांतील ह्या वर्षीचें महत्त्वाचें काम समाप्त होईल.

आपल्या कॉलेजच्या नवीन बांधलेल्या पोहोण्याच्या तलावाचें उद्घाटन लौकरच होईल. त्यामुळें आपल्या खेळाडूंना पोहण्याचा विशेष सराव करण्याची संधि मिळून, आपल्या कॉलेजला पुढील वर्षी सांघिक नैपुण्यपद मिळविण्यास त्याची अतिशय मदत होईल अशी आशा आतां व्यक्त करण्यास हरकत नाहीं.

अहवाल संपण्यापूर्वी, मी आपल्या सर्व विजयी खेळाडूंचें अभिनंदन करतों व आमचे सर्व 'कोचेज्', 'स्टाफ्-इन्-चार्ज' 'स्टाफ्-रेप्रेझेंटेटिव्हज्', तसेच श्री. सुरेश गुजराथी, श्री. भ. रा. जोशी (P. T. Director), सौ. कटककर (Ladies' P. T. Organizer), जिमखाना मॅनेजिंग कमिटीचे सर्व सभासद, आणि जिमखाना-ऑफिसचे श्री. मोहोनी व श्री. लाटकर ह्यांचे त्यांच्या हार्दिक सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानतों. शेवटीं आपले प्रिन्सिपाल श्री. ब. वा. भिडे व व्हाईस-प्रेसिडेंट प्रा. शं. रं. देशपांडे ह्यांनीं वेळोवेळीं दिलेल्या उत्तेजनाबद्दल व बहुमोल सल्ल्याबद्दल माझी कृतज्ञता व्यक्त करून हा अहवाल संपवितों.

वि. ह. गाड्गल
( जनरल सेक्रेटरी )

# शारीरिक शिक्षण–विभाग

चार साडेचार महिन्यांच्या दीर्घ मध्यंतरानंतर दि. ६ जून १९५५ रोजीं क्रीडांगणा-भोंवतालच्या खच्या इमारतींनीं शिक्षणाधिकाऱ्यांच्या पहाडी आवाजांना आणि नवागत, भावी गटप्रमुखांच्या अनिश्चित सुरांतल्या ' Attention ', ' Stand at ease ' ना प्रतिसाद देण्यास पुन्हां एकदां सुरवात केली. सुमारे ३५ विद्यार्थ्यांना 'म्होरकेपणा' चें शिक्षण देण्यास सुरवात झाली. ३१ जूनला गटप्रमुखांची सहल विठ्ठलवाडीस नेण्यांत आली तेव्हां वाटेंतच एका टेकडीवर दूरच्या झाडींतून येणाऱ्या प्रतिध्वनींवरून विद्यार्थ्यांच्या आवाजांतील पहाडीपणाची चांचणी झाली. पुढील ३ दिवसांत गटप्रमुखांची निवडीच्या दृष्टीनें चांचणी झाली. श्री. मुकुंद ब्रह्मे हे नवागत गटप्रमुखांत पहिले आले.

निवड झालेल्या १९ विद्यार्थी व १२ विद्यार्थिनींच्या सहकार्यानें दि. ४ जुलै १९५५ पासून शारीरिक शिक्षणाचें काम नियमित चालू झालें. निरनिराळ्या विभागांचे प्रमुख म्हणून पुढीलप्रमाणें नेमणुका झाल्या—

| | | |
|---|---|---|
| प्रभात विभाग | विद्यार्थी—(१) श्री. आपटे व (२) श्री. नलावडे (३) कंदलगांवकर | |
| | विद्यार्थिनी—(१) कु. सहस्रबुद्धे | |
| सायं–विभाग | विद्यार्थी—श्री. कंदलगांवकर | |
| | विद्यार्थिनी—कु. भुस्कुटे | |
| मैदानी विभाग (Sports batch) | | श्री. करंदीकर |

पहिल्या सहामाहींत प्रभात व सायं–विभागाचे सुमारे ३७ तास झाले. मैदानी विभागाचे तास प्रतिदिन होत असतात. ते ४८ झाले. दररोजच्या तासांचे वेळीं नियमितपणें ८०० मीटर धावणें, जोर, बैठका व नंतर छोटे छोटे खेळ असा कार्यक्रम आखण्यांत आला. मैदानी विभागाचे विद्यार्थी ८०० मीटर धांवणें, ५-७ मिनिटें कवायत, वा जोर-बैठका करून नंतर व्हॉलीबाल, फूटबॉल, बास्केटबॉल व तालीम अशा चार गटांत विभागले जातात. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांसाठीं सराव करणारे विद्यार्थीहि आपला नेहमींचा सराव आटपून नंतर या चार गटांत कोठेंना कोठें उपस्थित असतात.

१५ ऑगस्ट १९५५ चा स्वातंत्र्यदिनाचा समारंभ शा. शि. विभागातर्फे उपप्राचार्य श्री. भावे यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या शिस्तीनें पार पाडण्यांत आला.

गटागटांच्या चढाओढींत प्रथम वर्षांत श्री. पांडे यांचा गट पुढें आला आहे. द्वितीय वर्षांत श्री. दांडेकर व सायंकालचे विभागांत श्री. जोशी यांचा गट पुढें आला. त्याचप्रमाणें विद्यार्थिनींचे गटांत कु. पिंगळे यांचा गट पुढें आला आहे. कडी चेंडूमध्यें कु. गद्रे व थ्रोबॉल मध्यें कु. धडफळे यांचा गट पहिला आला आहे.

विद्यार्थिनींचा शा. शि. विभाग सुरळीतपणें चालण्यास सौ. शकुंतला कटककर यांची अतिशय मोलाची मदत झाली. यंदां विद्यार्थिनींकरतां क्रीडांगणावर स्वतंत्रपणें निरनिराळ्या

खेळांच्या जागा आखून देण्यांत आल्या आहेत. त्यामुळें त्याच्या विभागाचें काम आतां जास्त सोयीनें चालूं शकतें.

प्रजासत्ताक दिनाचा सोहळा प्राचार्य भिडे यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें होऊन त्याचवेळीं शा. शि. विभागाचा समारोप झाला.

**भ. रा. जोशी.**
शा. शि विभागप्रमुख

---

# मराठी वाङ्मय मंडळ

महाराष्ट्रांतील विख्यात कादंबरीकार श्री. गो. नि. दांडेकर यांच्या 'कादंबरी लेखन' या विषयावरील व्याख्यानानें वाङ्मयमंडळाच्या कार्याला प्रारंभ झाला. त्यानंतर प्रा. श्री. म. माटे यांचे 'नवी लोकशाही व नवें वाङ्मय' या विषयावर, व डॉ. प्र न. जोशी यांचे 'संताचा साम्यवाद' या विषयावर विचारप्रधान अशीं व्याख्यानें झालीं. तदनंतर दुसऱ्या सहामाहींत प्रा. गं. बा. सरदार यांनीं 'ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची प्रेरणा तत्त्वनिरूपण कीं सौंदर्यनिर्मिति ?' या वादग्रस्त विषयांवर आपले विचार सांगून, विद्यार्थ्यांपुढें एक अभिनव दृष्टिकोन मांडला.दुसऱ्या सहामाहींत मंडळाचे अध्यक्ष डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या दीर्घकालीन प्रकृतिअस्वास्थ्यामुळें, मंडळाला मार्गदर्शन होऊं शकलें नाहीं. तरी पण डॉ. रा. शं. वाळिंबे यांनीं त्यांच्या जागीं आम्हांस मार्गदर्शन करण्याचें मान्य केलें त्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

नेहमींप्रमाणें सभासदांच्या साहित्यावर जी चर्चा करण्यांत येते त्या चर्चेसाठीं अनेक समासदांचें साहित्य आलें व या चर्चेमध्यें बऱ्याच उत्साही विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. या चर्चांचें उद्‌घाटन श्री. गोपीनाथ तळवलकर यांनीं केलें होतें. या चर्चे वेळीं त्यांनींच मार्गदर्शन केलें होतें.

दरवर्षींप्रमाणें याहि वर्षी 'उन्मेष' या नांवानें एक हस्तलिखित काव्यसंग्रह संपादित करण्यांत येत आहे. शिवाय मंडळाची सहल, कविसंमेलन आदि कार्यक्रम ठरल्याप्रमाणें पार पडणार असून "आंतर-भारती" चा एक अभिनव उपक्रम करण्याचें मंडळानें ठरविलें आहे.

वर उल्लेखिलेले मंडळाचे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य केलें त्यांचें आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों व पुढील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं सर्वांनीं असेंच सहकार्य द्यावें अशी विनंति करतों.

**सुरेश जगताप**
**नलिनी आठवले**
कार्यवाह.

---

# पुणें विद्यापीठ-अर्थशास्त्र मंडळ

## स. प. कॉलेज-केंद्र

मंडळाच्या निवडणुका ऑगस्ट महिन्यांत खालीलप्रमाणें झाल्या.

| | |
|---|---|
| प्रा गोखले व प्रा केरूर | उपाध्यक्ष |
| श्री. ग. स. गोसावी, ( सी. बी. ए. ) | कार्यवाह |
| कु. एम्. मैत्रेयी, ( सी. बी. ए. )<br>कु. सुधा वैद्य, ( सी. बी. ए. ) | विद्यार्थिनी प्रतिनिधी |

मंडळाच्या सभेंत यंदा खालील विद्यार्थ्यांनीं निबंध वाचले.

| नांव | तारीख | विषय | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| (१) ग. स. गोसावी, सी.बी.ए. | १५।९।५५ | " हिंदी उद्योगधंद्यांचें वाजवीकरण ( Rationalisation ) | प्रा. गोखले |
| (२) कु. एस्. मैत्रेयी सी.बी.ए. | २२।९।५५ | " शेतकी मालाच्या किंमती स्थिर कशा ठेवाव्या. " | प्रा. नामजोशी |

मंडळातर्फे ता. १८ डिसेंबर ५५ रोजीं ' बनेश्वर व भाटघर ' येथें सहल काढण्यांत आली. सहलीला प्र. सिर्सीकरांचें मार्गदर्शन लाभलें. यंदांच्या वर्षी पुण्यांत भरलेल्या अर्थ-परिषदांतफ होणाऱ्या जादा व्याख्यानमालेंत मंडळातर्फे सहकार्य करण्यांत आलें विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणें विचार करण्यास संधि मिळूं देणें, हें मंडळाचें ध्येय आहे.

**ग. स. गोसावी**, सी. बी. ए.
कार्यवाह

---

# कोडीत येथील विद्यार्थी श्रमदानशिबीर

भारत सेवक समाजातर्फे गेल्या दिवाळीच्या सुटींत सासवडजवळील कोडीत या गांवीं विद्यार्थ्यांचें श्रमदानशिबीर दि २०।१०।५५ ते ५।११।५५ असे सतरा दिवस भरलें होतें. स. प. कॉलेज, भारत हायस्कूल, कॉर्पोरेशन हायस्कूल, सरस्वती मंदिर इ. शिक्षणसंस्थांच्या एकूण ७० विद्यार्थ्यांनीं या शिबिरांत भाग घेतला. आपल्या कॉलेजमधील पुढील २२ जणांनीं शिबिराच्या कार्यांत भाग घेतला.

**प्रथमवर्ष कला**—१ ढवळे २ बं. ह. लुंकड ३ रा. ब काळे ४ वाघोलीकर. **प्रथम-वर्ष शास्त्र**—५ व. ना लेले ६ रं. क. देशपांडे ७ के ना. दैठणकर ८ मेहेत्रे ९ प्रभाकर बन्सोड. **द्वितीय वर्ष कला**--१० श्री. ग. अत्रे ११ देडगांवकर १२ तुकाराम मानकर १३ थोरवे १४ म. य. कुकडे १५ जोगळेकर १६ रमेश देशपांडे. **ज्युनि. बी. ए.**—

१७ ना. ग. आठवले १८ आठवले १९ अ. वा. आपटे २० बसवय्या २१ वि. ना. भावे.
**सीनि बी. ए.** -- २२ भा. स. ओक.

सतरा दिवसांच्या या शिबिरांत विद्यार्थ्यांनीं सुमारें २ फर्लांग कोडीत-सासवड हा चिखलाचा व अत्यंत खराब झालेला रस्ता डबर घालून व मुरूम टाकून पक्का केला. रस्त्याच्या कडेला वाहतुकीच्या सोईसाठीं पांढरे दगड पण लावले. रस्त्याच्या कामाबरोबर विद्यार्थ्यांनीं गांवांतील रस्त्यांवर माजलेलें गवत तोडून, दलदलीच्या जागा व खड्डे बुजवून ग्रामसफाई केली. विद्यार्थ्यांच्या या कार्यांत गांवकऱ्यांनीं आपण होऊन मदत केली. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सुमारें १०० खेडूत स्त्रियांनीं घरकाम बाजूला ठेवून रस्तांबांधणीच्या कार्यांत स्वखुषीनें भाग घेतला.

श्रमदानाबरोबर अत्यंत महत्त्वाचें असें लोकजागृतीचें कार्य या शिबिरानें केलें. त्यासाठीं श्री. चिं. ग. कर्वे, डॉ. प्र. न. जोशी, श्री. दि. कृ. डेंगळे, श्री. दि. के. देशपांडे व श्री. व. भ. कर्णिक यांच्या व्याख्यानांचा कार्यक्रम आखण्यांत आला होता. रोज दुपारीं विद्यार्थीसभा होई. त्यांत संयुक्त राष्ट्रसंघ दिन, कविसंमेलन, जिज्ञासूंचें समाधान, समस्यापूर्ति, आयत्या वेळचीं भाषणें, वादनस्पर्धा, गांवची दप्तरपहाणी इ. कार्यक्रम झाले. रात्रीं गांवकऱ्यांसाठीं सभा असे. त्यांत करमणुकीच्या कार्यक्रमाबरोबरच वर्तमानपत्रवाचन, गांवाचें आरोग्य कसें राखावें, लोकशाही राज्य म्हणजे काय, आपला इतिहास, आधुनिक जगांतील शोध इ. संबंधी गोष्टीरूपानें माहिती सांगण्यांत येई. रोज सुमारें ५००-६०० खेडूत सदर कार्यक्रमांना उपस्थित रहात. खेडुतांच्या शंकेचें निरसनहि करण्यांत येत असे.

शिबीर सुरू होण्याच्या अगोदर आपल्या कॉलेजांतील दहा दहा विद्यार्थ्यांच्या गटानें ता. ११-१२ व २४-२५ सप्टेंबर रोजीं कोडीत गांवाला भेटी दिल्या होत्या. गांवकऱ्यांना शिबिराची माहिती सांगणें व शिबिराच्या व्यवस्थेसाठीं लोकमत तयार करणें हा महत्त्वाचा हेतु या आगाऊ भेटीमुळें साध्य झाला. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांची व खेडुतांची ओळख पण झाली. श्रीं. दि. के. देशपांडे यांनीं या प्राथमिक कार्यांत केलेली मदत अविस्मरणीय आहे.

शिबिराच्या कामांत श्री. दि. के. देशपांडे, पी. टी. डायरेक्टर श्री. भ. रा. जोशी, श्री. कुकडे, श्री. ओक, श्री. पानसे व श्री. भावे यांची बहुमोल मदत झाली. शिबिराला आमदार माधवराव मेमाणे, श्री. सांगोले-मामलेदार पुरंदर, श्री. खाडे वकील, डॉ. कामत, डॉ. देशपांडे इ. अनेक पाहुण्यांनीं भेट देऊन शिबिराच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें. शिबिराच्या कार्याची माहिती वेळोवेळीं दैनिक सकाळ, भारत, प्रभात, लोकशक्ति, मन्वंतर इ. वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत होती.

खेडेगांवांतील लोकांचीं घरेंदारें, रहाणी, विचारसरणी, लोकसमजुती व श्रद्धा यांची विद्यार्थ्यांना जवळून पहाणी करतां आली. कोडीत गांवची आर्थिक व सामाजिक पहाणी आपल्या कॉलेजचे श्री. आठवले व श्री. बसवय्या या विद्यार्थ्यांनीं केली.

**दत्तात्रय व्यंकटेश दाणी**
शिबिरप्रमुख

# शिवरी येथील मुलींचें श्रमदानशिबीर

शिवरी हें गांव पुणें जिल्ह्यांतील, पुरंदर तालुक्यांत असून सासवडपासून पांच मैलांवर आहे. सासवड–जेजुरी रस्ता या गांवावरून जातो. दिवाळीच्या सुट्टींत भारत सेवक समाजाच्या-वतीनें या गांवीं स्त्रियांचें श्रमदानशिबीर भरलें होतें. शिबीरप्रमुख म्हणून सेवासदन ट्रेनिंग कॉलेज-मधील कु. छबुताई कारखानीस यांनीं काम केलें. दि. २१ ऑक्टोबरला पार्लमेंटच्या सभासद सौ. इंदिराबाई मायदेव यांनीं शिबिराचें उद्‌घाटन केलें. शिबीर १५ दिवस चालू होतें.

आपल्या कॉलेजतर्फे या शिबिरांत इंटर ऑर्ट्‌समधील कु. चंपा परांजपे व फर्स्ट इयर ऑर्ट्‌स-मधील कु. सुलोचना नाईक, कु. शशीकला तोरो, कु. दया अल्लूरकर व कु. सरला देहाडराय यांनीं भाग घेतला होता. याशिवाय आपल्या कॉलेजच्या माजी विद्यार्थिनी कु. काटे व कु. चैसास याहि या शिबिरांत अधिकारी म्हणून काम करीत होत्या. स्त्रियांच्या या श्रमदानशिबिरांत शारीरिक 'श्रमा'पेक्षां 'सांस्कृतिक' कार्यक्रमावर विशेष भर होता. गांवांतील स्त्रियांच्या घरीं जाऊन त्यांचा परिचय करून घेणें, शिबिराचा उद्देश त्यांना समजावून सांगून सर्व कार्यक्रमांत त्यांचें सहकार्य मिळविणें, घरांतील वस्तू-मांडणीचें नीट निरीक्षण करून स्त्रियांना स्वच्छता राखण्याचें महत्त्व सांगून त्याची व त्यांच्या लहान मुलांची स्वच्छता करवून घेणें, घरांत सांठवला जाणारा केर गांवाबाहेर शेणखड्ड्यांत नेवून टाकविणें इत्यादि गोष्टी सुरवातीला करून घेण्यांत आल्या.

संध्याकाळच्या वेळीं गांवांतील लहान मुलें व मुली जमवून त्यांना कवाईत व खेळ शिकविले जात. सकाळच्या वेळीं सामुदायिक नमस्कार घालून घेणें व सायंकाळीं खेळ शिकविणें, यांचा गांवांतील मुलाच्या मनावर फार अनुकूल परिणाम झाला. रात्रीं गांवांतील सर्व स्त्रीपुरुषांसाठीं करमणुकीचे व इतर कार्यक्रम होत असत. पोथी वाचणें, गोष्टीरूपानें इतिहास सांगणें, देशभक्तीचीं व ऐक्यसंवर्धक गाणीं म्हणणें, नाटिका करून दाखविणें इत्यादि कार्यक्रम यावेळीं होत असत. सर्व मुलींना या कार्यक्रमांत भाग घेण्यास अवसर मिळाला. गांवांतील मुलांमुलींना शिकवून त्यांचेहि कांहीं कार्यक्रम करून घेण्यांत आले.

हीं सर्व कामें मुली गटागटानें करीत असत. सोयीसाठीं गांवाचेहि गट पाडून, सर्व मुलींना सर्व तऱ्हेचीं कामें करतां येतील अशी व्यवस्था केली होती. शिबीर चालू असतां जवळील तक्रारवाडी, साकुर्डी, जेजुरी इत्यादि ठिकाणीं जाऊन मुलींनीं ग्रामपाहणी केली व कांहीं ठिकाणीं चालू असलेल्या श्रमदानांत खेडूत बंधू-भगिनींना मार्गदर्शन केलें. पाहुण्यांचीं व्याख्यानें ऐकण्यास व मुलींचे करमणुकीचे कार्यक्रम पाहण्यास आजूबाजूच्या खेड्यांतूनहि मोठ्या संख्येनें स्त्रीपुरुष येत असत. या सर्व कार्यक्रमांत ग्रामीण स्त्रिया इतक्या रमल्या होत्या कीं शिबीर संपवून स्वयंसेविका परत निघाल्या त्यावेळीं त्या मुलींच्या गळां पडून रडत होत्या. कॉलेजच्या मुलींनाहि अनेक गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान मिळालें.

भारत सेवक समाजाच्या वतीनें शिवरी व तक्रारवाडी इत्यादि ठिकाणीं 'पंचवार्षिक योजनेवर भाषण करण्यास व शिबिरास भेट देण्यास मी गेलों असतां, शिबिरांत सर्व अधिकाऱ्यांनीं आपल्या

कॉलेजांतील मुलींच्या शिस्त, नेतृत्त्व, कलानिपुणता इत्यादि गुणांबद्दल प्रशंसोद्गार काढले. शिबिरांत सेवासदन ट्रेनिंग कॉलेज, आयुर्वेद महाविद्यालय इत्यादि ठिकाणच्या आलेल्या मुलींशीं सहकार्यानें कामें करून प्रशंसा मिळविल्याबद्दल आपल्या कॉलेजांतील स्वयंसेविका धन्यवादास पात्र आहेत.

दि. के. देशपांडे

---

# कला–मंडळ

या वर्षांपासून आपल्या महाविद्यालयांत ' कलामंडळ ' ही संस्था स्थापन झाली असून तिचें उद्‌घाटन रंगभूमीचे उपासक श्री. पार्श्वनाथ आळतेकर यांच्या ' अभिनयाचें शिक्षणांतील स्थान ' या भाषणानें दिनांक १५।७।५५ रोजीं झालें. विद्यालयांतील विद्यार्थि-विद्यार्थिनींना कलेच्या विविध अंगांची ओळख करून देण्याचें व त्यांच्यामधील गुणांना वाव देण्याचें कलामंडळाचें धोरण आहे. कलामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य ब. वा. भिडे हे असून प्रा. य. बा. राजे हे कार्याध्यक्ष आहेत. खजिनदार या नात्यानें प्रा. भुपटकर हे काम पहात असतात. शिवाय अध्यक्षांना प्रा. श्री. द. भावे, प्रा. श्री. गो. हुल्ल्याळकर, आणि प्रा. रा. रा. मालेगांवकर, त्यांच्या कार्यांत उत्साहानें मदत करीत असतात.

प्रथम कलामंडळाच्या सभासदांची बैठक दिनांक १७–८–५५ रोजीं होऊन श्री. चन्दू वाणी (तृ. व. कला) व श्री. विद्याचंद्र शहा (तृ. व. कला) यांची चिटणीस म्हणून निवड झाली. कलामंडळाच्या घटनेनुसार पुढील सभासदांची निवड कार्यकारीमंडळांत करण्यांत आली. (१) श्री. वसंत नूलकर (२) श्री. सुरेश जगताप (३) श्री. अरुण जोशी (४) कु. यमुना वझे (५) कु. शालिनी पेंढारकर ( यांच्याकडे अनुक्रमें गायन, व्याख्यान, नाटक, कला-प्रदर्शन असे विविध विभाग सोंपविण्यांत आले. ) शिवाय गायन व विविधगुणदर्शन यांकडे कार्यवाह श्री. चन्दू वाणी व विद्याचंद्र शहा यांनीं पहाण्याचें ठरलें.

आतांपर्यंत कलामंडळातर्फे पुढील कार्यक्रम यशस्वीरीतीनें पार पडले. विविध गुणदर्शनाचे दोन कार्यक्रम ( पहिला १४।९।५५ रोजीं, आणि दुसरा ३।१२।१९५५ रोजीं ) आणि श्री. भीमसेन जोशी यांच्या शास्त्रोक्त गायनाचा एक कार्यक्रम ( दिनांक ४।१०।५५ रोजीं ) झाला. विविध गुणदर्शनाच्या दोन्ही कार्यक्रमामध्यें आपल्या महाविद्यालयांतील कलावंतांना वाव देण्यांत आला होता. शिवाय " संगीताचें रसग्रहण " हे श्री. जोशी कोल्हापूरकर यांचे सप्रयोग व्याख्यान दि. १२।१२।१९५५ रोजीं अतिशय अप्रतिम झालें. त्यांना कोल्हापुराहून मुद्दाम पाचारण करण्यात आलें होतें.

ऑक्टोबर १९५५ मध्यें दिल्ली येथें झालेल्या दुसऱ्या विद्यापीठ युवक महोत्सवाकरितां पुणें विद्यापीठ संघाबरोबर प्रा. भुपटकर Contingent-in-charge म्हणून गेले होते.

दिल्ली येथील युवकमहोत्सवांत श्री. प्र. वि. दिवाकर (तृ. व. कला) यांना चित्रकलेंतील दुसरें व श्री. कृ. त्रि. प्रतिनिधि बी. एस्सी. (ऑनर्स) वर्ग यांना सतारवादनांतील तिसरें पारितोषिक मिळालें.

पुणें येथील रोटरीक्लबातर्फे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन नाटयस्पर्धेत कु. नलिनी तारकुंडे (द्वि. व शास्त्र) यांना अभिनय कौशल्याबद्दल पहिल्या नंबरचें बक्षीस मिळालें.

मुंबई राज्य क्रीडामहोत्सवांत आपल्या लोकनृत्याला पहिलें पारितोषिक मिळालें. महोत्सवाकरितां प्रा. य. बा. राजे व कु. ताराबाई केळकर यांनीं विद्यार्थ्यांचें नेतृत्व केलें. या महोत्सवामध्यें आपल्या विद्यार्थिनींच्या नृत्य संघाला उत्कृष्ट लोकनृत्याबद्दल पहिलें पारितोषिक मिळालें.

दरवर्षी जिमखान्यातर्फे होणाऱ्या गायनवादन स्पर्धा यंदा कला-मंडळातर्फे ता. २४ जानेवारी रोजीं घेण्यांत आल्या. वादनाचें पहिलें बक्षिस कु. प्रभावती फुलंब्रीकर (इंटर आर्ट्स) यांस, गायनाचें पहिलें बक्षीस श्री. म. ल. नाडकर्णी (इंटर आर्ट्स) यांस व तबल्याचें पहिलें बक्षीस श्री. नाडकर्णी (एफ्. वाय. आर्ट्स) यांस मिळालें.

श्री. दिवाकर, श्री. प्रतिनिधि, कु. नलिनी तारकुंडे, लोकनृत्यांत भाग घेणाऱ्या विद्यार्थिनींचें, नृत्यदिग्दर्शक श्री. मुळगुंद, आणि कलामंडळाच्या कार्यक्रमाच्या वेळीं ज्या कलावंतांनी आपापल्या कलेचा स्वाद कलामंडळाच्या सभासदांना दिला त्यांचें हार्दिक अभिनंदन.

वरील कार्यक्रम यशस्वी करण्यांत ज्यांनीं आम्हांला मदत केली त्यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभारी आहोंत. त्याचप्रमाणें कलामंडळाचे हिशेब वगैरे व्यवस्थित ठेवण्यांत व इतर कामांच्या बाबतींत मदत केल्याबद्दल श्री. प्र. इ. कापडी यांचे देखील आम्ही आभारी आहोंत.

कार्यवाह
**श्री. चन्दू वाणी** (तृ. व. कला)
**श्री. विद्याचंद्र शहा** (तृ. व. कला)



कलामंडळ-कार्यकारिणी १९५५-५६



मुंबई-राज्य क्रीडामहोत्सवामध्यें लोकनृत्याचें पारितोषिक मिळविणारा
नृत्यसंघ ( कलामंळाचे कार्यकारिणीसमवेत )



एन्. सी. सी. आर्मर्डस्क्वॉड्रन नं. २ चें पथक-मैदानी सामने,
रायफल ड्रिल व शिस्त यांमध्यें पाहिला क्रमांक मिळविला.



पी. टी. शिक्षक १९५५-५६

# साहित्य-विभाग

## मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाचें स्वरूप

लेखक : दि. के. देशपांडे, एम्. ए.

हिंदुस्थानचा इतिहास हा या देशांतील अनेक प्रांतांतील लोकांच्या व जमातीच्या कर्तृत्वानें बनलेला आहे. या सर्वांत महाराष्ट्रांतील लोकांनीं आपल्या कर्तबगारीनें व पराक्रमानें या इतिहासांत विशेष कामगिरी केली आहे, हें सर्वश्रुतच आहे. हिंदुस्थानचा इतिहास बनविण्यांत ज्याप्रमाणें मराठे आघाडीवर व प्रमुख होते त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासाचें संशोधन करून शास्त्रशुद्ध इतिहासलेखन करण्याच्या कामगिरींतहि मराठेच अग्रगण्य व प्रमुख आहेत हें विशेष होय. गेल्या ऐंशीं वर्षांत महाराष्ट्रांत इतिहासाविषयीं दाखविली गेलेली जिज्ञासा; इतिहास-संशोधन शास्त्रशुद्ध पायावर उभारण्यासाठीं केली गेलेली खटपट; त्यासाठीं कित्येक पुरुषांनीं सर्वस्वाचा त्याग करून केलेले परिश्रम व याविषयीं महाराष्ट्रांतील सर्वसामान्य जनतेंत झालेली जागृति याला भारताच्या इतर दुसऱ्या कोणत्याहि भागांत तोड आढळणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास केल्यावांचून हिंदुस्थानचा इतिहास लिहितांच येणार नाहीं हें जाणून व महाराष्ट्रांत इतिहाससंबंधीं संशोधन होऊन जें प्रचंड साहित्य प्रसिद्ध झालें आहे त्याचा उपयोग करून घेण्यासाठीं म्हणून बंगालमधील सर यदुनाथ सरकार, सुरेंद्रनाथ सेन, बानर्जी, सिन्हा इत्यादि मंडळी मुद्दाम मराठी भाषा शिकली व मराठ्यांच्यासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांचा उपयोग त्यांनीं इतिहासलेखनासाठीं केला हा विशेष नमूद करण्यासारखा आहे.

इतिहासाचें लेखन व संशोधन याचें स्वरूप अगदीं वेगवेगळें असतें. पाश्चात्य विद्वानांनीं परिश्रमपूर्वक इतिहास-संशोधनाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. इतिहासलेखन हें फार पूर्वींच्या काळापासून चालत आलेलें आहे. याच्या उलट इतिहासाचें शास्त्रशुद्ध संशोधन हा प्रकार नवीन आहे. पूर्वींच्या इतिहासांत अतिशयोक्ति, पाल्हाळ, विसंवादीपणा आणि बऱ्याचवेळां काल्पनिकपणाचा भागच विशेष असे. आख्यायिका, दंतकथा, लोककथा यांचाहि उपयोग पूर्वी इतिहासलेखनासाठीं होत असे. परंतु संशोधनाची प्रगति झाल्यापासून इतिहासलेखनाला आता विशेष काटेकोरपणा व बारकावा प्राप्त झाला आहे. इतिहासाच्या संशोधनांत पूर्वींचीं कागदपत्रें, पत्रांच्या नकला, फर्मानें, कैफियती, महजरे, करीणे, सरकारी नोंदी इत्यादि गोष्टींची बारकाव्यानें

छाननी करून सत्यासत्याचा पडताळा पाहण्याची कला प्राप्त होते. संशोधनांतून पूर्वीच्या इतिहास-लेखनांतील दोषस्थळें उघड होतात. उणीवा भरून निघतात; सत्य घटनांना दुजोरा मिळून घटनांची निश्चितता करतां येते. खरें बोलायचें म्हणजे इतिहाससंशोधनाच्या आधारावांचून निर्माण केलेला इतिहास परिपूर्ण व व्यवस्थित असूंच शकत नाहीं. इतिहाससंशोधनाला महत्त्व येण्याला या विशेष गोष्टीं कारणीभूत आहेत. ज्या भागांत व देशांत व्यवस्थित व शास्त्रशुद्ध इतिहास-संशोधन झालें आहे तेथें लिहिले गेलेले इतिहास व संशोधन होण्यापूर्वी प्रसिद्ध झालेले तेथील इतिहास बारकाव्यानें तपासले म्हणजे इतिहास-संशोधनाचें महत्त्व स्पष्ट होतें.

मराठ्यांचा इतिहास किंवा महाराष्ट्राचा इतिहास हा सतराव्या शतकाच्या सुरुवातीपासून विशेष प्रसिद्ध आहे. यापूर्वीचा महाराष्ट्राचा बराचसा इतिहास अज्ञात आहे. सुदैवानें गेल्या ७५ वर्षांत पुराण वस्तु संशोधकांनीं विशेष परिश्रमानें इसवी सनापूर्वीच्या कांहीं ऐतिहासिक घटनांचे दुवे जुळवून आतां निश्चित केले आहेत. डेक्कन कॉलेज, भारत इतिहास संशोधक मंडळ, सरकारचें पुराण वस्तु संशोधन खातें व या विषयाचे जिज्ञासू आणि तज्ज्ञ यांनीं सोपारा ( ठाणें जिल्हा ); जुन्नर ( पुणें जिल्हा ) कऱ्हाड ( उ. सातारा ), ब्रह्मगिरी ( कोल्हापूर जिल्हा ), नाशिक, जोरवे ( नाशिक जिल्हा ) बहाळ ( खानदेश ) या ठिकाणीं उत्खनन करून बरीच सामुग्री मिळविली. उत्खननांत नाणीं, मातीचीं भांडीं, दगडी व धातूचीं हत्यारें, जीवनोपयोगी संसारी वस्तु, मुलांची खेळणी, स्त्रियांचे दागिने, मणी, शिकारीचीं हत्यारें, घरें बांधण्याच्या विटा, प्रेतें पुरण्याच्या पेट्या किंवा इतर साधनें या वस्तू सांपडल्या. या वस्तूंचें वर्गीकरण करून, वस्तू सांपडलेल्या घरांचा अभ्यास करून, नाण्यांवरून कालगणना निश्चित करून इतिहासाचे दुवे सांधले जातात, रोमन नाणीं व भांडीं सांपडल्यास त्या प्रदेशाचा रोमन लोकांशीं केव्हांतरी संबंध होता हें निश्चित करतां येतें. त्याचप्रमाणें प्राचीन काळीं, निरनिराळ्या ठिकाणीं असणाऱ्या जमातींचे एकमेकाशीं असलेले संबंध कळतात. महाराष्ट्रांत सांपडलेल्या वस्तूंवरून इसवी सनापूर्वीं हजार वर्षांपर्यंत येथील संस्कृति जुनी होती हें ठरवितां आलेलें आहे.

या पुढचा इतिहास हा लेणी, मंदिरें, शिलालेख यांवरून निश्चिति करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. अजंठा, वेरुळ, कार्लें, भाजें, बेडसें, घारापुरी, कान्हेरी इत्यादि ठिकाणीं असलेल्या लेणी व विहारांवरूनहि या भागांतील इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे. जैन, बौद्ध व ब्राह्मणी काळांतील मूर्ती, स्तूप, शिलालेख व इतर कोरीव कामें यांवरून इतिहासज्ञांना कांहीं गोष्टी निश्चिति करतां आलेल्या आहेत. प्राचीन काळांतील उत्खनन व नंतरच्या काळांतील शिलालेखांचें वाचन यांवरून इतिहासाची साखळी जुळविणें अतिशय कठीण काम आहे. या बाबतींत इंग्रज संशोधकांनी सुरुवात करून अतिशय मेहनत घेतली व इतिहासकाळांतील बऱ्याच गोष्टी त्यांनी निश्चित केल्या हें त्यांचें ऋण मान्य करावें लागेल. प्राचीन धर्मग्रंथांचा व समाजाचा अभ्यास, शिल्पशास्त्राचा अभ्यास, ब्राह्मी, खारोष्टी इत्यादि लिप्यांची माहिती करून घेणें; संस्कृत, अर्धमागधी, पाली इत्यादि भाषांवर प्रभुत्व मिळवून प्राचीन काळांतील घटनांवर प्रकाश पाडण्याची अवघड परंतु अतिशय महत्त्वाची कामगिरी इंग्रज संशोधकांनीं पार पाडली व म्हणूनच पूर्वी सर्वस्वीं अज्ञात असलेल्या इतिहासाला आतां कांहींसें स्वरूप प्राप्त झालें आहे. या संशोधनविषयाचा काळ इसवीसनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून, इसवीसनाच्या चौथ्या शतकापर्यंत जातो. प्राचीन इतिहासाचीं साधनें जमिनीच्या खालीं तर या काळांतील

इतिहासांचीं साधनें दगडा-कपारींवर; डोंगरांतील लेण्यांत सांठविलेलीं आहेत. त्याचप्रमाणें या काळांतील राजघराण्याविषयीं व लोकस्थितीविषयीं बरीचशी माहिती बौद्ध व जैन यांचे संस्कृत व प्राकृत धर्मग्रंथ, हिंदूंचीं पुराणें, ब्राह्मणें व आरण्यकें यांतूनहि मिळते. महाराष्ट्रांतील सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार इत्यादि राजघराण्याविषयीं आतां बरेंचसें संशोधन झालेलें आहे. यांतील कांहीं घराणीं ख्रिस्तपूर्वकालीन तर शेवटचीं आठव्या नवव्या शतकांतील आहेत. व्हिन्सेंट स्मिथ, डॉ. भांडारकर, चिंतामणराव वैद्य, गिरींद्रशेखर बोस, ज्ञानकोषकार डॉ. श्री. व्यं. केतकर इत्यादि संशोधकांनीं या कालासंबंधीं अभ्यास करून बऱ्याच गोष्टीं उजेडांत आणल्या आहेत. यानंतर यादवांच्या काळापर्यंतचें इतिहाससंशोधन अजून पुरेसें व उपयुक्त झालेलें नाहीं. या काळांतील इतिहास हा काव्य, नाटकें यांतून लिहिला गेला आहे. या ग्रंथांची व ग्रंथ-कर्त्यांची कालगणना करणें कठीण असल्यानें हा इतिहास अपुरा राहिलेला आहे.

यादवांच्या काळापासून बहामनी राज्याच्या अखेरच्या काळापर्यंत संशोधनाची सर्व भिस्त मुसलमानी तवारिखांवर आहे. या तवारिखा इतिहास म्हणून लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या अपूर्ण, त्रोटक असून त्यांत चुकाहि फार असतात. कोठेकोठे अर्धवट टिकलेलीं हेमाडपंती देवळें या इतिहासविषयाचा पुरावा अजून जवळ बाळगून आहेत. मात्र त्यावर जीर्णोद्धाराचीं आलेलीं पुटें दूर सारून या पुराव्यांचा उपयोग करावा लागेल. क्वचित् एखादा मातींत दडलेला ताम्रपट बाहेर निघून एखाद्या ब्राह्मणाला राजानें दिलेल्या दानाची उपयुक्त माहिती सांगतो. तरी या काळावर अजून जास्त प्रकाश पडावयासाठीं फारशी कागदपत्रांचा, नाण्यांचा विशेष अभ्यास करावा लागेल.

शहाजीच्या उदयापासून पुढें पेशवाईपर्यंतच्या काळाचें इतिहास-संशोधन कांहींसें झालें आहे त्यापेक्षां कितीतरी अधिक होण्याला त्यांत वाव आहे. मराठी कागदपत्रें, राजाज्ञा, बखरी, फारसी फर्मानें, व इतर कागदपत्रें, नाणीं, ताम्रपट, देवळांतील, किल्ल्यांतील व इतर ठिकाणचे शिलालेख, संस्कृत काव्यग्रंथ, मराठी संतवाङ्मय इत्यादिवरून या वेळच्या बऱ्याचशा घटनांवर प्रकाश पडतो. महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधकांनीं यासाठीं विशेष कष्ट घेऊन बरीच माहिती उजेडांत आणली आहे. वर लिहिलेल्या सामुग्रीखेरीज आणखी एक विशेष प्रकारची सामुग्री या काळांत लिखाणाला मदत करते. पोर्तुगीज, डच, स्पॅनिश, फ्रेंच व इंग्रज व्यापाऱ्यांनीं या काळांत जी माहिती प्रसिद्ध केली आहे त्यामुळें कालगणना निश्चित होण्यास फार मदत होते. पूर्वीच्या काळांतहि ह्युएनत्संगसारख्या प्रवाशाच्या माहितीचा उपयोग होतो परंतु त्या काळांत इतकी भरपूर माहिती आढळत नाहीं. मात्र हे सर्व पाश्चात्य व्यापारी त्यावेळीं किनाऱ्या-किनाऱ्यावर वखारी बांधून असल्यानें त्यांच्या माहितींत ऐकीव म्हणून अविश्वासार्ह भाग बराच आढळतो.

पेशवाई कालखंडांत विशेषतः उत्तर पेशवाईसंबंधीं पुराव्याची उणीव भासत नाही. पेशवे दप्तरांत व इतर संग्रहांत असलेले एक लाखाचेवर रुमाल भरून कागदपत्रें या कालावर उपलब्ध आहेत. फारसी, इंग्रजी, फ्रेंच व इतर देशी भाषांतहि कागदपत्रें भरपूर आढळतात. इंग्रज, फ्रेंच प्रवाशयांनीं, पाद्र्यांनी, व्यापाऱ्यांनीं व लष्करी लोकांनीं लिहून प्रसिद्ध केलेले हजारों प्रवास-वृत्तांचे ग्रंथ या कालावर छापून प्रसिद्ध झालेले आहेत. यामुळें या भागावर सर्वांत अधिक प्रकाश पाडतां आला हें उघड आहे.

मराठ्यांच्या इतिहासावर संशोधन करून लिहिलेला पहिला ग्रंथ कॅप्टन ग्रँट डफ या इंग्रजाचा आहे. विल्क्सनें म्हैसूरचा, फोर्बसने गुजराथचा, टॉडनें राजस्थानचा व डफनें मराठ्यांचा असे चार इंग्रजांनीं लिहिलेले ग्रंथ हिंदुस्थानच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. डफने सातार्‍याला असतांना बरींच मराठी कागदपत्रें हस्तगत केलीं व हाताखालच्या कारकुनाकडून त्यांचीं भाषांतरेंहि करवून घेतलीं. कंपनी सरकारच्या कागदपत्रांचें भांडार तर त्याला खुलेंच होतें. या सर्वांचा उपयोग करून त्यानें अतिशय मेहनतीनें मराठ्यांचा इतिहास तीन खंडांत लिहिला. या इतिहासांत मराठी कागदपत्रें व परिस्थिति नीट न समजल्यानें बर्‍याच चुका झाल्या आहेत. या सर्व गोष्टीं खर्‍या असूनहि ग्रँट डफचा इतिहास अजूनहि संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडतो इतकी या ग्रंथाची थोरवी आहे.

ग्रँट डफच्या इतिहासावर पहिला हल्ला नीळकंठराव कीर्तने यांनीं १८६८ त चढविला. मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाच्या प्रथमावस्थेंत ग्रँट डफ व इतर इंग्रजी इतिहासकारांना खोडणें हाच हेतु मनांत धरून कांहींसें संशोधन झालें. १८७८ त 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकांतून एकापेक्षां एक सरस बखरी सुसंपादित व सटीक अशा प्रसिद्ध झाल्या. रावबहादूर का. ना. साने यांना याचें बेरेंचसें श्रेय द्यावें लागेल. इतिहासाच्या पुराव्याच्या-दृष्टीनें बखरी जरी आतां तितक्याशा विश्वासर्ह मानल्या जात नसल्या तरी समाजाला इतिहासाची गोडी लावण्यांत त्यांचा फार उपयोग झाला हे नाकारतां येत नाहीं. रा. ब. साने व 'काव्येतिहास-संग्रह' या मासिकाच्या इतर संपादकांनीं थोडीफार जुनीं कागदपत्रें प्रसिद्ध करण्याचा पायंडा पाडून संशोधनाचें नवीन युग सुरू केलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनांत मनोरंजकता आणून भरपूर कागदपत्रें प्रसिद्ध करण्याचें श्रेय रावबहादूर द. बा. पारसनीस यांना आहे. 'भारतवर्ष' व "इतिहास-संग्रह" या दोन मासिकांतून त्यांनीं बरीच महत्त्वाचीं कागदपत्रें प्रसिद्ध केलीं. पारसनिसांनीं संकलनात्मक असे लेख व ग्रंथहि बरेच लिहिले आहेत. त्यांची भाषा रसाळ व गोड असून लिहिण्यांत मार्दवता फार आहे. इतिहास-संशोधनाच्या निकषावर घासले असतां त्यांचे संकलनात्मक लिखाण फिकें पडतें हें मान्य करावें लागेल. पारसनिसांचें मुख्य कार्य म्हणजे त्यांनीं कै. वाड व मावजीशेठजी यांच्या मदतीनें पेशवेदप्तरचें आलोडन करून १५-१६ खंड प्रसिद्ध केलें हें होय. याशिवाय ग्वाल्हेर दरबारसाठीं त्यांनीं शिंद्यांचीं कागदपत्रें सप्तखंडांत छापून दिलीं तीं निराळींच. प्रवासवर्णनें, चटकदार पद्धतीनें त्यांनीं लिहिलेलीं चरित्रें, दंतकथा व आख्यायिका यांच्यामुळें त्यांचीं मासिकें लोकप्रिय झालीं व त्यांत प्रसिद्ध झालेलीं कागदपत्रें ओघानेंच त्यांमुळें समाजांत वाचलीं गेलीं. साने व पारसनीस यांनीं केलेलें इतिहास-संशोधन कांहींसे दुसर्‍याच्या मदतीवर अवलंबून होतें. व्यक्तिशः स्वतःच्या हिंमतीवर या क्षेत्रांत प्रवेश करून कायमचें नांव टिकविण्याचें श्रेय विश्वनाथ काशिनाथ राजवाडे व वासुदेव वामनशास्त्री खरे या दोघांना आहे. या दोघांनीं प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रा-मुळें मराठ्यांच्या इतिहासाला व संशोधनाला एक नवीन वळण लागलें.

. राजवाडे यांनीं "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" २२ खंडांत प्रसिद्ध केलीं आहेत. या साधनांचा पहिला खंड १८९६ त प्रसिद्ध झाला साधनग्रंथांच्या सुरुवातीस विवेचक, दीर्घ व माहिती-पूर्ण प्रस्तावना राजवाड्यांनीं लिहिल्या आहेत. या प्रस्तावनांत राजवाड्यांनीं आपली सर्व विद्वत्ता व संशोधनाचें मर्म पणाला लावलें आहे असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

**मार्क्सचीं कांहीं महत्त्वाचीं प्रमेयें :**

मार्क्सनें अर्थशास्त्राला कांहीं महत्त्वाचे सिद्धांत दिले आहेत. त्या सिद्धांतांचें चांगलें परिशीलन व्हावयास पाहिजे. कारण मार्क्सचे ग्रन्थ समजण्यास त्याचा फार फायदा होतो. व्हेबलेननें म्हटल्याप्रमाणें मार्क्सवाद (Theory of Marx) हा अत्यंत तर्कशुद्ध आहे. त्यांतील कोणतेंहि एकादेंच प्रमेय एकूण सर्व सिद्धान्तांपासून वेगळें काढतां येत नाहीं. मागील प्रमेयावर पुढील प्रमेय पूर्णपणें अवलंबून असतें व अशी विचारशृंखला पूर्ण होते. त्यामुळें प्रत्येक दुव्याला फार महत्त्व आहे.

मार्क्सचें एकूण सर्व तत्त्वज्ञान—येथें Marxian Philosophy as a whole हा अर्थ अभिप्रेत आहे-हें मूळ दोन धाग्यावर विणलें आहे. उभा धागा म्हणजे हेगेलचा विरोधविकास वाद ( Dialectics ) व आडवा धागा म्हणजे रिकार्डोचा श्रममूल्याचा सिद्धान्त. दुसऱ्याचा परामर्श ओझरता घेतला. विरोधविकासवाद येथें चर्चितां येत नाहीं. कारण आपण मुद्दामच केवळ अर्थशास्त्रीय प्रमेयें चर्चित आहोत. मार्क्सचा विरोधविकासवाद प्रत्येकास पूर्ण परिचित आहे असेंच धरून चालूं.

१ अतिरिक्त मूल्यसिद्धान्त— Theory of Surplus Value: मार्क्सनें श्रममूल्य सिद्धान्त हा पाया धरला व त्यावर हा सिद्धान्त रचला. वस्तूंचें उत्पादन केल्यावर कामगारास वेतन दिलें जातें. हें वेतन वस्तु-उत्पादनाचे वेळीं खर्ची घातलेल्या कामाचे तासावरून दिलें जातें. मात्र वस्तुविनियोगाचे वेळींचें जें मूल्य असतें तें उत्पादनमूल्यापेक्षां अधिक असतें. विक्रयमूल्य व उत्पादनमूल्यांत जो फरक पडतो तो फरक म्हणजे श्रममूल्याचा वाढावा ( अतिरिक्त ) मूल्य आहे. ह्या सिद्धान्तान्वयें मार्क्सनें अर्थशास्त्रांत फार मोठा बदल घडवून आणला. या विचारपद्धतींत कांहीं उघड दोष आहेत. पण हें मात्र खरें कीं अर्थशास्त्राच्या विचार-सरणींत यामुळें मोठा फरक पडला; प्रयुक्त अर्थशास्त्राचा ( Applied Economics ) भाग यापुढें विशेष दिसून येतो.

२ शोषणसिद्धान्त : Theory of Exploitation : श्रममूल्य व अतिरिक्त मूल्य यापुढील पायरी म्हणजे शोषणसिद्धान्त. श्रमिकाजवळ शरिराशिवाय कांहींहि नसतें. या शरिरानें तो श्रम करतो व उत्पादन करतो. उत्पादकाजवळ—जो बहुधा भांडवलदार असतो व अतएव उत्पादनसामुग्रीचा पूर्ण मालक असतो-सर्व असतें. श्रमिक उत्पादकाच्या इच्छाधीन असतो. अतिरिक्त मूल्य हें उत्पादकाकडे जाते व त्यांचेंच भांडवल बनतें. किमान उपजीविका वेतनाव्यतिरिक्त श्रमिकास कांहींच मिळत नाहीं. अशारीतीनें अतिरिक्त मूल्य श्रमिकाकडे न जातां भांडवलदार उत्पादकाकडें जातें व श्रमिकाचें शोषण होतें.

३ परिक्लेशन सिद्धान्तः Theory of Immiserization हा सिद्धान्त पूर्णपणें मार्क्सचा आहे. मार्क्स यास Theory of Verelendung म्हणतो. हेंच परिक्लेशनास कारण होतें. अतिरिक्तमूल्याच्या मदतीनें भांडवलदार अधिकच श्रीमंत होतो व श्रमिक अधिक असाहाय्य होतो. म्हणून मार्क्स म्हणतो "श्रीमंत अधिक श्रीमान् होतात व गरिब अधिक गरीब होतात.* मार्क्सवादाच्या पुढील सर्व डोलाऱ्यास या सिद्धांतामुळें फार मोठी बळकटी आली.

---

* Rich become richer; poor become poorer.

वर्षे त्यानें केवळ ग्रंथालयांतच काढलीं. आपल्या अभ्यासाकरतां संबंधित विषयोचें वाचन केलें व त्यांतून विचारमंथन करून ग्रंथसंपदा निर्माण केली. The Theory of Surplus Value हा त्याचा ग्रंथ Pure Economics या विषयांतील त्याच्या बुद्धिमत्तेची साक्ष देतो. या ग्रंथाच्या अभ्यासाचे वेळीं मार्क्सनें चार रात्रीं पूर्ण जागून काढल्या. या जाग्रणामुळेंच मार्क्सला पुढें बरेच दिवस पाठीचा त्रास सहन करावा लागला असें रुज* आग्रहानें सांगतो. यावेळीं मार्क्स मोठमोठ्या शास्त्रज्ञांचे ग्रंथ घेत असे व त्यांतील संबंधित उतारे हातानें वहीवर लिहून ठेवीत असे. अशा उताऱ्यांचे खालीं तो आपली स्वतःची टीका व विचार लिहून काढी. ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, से यांचे ग्रंथ त्यानें पचवून टाकले. शिवाय जेम्स मिल, मॅककुलॅाच, दे स्टूत दत्राक्षी, स्कारबेक, बायगिलबर्ट आदि विद्वानांचे ग्रंथही त्यानें वाचले. पुढें मार्क्सनें क्विन्सेच्या ग्रंथांचा अभ्यास केला.

## रिकार्डोच्या तत्त्वांचा प्रभाव.

तथापि मार्क्सच्या विचारसरणीवर रिकार्डोचा†च प्रभाव सर्वांत जास्त पडला. किंबहुना आपण रिकार्डोचे शिष्य आहोंत हें तो मोठ्या अभिमानानें सांगतो. रिकार्डोची बरींच तत्त्वें व सिद्धान्त मार्क्स घेतो. या पायावरच त्यानें आपल्या पुढील सिद्धांतांची उभारणी केली आहे. मार्क्सचीं एवढी लेखी कबुली असूनहि कित्येक मार्क्सवादी हे मानावयास तयार नसतात. त्याचें मुख्य कारण म्हणजे रिकार्डोच्या व मार्क्सच्या मांडणीत, शब्दांत व तर्कपद्धतींत बराच फरक आहे.

मार्क्स हा एक इतिहासाचा गाढा विद्वान होता. आणि म्हणूनच त्याच्या अर्थशास्त्रीय प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा इतिहासांतून होता हें विसरून चालणार नाहीं. या त्याच्या दृष्टीसच इतिहासाची बैठक म्हणतां येईल. ही थोड्याफार प्रमाणांत रिकार्डोसहि होतीच; पण मार्क्सच्या विवेचनांत समाजेतिहासाच्या पार्श्वभूमीवर विशेष भर दिला आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

श्रममूल्याचा‡ सिद्धान्त हा रिकार्डो व मार्क्स या दोघांचाही सारखाच. किंबहुना रिकार्डोच्या ह्या सिद्धान्तावरच मार्क्सने आपला श्रममूल्याचा सिद्धांत, अधिक साफसफाई करून उभारला. श्रमाचें मापन रिकार्डो कामाचे तासावर करतो व त्या तासावरून त्या श्रमाचें मूल्यमान ठरवतो. मार्क्सनेंही हीच पद्धति स्वीकारली आहे. फरक सांगायचाच झाला तर एवढाच सांगतां येईल कीं मार्क्स आपले सिद्धांत फारच ठामपणें मांडतो व मांडतांना भाषाही फारच जोरदार वापरतो. अशा रीतीनें मार्क्सवर रिकार्डोचें ऋण फार आहे.

---

* अर्नॉल्ड रुज : मार्क्सच्या पहिल्या सहकारी मित्रांपैकीं एक. यानें काढलेल्या Halle year Book या मासिकांतच मार्क्सनें आपलें पहिलें लिखाण केलें.

† डेव्हिड रिकार्डो:— (१७७२ ते १८२३) प्रख्यात इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ. "भाडें Rent हे जमिनीमधील नैसर्गिक फरकांमुळें आपसुकच निर्माण होते" या प्रख्यात सिद्धांतामुळें तो विशेष ओळखला जातो.

‡ श्रममूल्याचा सिद्धान्तः— Theory of labour value. हा सिद्धांत असा आहे : A value of a commodity is proportional to the quantity of labour contained in it—*seteres paribus*

लिपींतील नैपुण्य, तीक्ष्ण स्मरणशक्ति, वाचनांतील विपुलता व वैचित्र्य व त्यामुळें आलेला सखोलपणा, इतिहासांतील कार्यकारणभाव पाहून त्यावरून निर्णय घेण्याची बुद्धीची विशालता, या गुणांमुळें त्यांच्या इतिहास-संशोधनाला एक विशेष धार व दर्जा प्राप्त आहे हें निर्विवाद आहे. इतिहासकालांतील एखाद्या व्यक्तीविषयीं बोलतांना प्रा. शेजवलकर तिच्या आयुष्याचा सबंध कालपट सूक्ष्मपणें तुमच्यापुढें उभा करतील, तर म. म. पोतदार तुम्हांला सध्यांच्या काळांतून पूर्वीच्या काळांत ओढून नेतील. संशोधकाला जरूर असणाऱ्या सर्व गुणांनीयुक्त अशीं हीं दोन मोठीं माणसें मराठ्यांचा तौलनिक इतिहास लिहिण्यास सर्वथैव योग्य अशीं आहेत. त्यांना या कामाला प्रवृत्त करून त्यांच्याकडून लिखाण लिहून घेतलें गेलें तर मराठ्यांच्या इतिहासांत मौलिक ग्रंथांची भर निश्चितपणें पडेल.

वर उल्लेखिलेल्या व्यक्तींखेरीज आणखी २५-३० इतिहाससंशोधकांनीं, स्वार्थत्यागपूर्वक गेल्या ५० वर्षांत परिश्रम करून मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन आपल्यापरीनें केलें आहे. मराठींत प्रसिद्ध झालेल्या साधनग्रंथांइतके साधनग्रंथ हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत प्रसिद्ध झालेले नाहींत. त्याचप्रमाणें साधनांची चिकित्साहि इतकी दुसरीकडे कोठें होत नाहीं. संशोधनाला दिलेलें महत्त्व व त्याला आलेलें संघटित स्वरूप यांमुळें महाराष्ट्रांत इतिहासाला विशेष दर्जा प्राप्त झाला आहे. आज चारशेच्यावर साधनग्रंथ प्रसिद्ध होऊनहि त्यांचा इतिहासलेखनाला विशेष उपयोग अजून केला जात नाहीं; या उपयोगाअभावी हे ग्रंथ प्रसिद्ध करून न करून सारखेच आहेत असा स्पष्ट इशारा रियासतकार डॉ. सरदेसाई यांनी 'सह्याद्री'च्या दिवाळी अंकांत दिला आहे. हा इशारा सर्वांनीं लक्षांत घेण्याजोगा आहे असें वाटतें.

---

## अर्थशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स

लेखक : **वसंत नूलकर**, एम्. ए.

नवमतवादाचा पुरस्कर्ता, समाजचळवळीचा उद्गाता, किंवा कामगार संघटनेचा जनक म्हणून कार्ल मार्क्सची योग्यता फार उच्च समजली जाते. पण केवळ अर्थशास्त्रज्ञ (Economist) म्हणूनहि मार्क्सची योग्यता फार मोठी आहे. आधुनिक काळांत समाजशास्त्रज्ञांतहि मार्क्स इतका प्रसिद्ध, लोकप्रिय व बोलबाला झालेला समाजशास्त्रज्ञ क्वचितच आढळेल. तत्त्वज्ञानाचे अभ्यासू मार्क्सच्या विरोधविकासवादाचा अभ्यास करतात. इतिहासाचे अभ्यासू मार्क्सच्या इतिहासाची अर्थशास्त्राच्या दृष्टीनें उकल (Economic Interpretation of History) या विवेचनाचा अभ्यास करतात. समाजशास्त्रज्ञ मार्क्सच्या तत्त्वज्ञानामधील वर्गविग्रहांचा (Class Stuggles) अभ्यास करतात किंवा त्याच्या निवर्गी समाजाबद्दल (class-less society) विवेचन करतात. अशा रीतीनें मार्क्सच्या एकूण ग्रंथांत अनेक शास्त्रांच्या अभ्यासाचा परिपाक दिसून येतो. पण अर्थशास्त्रज्ञ म्हणूनहि मार्क्सला फार वरच्या दर्जाचें स्थान आहे.

मार्क्स हा एक जाडा विद्वान होता. त्याच्या चरित्राचें अवलोकन केलें असतां एक महत्त्वाची गोष्ट आपल्या लक्ष्यांत येते. ती म्हणजे त्याचें अफाट वाचन. आयुष्यांतील कित्येक

संसाराच्या मायापाशांत स्वतःला गुरफटून न घेतां, अहर्निश तीस वर्षें या महाभागानें मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनांत खर्ची घालून संशोधनांतील 'महर्षीपद' मिळविलें. संशोधनाला जरूर म्हणून सर्व हिंदुस्थान यांनीं पायाखालीं घातला. भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापून इतिहाससंशोधनाच्या कार्याला संघटित व स्थायी स्वरूप प्राप्त करून दिलें. त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं कागदपत्रें; साधनग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना; काव्य-व्याकरण व्युत्पत्ति. इतिहास या विषयांवर लिहिलेले लेख व ग्रंथ त्यांच्या प्रखर व तीक्ष्ण बुद्धिमत्तेची साक्ष देतात, मराठ्यांचा इतिहास व इतिहासाचें संशोधन यांत राजवाड्यांचें नांव अजरामर राहील यांत शंका नाहीं.

राजवाड्यांच्या समकालीन असलेले वासुदेवशास्त्री खरे हे मिरजेच्या हायस्कूलमध्यें संस्कृतचे शिक्षक होते. शिक्षकाचें काम करीत असतां मिरजमळा दप्तरांतील पटवर्धनांचा कागदसंग्रह यांनीं वाचून काढला. उत्तर पेशवाईंत पटवर्धन हे पेशव्यांचे विश्वासू सरदार असल्यानें त्या काळांतील पटवर्धन दप्तरांतील पत्रांना ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्व आहे. ही पत्रें शास्त्रीबोवांनीं वाचून, नकलून, व्यवस्थित संपादून १२ खंडांत प्रसिद्ध केलीं. प्रत्येक पत्राला माहितीपूर्ण टीपा देणें, विवेचक प्रस्तावना लिहिणें इत्यादि व्यवस्थितपणामुळें खरे यांचे "ऐतिहासिक लेखसंग्रह" फार उपयोगी पडतात. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे मराठींत ४०० च्या सुमारें ग्रंथ आतांपावेतों प्रसिद्ध झाले. परंतु वासुदेवशास्त्री यांच्याइतकें उत्तम संपादन कोणीहि केलेलें नाहीं. बरेचसे साधनग्रंथ म्हणजे हस्तलिखितांचे, कागदपत्रांचे छापील स्वरूपें आहेत, इतकेंच. यामुळें या साधनग्रंथांचा उपयोग करतांना कालापव्यय होऊन शिवाय इतर ग्रंथांची संदर्भासाठीं जरूरी लागते ती वेगळीच. गेल्या अर्धशतकांत मराठींत प्रसिद्ध झालेल्या इतिहासाच्या संकलित ग्रंथांसाठीं खरे यांच्या 'ऐतिहासिक लेखसंग्रहाचा' फार उपयोग झालेला आहे.

इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांत सतत कार्य करणाऱ्या व्यक्तींपैकीं सध्यांचे सर्वांना सुपरिचित असणारे डॉ. गो. स. सरदेसाई, म. म. द. वा. पोतदार व प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या कार्याचा व संशोधनाचा उल्लेख केला पाहिजे. रियासतकार डॉ. नानासाहेब सरदेसाई यांनीं गेलीं साठ वर्षें इतिहासाच्या अभ्यासांत व लेखनांत घालविलीं आहेत त्यांनीं पेशवे दप्तरचे ४६ खंड संपादून प्रसिद्ध केले. मराठ्यांचा इतिहास नव्यानें इंग्रजींत लिहिला. त्यांनीं लिहिलेल्या रियासती दोन पिढ्यांना संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडल्या आहेत व गेल्या ४०-५० वर्षे त्यांचा मराठी प्रदेशांत अज्ञापासून तज्ज्ञापर्यंत सर्वांकडून वापर होतो आहे यांतच त्यांच्या कार्याचें श्रमसाफल्य आहे. हजारों पत्रांच्या तारखा लावणें, घराण्यांच्या वंशावळी तयार करणें; व्यक्तींचे कार्यकारणभाव दाखविणें यांसाठीं त्यांनीं फार कष्ट घेऊन त्या कष्टाचें फल पुढच्या पिढ्यांना आयतें उपलब्ध करून दिलें आहे. रियासतीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं त्यांनीं प्रसिद्ध झालेल्या साधनग्रंथांचा व स्वतः संशोधन केलेल्या पेशवे दप्तराचा भरपूर उपयोग करून त्या संपूर्ण बदलल्या व सुधारून प्रसिद्ध केल्या. चिकाटीनें व तळमळीनें कार्य करून त्यांनीं महाराष्ट्राला ऋणी करून ठेवलें आहे.

महाराष्ट्रांतील सध्यांच्या संशोधकांपैकीं प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर व म. म. पोतदार यांचा इतिहासाचा अभ्यास सूक्ष्म व दांडगा आहे. गेलीं चाळिसाच्या वर वर्षे त्यांनीं इतिहास-ग्रंथांच्या वाचनांत व इतिहास-संशोधनांत घालविलीं आहेत. वाचनांतील बारकावा, मोडी

४ प्रस्फोट सिद्धांत Theory of Bursting Capitalistic Evolution : पुढील पायरी म्हणजे भांडवलशाहीचा स्फोट होऊन नाश. याला मार्क्स Zusammenbruchstheorie हें नांव देतो. हा सिद्धान्त विरोधविकासवादावर पूर्णपणें आधारित आहे. शोषण व परिक्लेशन हें समाजास असह्य होतात व मग त्या उद्रेकांतूनच शक्तीचा स्फोट होतो. ह्या क्रान्तीचें जनकत्व भांडवलशाहीकडेच आहे. पण ती आपल्या जनकाचें अस्तित्वच उरूं देत नाहीं. यांतूनच जुनी समाजरचना बदलून नवी समाजरचना येते. हाच विरोधविकास होय.

## पुनश्च इतिहास :

मार्क्सचे अर्थशास्त्राचे सिद्धान्त अगदीं थोडक्यांत पाहिले. या सर्व विवेचनांत एक महत्त्वाची गोष्ट आपणांस कळून येते. चिकित्सापद्धतीस मार्क्सनें एक वेगळें वळण लावलें. तें म्हणजे वर उल्लेखिलेली " इतिहासाची अर्थशास्त्रदृष्ट्या उकल ( Economic Interpretation of History ). इतिहासाची भौतिक संशोधना ( Materialistic Conception of History ) ही पूर्णतया हेगेलीय विचारसरणी आहे. तिच्यावर विशेष भाष्य व विस्तृतीकरण फॉरबाखनें केलें. मार्क्सनें मानवेतिहासाचा भौतिक अर्थ घेतला व त्याची आर्थिक उकल करून दिली. येथपावेतों जेवढे विद्वान् झाले आहेत त्यांनीं इतिहास हा इतिहासापुरता ( Collection of Facts ) घेतला. मार्क्सच्या तत्त्वज्ञानांत इतिहास व अर्थशास्त्र यांचे केवळ मिश्रण ( Mixture ) नाहीं, तर तें एक रासायनिक एकीकरण Chemical Combination आहे.

## मूल्यमापनः

आतांपर्यंत मार्क्सच्या केवळ अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांचाच आढावा घेतला. तोहि इतक्या थोडक्यांत कीं मार्क्ससारख्यावर अन्याय होतोच व आपलीहि अल्प बुद्धि प्रदर्शित होते. त्याहून अधिक कठीण मूल्यमापन. तथापि तेंहि एक अभ्यासाचाच भाग आहे हें विसरून चालणार नाहीं.

प्रथमतः श्रममूल्याचा सिद्धान्त फार एकतर्फी आहे. त्यांत प्रत्यक्ष उत्पादनावर, उत्पादन पद्धतीवर व उत्पादनांत श्रमाव्यतिरिक्त भाग घेणाऱ्या घटकांचा विचारच केला जात नाहीं. ही विचारपद्धति मार्क्सचीच आहे असें नाहीं रिकार्डोचीहि आहे. त्याहूनहि फार मोठा दोष-ज्याला विचारपद्धतींतील उणीवा म्हणतां येतील असा-म्हणजे परिक्लेशनाचा सिद्धान्त होय. भांडवलवादामुळें श्रमिकांस उत्तरोत्तर अत्यंत क्लेश सहन करावे लागतात, व लागतील; आणि त्यांचें जीवमान Standard of Living फार खालीं जाईल हें मार्क्सचें प्रतिपादन आहे. पण प्रत्यक्षांत फार मोठी तफावत आढळली. यांत खरी गोष्ट अशी आहे कीं या सिद्धान्तांचे मुळाशीं रिकार्डोच्या Industrial reserve army ची कल्पना आहे. यांत्रिकीकरणामुळें जी बेकारी उत्पन्न होते तिला-त्या बेकारांना—Industrial reserve army म्हटलें आहे. या सर्व विवेचनांत मार्क्स कधीं नव्हता इतका पूर्णपणें रिकार्डोवर अवलंबून आहे. यांत्रिकीकरणास अगदीं प्राथमिक अवस्थेंत पहाणाऱ्या रिकार्डोनें असें म्हणणें फारसें वावगें दिसत नाहीं. पण मार्क्सनें तीच चूक पुढें चालविणें, एवढेंच नव्हे तर त्यावर सिद्धान्त बसवून अगदीं जोरदार शब्दांत त्याच्या खरेपणाबद्दल शंभर टक्के हवाला देणें ह्यांत बराच दोष आहे हें म्हणणें प्राप्तच होतें.*

" Marx undoubtedly held that in the course of Capitalistic evolution, real wage rates and the standard of life of the masses

* यावरील प्रो. शुमपीटर यांचे खालील विचार अत्यंत मननीय आहेत.

would fall, in the better paid, and fail to improve in the worst paid strata, and this would come about not through any accidental or environmental circumstances, but by virtue of the very logic of the capitalist process. As a prediction this was of course singularly infelicitous, and Marxists of all types have been hard put to it to make the best of clearly adverse evidence that confronted them." Capitalism, Socialism and Democracy—p. 34 v.

पण याहूनहि अधिक गुंतागुंतीचा प्रश्न आहे वर्गविग्रहाच्या आर्थिक मीमांसेचा! विषय अत्यंत कठीण आहे व मार्क्सनें आपल्या सिद्धान्ताकरतां वर्गविग्रह हा तर पायाच घेतला आहे. मार्क्सचा वर्गविग्रह हा "भौतिक" material आहे. येथें भौतिक किंवा material या शब्दाचा रूपकात्मक उपयोग आहे. या शब्दाचा उपयोग mechanical, physical या अर्थानें केला नाहीं, तर मार्क्सला material म्हणजे economic "अर्थशास्त्रीय" हा अर्थ अभिप्रेत होता. हा विग्रह बुद्धिपुरस्सर conscious आहे व यामुळेंच समाजाचें हित होणार. असा हा वर्गविग्रह " बहुजनसुखाय बहुजनहिताय " आहे. येथे मार्क्सवाद व डार्विनचा उत्क्रान्तिवाद यांत केवढा तरी फरक आहे. डार्विनच्या उत्क्रांतिवादांत विग्रह असला तरी तो बुद्धिपुरस्सर नाहीं. तो निसर्गाकडून अपरिहार्य-अटळ आहे. यांत भौतिक किंवा material असें मुद्दाम नाहीं. तर परिस्थिति—circumstances–जन्य व अनुरूप आहे. उत्क्रान्तिवादांत विग्रहाचा परिणाम हा संचयी cumulative आहे. आणि म्हणून तो प्रतिगामीच regressive असेल किंवा पुरोगामीच progressive असेल असें सांगतां येत नाहीं. मार्क्सच्या मतानें वर्गविग्रह हा पुरोगामीच रहाणार व अशा वर्गविग्रहांतूनच वर्गरहित, निवर्गी classless समाजरचना होणार. हा मार्क्सचा आग्रह फोल ठरला.

**अर्थशास्त्रज्ञ मार्क्स :**

असें जरी असलें तरी अर्थशास्त्रज्ञ म्हणून मार्क्सची योग्यता फार मोठी आहे. अनेक विद्वानांच्या मतानें मार्क्सचे जे सिद्धान्त आहेत ते अतिव्याप्त व फारच सामान्यित (generalized) आहेत. हा आक्षेप खरा आहे. कारण मार्क्सला मानवाचा सामाजिक इतिहास हा अर्थशास्त्राच्या भिंगांतून दिसतो. अर्थातच अर्थशास्त्र व समाजशास्त्र हीं दोन्हीं ज्या सिद्धान्तांत एकवटलीं तेथें त्या सिद्धान्तांत सैलपणा आलाच. समाजशास्त्र हें जात्याच सैल प्रकृतीचें आहे. त्यांत भौतिकशास्त्राप्रमाणें काटेकोरपणा येणार नाहीं.

पण या सामान्यित प्रमेयांमुळेंच मार्क्सचा थोरपणा वाढतो. आपल्या उत्तुंग बुद्धीच्या झेपेनें त्यानें साऱ्या मानवी समाजेतिहासाला अर्थशास्त्राच्या लोखंडी चौकटींत आणलें. आणि अर्थशास्त्रांतील चिकित्सापद्धतीसच वेगळें वळण लावलें. आणि म्हणूनच १८७२ सालींच Das Kapital च्या प्रथम खंडावर अभिप्राय देतांना फ्रान्समधील विद्वान् प्राध्यापक ब्लोकनें म्हटलें " Par cet ouvrage, M. Marx, se classe parmi les esprils analytiques les plus eminents. कॅपिटल या ग्रंथामुळें मार्क्स हा लोकोत्तर अशा पृथक्करणतज्ज्ञ लेखकांत गणला जाईल. मार्क्सच्या सिद्धान्ताचा पडताळा आज खरा ठरो वा खोटा ठरो, मार्क्सच्या लोकोत्तरत्वाबद्दल त्यामुळें कधींच शंका येत नाहीं. अर्थशास्त्रज्ञामध्यें मार्क्सचें स्थान श्रेष्ठ आहे.

( लेखांत वापरलेले पर्यायशब्द डॉ. रघुवीरांच्या बृहत् कोशांतील आहेत. )

# आजची मराठी लघुकथा

लेखकः—**द. वा. जितकर.** सीनि. बी. ए. ( मराठी स्पेशल )

गेल्या ५०–७५ वर्षांमध्यें मराठी साहित्याचा बहुविध विकास झालेला आढळून येतो. विविध अशा वाङ्‌मयप्रकारांची जरी आजच्या मराठी साहित्यांत कांहींशी उणीव भासत असली तरी कथा व काव्य हे दोन वाङमयप्रकार मात्र खूपच प्रगत झालेले दिसतात. हरिभाऊ आपट्यांपासून ते आजच्या गोखले-गाडगिळांपर्यंत व केशवसुतांपासून ते आजच्या बापट-पाडगांवकरांपर्यंत मराठी कथा आणि काव्याचा प्रवाह अप्रतिहत वहात आहे, ही गोष्ट मराठी साहित्याच्या अभिवृद्धीची, प्रगतीची व भविष्यकाळाविषयीं आशा निर्माण करणारी आहे यांत मुळींच शंका नाहीं.

**लघुकथा-व्याख्याः**—आजच्या लघुकथेचें स्वरूप या ठिकाणीं पहाण्यापूर्वी लघुकथा म्हणजे काय ? हें पाहणें आवश्यक ठरेल. प्रा. ना. सी. फडके यांनीं आपल्या प्रतिभासाधनांत— " शक्य तितक्या परिणामकारक रीतीनें व शक्य तेवढ्या कमी पात्र-प्रसंगांच्या साहाय्यानें सांगितलेली एकच एक कथा, म्हणजे लघुकथा " अशी लघुकथेची व्याख्या केलेली आहे. उत्कंठा, विस्मय, सुरगांठ, निरगांठ, उकल हे तिचे विशेष म्हणून सांगितलेले आहेत. या व्याख्येच्या कसोटीवरून आजच्या लघुकथेचें स्वरूप पाहण्याआधीं कालची लघुकथा कशी होती, हें पाहणें अनेक दृष्टींनीं उचित ठरणार आहे.

**कालची लघुकथा :**—ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर मराठी लघुकथेच्या जनकत्वाचा वारसा कादंबरीच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें हरिभाऊ आपट्यांच्याकडे जातो, त्याचप्रमाणें लघुकथेच्या बाबतींतसुद्धां तो त्यांच्याकडेच जातो. याचा अर्थ हरिभाऊंच्यापूर्वी लघुकथा निर्माणच झाली नसेल असा नाहीं, परंतु एकतर तिला व्यवस्थित स्वरूप नव्हतें व दुसरी गोष्ट म्हणजे तिला लघुकथाच नक्की म्हणतां येईल कीं नाहीं याची शंका होती. हरिभाऊंच्या आधींच्या कथावाङ्‌मयाचें स्वरूप अत्यंत बालिश व पोरकट होतें. हरिभाऊंनीं आपल्या ' करमणूक ' पत्रांतून स्फुट गोष्टी लिहिल्या आणि त्या थोड्याच काळांत लोकप्रिय झाल्या. मराठी कथावाङ्‌मयाचा पाया या कथांनीं घातला असें म्हणावयास हरकत नहीं. नवीन आधुनिक लेखनतंत्राची हरिभाऊंना माहिती नसल्यामुळें अर्थातच त्यांच्या कथा तंत्रशुद्ध व निर्दोष असणें शक्य नव्हतें तरी परंतु या कथांनीं त्या काळच्या वाचकांना चांगलीच मोहिनी घातली यांत शंका नाहीं आजहि हरिभाऊंच्या स्फुट गोष्टी त्यांतील दोष गृहित धरूनहि वाचक मोठ्या आवडीनें वाचतो. हरिभाऊंची निरीक्षणशक्ति खूपच मोठी असल्यामुळें व एक प्रकारची सामाजिक आशयाची बैठक त्यांच्या कथांना असल्यामुळें त्यांच्या कथांवर सामाजिक छाप पडणें अपरिहार्य ठरते. या कथेचा विस्तारहि आजच्या लघुकथेच्या उलट होता. पाल्हाळिक भाषाशैली, विस्कळित कथारचना, तंत्र शुद्धतेचा अभाव, पुनरुक्ति या गोष्टी त्यांच्या कथावाङ्मयांतील दोष म्हणून सांगतां येतील.

हरिभाऊंच्या नंतर फडके, खांडेकर, वामन चोरघडे, दिवाकर कृष्ण, य. गो. जोशी, श्री. म. माटे इत्यादि लेखकांनीं मराठी कथा-वाङ्मयांत मोठी मोलाची भर घातली. १९२० नंतर लिहिल्या गेलेल्या गोष्टी या कथारचनेच्या दृष्टीनेंहि बऱ्याच वरच्या दर्जाच्या होत्या. कृत्रिम भाषाशैली व ढोबळ व्यक्तिचित्रें यांची पायरी ओलांडून या कथा जीवनाचा नवा शोध घेण्याचा, आयुष्याचा नवीन अर्थ उलगडून सांगण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. सामाजिक कौटुंबिक, प्रणयप्रधान असे कांहींसें विविधत्व या कथांमधून दिसतें. सामान्य माणसांच्या सुख-दुःखाचे पडसाद, नादनिनाद या लघुकथांमधून ऐकावयास मिळतात. त्यांच्या जीवनाचे कांहींसे वास्तववादी व कांहींसे कल्पनारम्य ( Romantic ) असें दर्शन या लघुकथांतून पहावयास मिळतें. इतिहासदृष्टया हा दुसरा कालखंड म्हणूनच अतिशय महत्त्वाचा ठरेल. अनेक दृष्टींनीं याची कामगिरी मराठी लघुकथेच्या इतिहासांत संस्मरणीय ठरणारी आहे.

**आजची लघुकथा : स्वरूप.** स्थूलमानानें जिला 'आजची लघुकथा' असें म्हणतां येईल ती १९४० नंतरच रूढ झाली. याच सुमारास गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर व पं. महादेवशास्त्री जोशी या तरुण लेखकांची तिसरी पिढी मराठी लघुकथेच्या क्षितिजावर उदय पावली आणि अवघ्या ८-१० वर्षांच्या अवधींत या लेखकांनीं मराठी साहित्यांत स्वतःचें असें एक नवीन युग निर्माण केलें कीं ज्याला आपण सध्या 'नवकथेचें युग' म्हणून ओळखतों. स्वतःचें स्वतंत्र वैशिष्ट्य स्थापित करून या लेखकांनीं आधीच्या मराठी लघुकथेला एक नवीन वळण लावण्याचा, नवीन दिशा दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजच्या लघुकथेचे प्रातिनिधिक लेखक म्हणून या नवीन पिढीचा निर्देश मराठी लघुकथेच्या इतिहासांत करावा लागेल. यांतहि पुन्हां प्रत्येकाचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहेच. यांपैकीं अस्सल नवकथाकार म्हणून फक्त गोखले-गाडगीळ या दोघांचाच उल्लेख करावा लागेल, ग्रामीण कथाकार म्हणून माडगूळकरांचा व कौटुंबिक थोडेंसें जुन्या वळणाचे कथाकार म्हणून महादेवशास्त्रींची नोंद या ठिकाणी घ्यावी लागेल. पु. भा. भावे या सर्वांपेक्षां निराळे आहेत. जीवनाच्या विविध अंगांचे, मानवी व्यवहाराच्या निरनिराळ्या कक्षांचे, जगांतील वेगवेगळ्या अनुभवांचें दर्शन आजच्या या कथालेखकांच्या कथांतून कसें घडत आहे तें पाहूं

**मनोविश्लेषणपर कथा :** कथानकप्रधान, घटनाप्रधान, व्यक्तिप्रधान इत्यादि विविध अवस्थांतून संचार करीत आजची लघुकथा 'मनोविश्लेषणा' ( Psychological ) पर्यंत येऊन पोहोंचली आहे. गोखले व गाडगीळ हे या पंथाचे अध्वर्यु. या कथांना सलग असें कथानक जवळ जवळ नसतें असें म्हटलें तरी चालेल. मनोविश्लेषण म्हणजे मानवी मनाचें, त्या मनाच्या व्यापाराचें, त्याच्या बारिकसारिक हालचालींचें समग्र चित्रण करणें. मानवी भावना, विचार, विकार यांचे पिंजून पिंजून सूक्ष्म विवेचन करणें म्हणजे मनोविश्लेषण. मनांतील एखादा लहानसा धागा घेऊन त्यावर हे लेखक आपल्या कथेची इमारत रचतात. वाङ्मयापेक्षां अंतर्मनाला ( Subconscious mind ) ते जास्त महत्त्व देतात, त्याची खळबळ वर्णन करून सांगतात. 'मनोविश्लेषण' हें आजच्या कथेचें प्रधान अंग बनूं पहात आहे. लेखकाचा जीवनाचा व जगाचा व्यापक अनुभव व सूक्ष्म निरीक्षणशक्ति यांमुळें या कथा वाचनीय होतात. विचार, भावना यापेक्षां विकारांचेंच प्राबल्य अशा कथांमधून बहुधा जास्त आढळतें.

यांत्रिक जीवनाला कंटाळलेली गोखल्यांची 'मंजुळा', पतीच्या मित्राच्या ऋणाखालीं दबली

गेलेली त्यांची 'रिक्ता', म्हातारपणी गतकालाचें चिंतन करणारी त्यांची 'गोदूआत्या' म्हणूनच वाचकांना अधिक जवळची वाटते. मध्यमवर्गीय व्यक्तींच्या सुखदुःखाचे, किंबहुना सुखापेक्षां दुःखाचेंच, यांत्रिक युगामुळें पिचलेल्या, दबलेल्या, विकलित बनलेल्या मनोवृत्तीचें चित्र आजची ही मनोविश्लेषणपर नवकथा रंगविते. त्यांच्या आशा-आकांक्षा, आशानिराशा यांचें प्रतिबिंब या नवकथांतून दिसून येते. मनाच्या संज्ञाप्रवाहाचे ( Stream of consciousness ) चित्तवेधक असें दर्शन ही नवकथा घडविते. क्वचित् अतिवास्तववादाच्या नांवाखालीं आढळणारीं कामपिपासेचीं आत्यंतिक वर्णनें ( उदा० परितशी, सुमंत्र-भावे ) समाजांत निषिद्ध ठरलेल्या व्यभिचाराचा अप्रत्यक्ष पुरस्कार, सहसा कोठें न आढळणाऱ्या विकृत मनोवृत्तीचें चित्रण व कांहीं प्रसंगीं दुर्बोध भाषाशैली, नव्या प्रतिमा इ. गोष्टी या नवकथेचे दोष म्हणून दाखवितां येतील, तरी परंतु लेखकाची समाजाकडे पाहण्याची दृष्टि, त्याची निरीक्षणशक्ति, भाषाप्रभुत्व, अंतर्मुख वृत्ति या गोष्टींहि या कथांवरून व्यक्त होतात.

**प्रादेशिक कथा :** मनोविश्लेषणाप्रमाणेंच 'प्रादेशिकता' किंवा वेगळ्यां शब्दांत सांगावयाचें झालें तर 'ग्रामीणता' हाहि एक आजच्या लघुकथेचा प्रधान विशेष बनलेला आहे. कालच्या लेखकांपैकीं प्रा. श्री. म. माटे व आजच्या लेखकांपैकीं व्यंकटेश माडगूळकर हे या प्रकाराचे प्रमुख आधारस्तंभ. ग्रामीण जीवन (Pastoral life) हाच या लघुकथांचा मुख्य विषय असल्यामुळेंच त्या अनुरोधानेंच भाषाशैली, वर्णनशैली, व्यक्तिचित्रें, कथानक, घटना या गोष्टी या कथांतून येणार. मराठी साहित्याला अज्ञात असणाऱ्या या दालनाचें दर्शन आजच्या कथांतून माडगूळकर घडवितात. खेड्यांतील शेतकरी वर्ग-सकाळीं उठून शेतावर जाण्यापासून ते तेथील काम आटोपून संध्याकाळीं घरीं परत येईपर्यंत त्याचा नित्य कार्यक्रम, नांगरटीपासून पिकें काढण्या-पर्यंतचे वार्षिक कार्यक्रम व दसरा, पाडवा, शिमगा, तमाशा यासारखे नैमित्तिक आनंदाचे प्रसंग व त्याचबरोबर दुष्काळ, दारिद्र्य, कलह, घराण्यांतील वैर, अज्ञान, अधिकाऱ्यांची मगरूरी इ. विविध अंगांचें चित्रण या कथांतून आढळतें. पुणें-मुंबई किंवा सदाशिव पेठ-गिरगांव यांच्याबाहेर पसरलेल्या असंख्य व्यक्तींच्या मनाची, त्यांच्या जीवनाची, त्यांच्या जगाची ओळख माटे-माडगूळकर आज मराठी वाचकांना या कथांच्या द्वारें करून देत आहेत. प्रभावी व्यक्तिचित्रण व जीवंत रसरशीत भाषा व वर्णनशैली यांच्याच जोडीला लेखकाचा स्वानुभव असल्यामुळें माडगुळकरांची 'माणदेशी माणसें' जिवंत वाटलीं किंवा माट्यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' पाहून वाचकाचें अंतःकरण ओलावलें तर त्यांत नवल नाहीं. किंबहुना आजच्या मराठी लघुकथेचें खरें वैभव हेंच आहे, असें म्हणावें लागेल. मूठभर सुशिक्षितांशिवाय बाहेर जो अथांग अडाणी निरक्षर समाज पसरलेला आहे त्याचें दर्शन या कथांतून घडतें. त्यांच्याच भाषेतून सांगितलेलीं त्याचीं सुखदुःखें वाचकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतात.

मराठींतील एक उपेक्षित वाङ्मय दालनाचें भांडार माडगुळकरांनीं खुलें केलें असल्यामुळें त्याचें वैभव अत्यंत वाढलें आहे. कथाविश्वाची, प्रतिभेच्या सामर्थ्याची मर्यादा ध्यानांत घेऊनसुद्धां या लेखकांनीं या प्रकारांत मिळविलेलें यश स्पृहणीय आहे असेंच म्हणावें लागेल. एका ठराविक चाकोरींतून चालणाऱ्या मराठी लघुकथांना या प्रादेशिकतेमुळें एक नवीन वळण मिळालेलें आहे. शेतकरी, गुन्हेगार, दरवडेखोर, रामोशी, शाळामास्तर इ. विविध व्यक्तींचीं चित्रें कमालीची वास्तववादी ( Realistic ) अशीं उमटलेलीं या लघुकथांतून आढळतात. या

प्रादेशिकतेमुळेंच माडगुळकरांची ' बनगरवाडी ' व श्री. ना. पेंडसे यांची ' गारंबीचा बापू ' या कादंबऱ्या मराठी वाङ्मयाचें भूषण ठरल्या आहेत. माणदेशची ही दौलत म्हणूनच अनेक दृष्टीनें आजच्या लघुकथेंत महत्त्वाचें नि मानाचें स्थान मिळवून राहिली आहे.

**कौटुंबिक कथाः**— सुमारें २५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या य. गो. जोशी यांच्या ' वहिनींच्या बांगड्या ' व ' शेवग्याच्या शेंगा ' या कथांचें मराठी रसिकांनीं केलेलें कौतुक पाहिल्यानंतर, कौटुंबिक कथेबद्दलची वाचकांची ओढ अजून कमी झालेली दिसत नाहीं ही गोष्ट आढळून येते. वास्तविक ' कौटुंबिक ' असा निराळा प्रकार आजच्या लघुकथांचा पाडतां येणार नाहीं. कारण बहुतेक साऱ्याच कथांमधून कौटुंबिकता कोठें ना कोठें तरी डोकावतेच. पति-पत्नीचें प्रेम, गृहकलह, मुलांबद्दलचें वात्सल्य, बंधु-भगिनीचें निर्मळ, सात्त्विक प्रेम, दीर, भावजय यांचें विशुद्ध प्रेम, मातृप्रेम अशा विविध रूपांचें चित्र या कौटुंबिक कथांमधून रंगविलेलें दिसतें. आजच्या लेखकांत पं. महादेवशास्त्री जोशी हे अशा प्रकारचें लेखन करणारे प्रमुख लेखक आहेत. यांसाठीं व्यापक सहानुभूतीची, विशाल अनुभवाची, सूक्ष्म निरीक्षणशक्तीची जरूरी असते. सुदैवानें या सर्व गोष्टी शास्त्रीबुवांच्या जवळ भरपूर प्रमाणांत असल्यामुळें त्यांच्या कथा या नव-लेखकांबरोबरच आपलें स्वतःचें असें स्वतंत्र वैशिष्ट्य दर्शवितात. पार्श्वभूमीसाठीं गोमंतकाच्या निसर्गसुंदर प्रदेशाचाहि कांहीं वेळां आश्रय घेतात. या कथेचें दुसरें वैशिष्ट्य असें कीं यांतील पात्रांच्या तोंडीं घातलेली भाषा घरगुती, सोपी व दररोजच्या बोलण्यांतील असावी लागते. कथानकाचा सर्वांत महत्त्वाचा घटक, आणि तो म्हणजे ' कथारचना ', यांकडे ते जास्त लक्ष पुरवितात. भाषा थोडीशी संस्कृतप्रचुर असते. क्वचित् तिला प्रादेशिकतेचाहि वास येतो. तरी त्यांच्या कथेची मुख्य बैठक कौटुंबिक असल्यामुळें त्यांच्या कथा नेहमीपेक्षां आगळ्या नि वेगळ्या वाटतात हें खास. य. गो. जोशींची परवांच प्रकाशित झालेली ' दुधाची घागर ' कौटुंबिक कथा आवडणाऱ्या रसिकांची तहान पुरवील. आपण दररोज जें जीवन कुटुंबांत जगतों त्याचेंच चित्रण या कथांतून आढळत असल्यामुळें या कौटुंबिक कथांची गोडी अजून कमी झालेली दिसत नाहीं.

**नवीं प्रतीकें :**—आजच्या लघुकथेचें स्वरूप स्थूलमानानें कसें आहे हें आपण पाहिलें. कथारचनेबरोबरच भाषाशैलीचाहि विचार करणें या ठिकाणीं आवश्यक आहे. बदलत्या काळाला अनुसरून नव्या प्रतिमा, नवीं रूपकें, नवीं प्रतीकें यांचा वापर आजचा लेखक आपल्या कथांमधून करतो. चंद्र, नक्षत्रें, समुद्र, वृक्ष, लता, कमळ इ. संकेत झुगारून देऊन दररोजच्या व्यवहारांतील उपमा, रूपकांचा उपयोग आजचा लेखक करतो. यामुळेंहि आजची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. 'स्टेनलेस स्टीलच्या ताटासारखें' स्वच्छ आकाश 'गर्भारशी बाईप्रमाणें चालणारी वाऱ्याची मंद हाल-चाल' 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' ' समाधानाच्या तुपानें थबथबलेला चेहरा' अशा तऱ्हेची क्वचित् दुर्बोध परंतु बहुतांशी अचूक अशीं रूपकें आजच्या कथांतून दिसतात. या लेखकांच्या भाषा सामर्थ्याबद्दलहि शंका घेतां येणार नाहीं. भाषेवर त्यांचें विलक्षण प्रभुत्व दिसून येतें. ( उदा० मुक्ति, देव्हारा —पु. भा. भावे )

**नवीन पिढी :**—आजच्या लघुकथेचें स्वरूप हें असें अंतर्बाह्य बदललेलें आहे. आरंभीं दिलेल्या प्रा. फडक्यांच्या व्याख्येप्रमाणें जरी तिचे स्वरूप तंतोतंत आढळलें नाहीं, तरी या लेखकांनीं तंत्राचा बडेजाव न माजवतां स्वतःचे असें नवीन तंत्र इंग्रजी कथावाङ्मयाच्या

आधारावरून आत्मसात् केलेलें आहे. या आजच्या लेखकांच्या पावलावर पाऊल टाकून सदानंद रेगे, शांताराम, अग्निहोत्री, वसुंधरा पटवर्धन, रणजित देसाई इ. तरुण लेखक–लेखिकांची चौथी पिढी आज मराठी लघुकथेच्या क्षितिजावर उदय पावत आहे.

प्रा. फडक्यांची रचनेची सफाई, खांडेकरांचें भाषासौंदर्य व कल्पनावैभव, य. गो. जोशींची कौटुंबिकता यांनीं नटलेली, विकसित झालेली आजची लघुकथा संख्येनें व गुणांनीं समृद्ध होऊन आज नवकथेपर्यंत येऊन ठेपली आहे. हीं तिचीं विविधरूपें तिच्या प्रगतीचीच साक्ष देतात. जीवनाच्या आकाशाचा कोपरान् कोपरा धुंडाळण्याची शक्ति आजच्या लेखकांच्या लेखणींत आहे. हिची वाढ त्यांच्या जीवनाच्या संगतीनें झालेली आहे. मानवी भावनांचें; विचारांचें, विकारांचें सूक्ष्म, हळुवार, वास्तववादी, व त्याचबरोबर कलात्मक (Artistic) चित्रण आजचे लेखक करीत आहेत. आशय व अभिव्यक्ति या दोन्ही बाबतींत त्यांच्या अनुभूतीची व शब्दसामर्थ्याची मर्यादा फार मोठी असल्यामुळें मराठी लघुकथेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे हें सांगण्यास एखाद्या ज्योतिषाची जरूरी आहे काय? फडके, खांडेकरांचा काळ आतां मागें पडलेला आहे. जग झपाट्यानें बदलत आहे, काळाचा रथ वेगानें पुढें धांवतो आहे, अशा वेळीं मराठी साहित्यानेंहि प्रगतिशील व्हावयास पाहिजे. आजच्या लघुकथेंत हें सर्व दिसतें हेंच तिचें वैशिष्ट्य. तिच्यांत दोष असतील, परंतु हाहि एक प्रयोगच आहे. आणखी कांहीं दिवसांनीं हे सर्व दोष नवीनपणा पचवून मराठी लघुकथा स्वयंतेजानें मराठी साहित्याच्या क्षितिजावरून अग्रभागीं चमकेल, असें मानावयास भरपूर जागा या आजच्या लघुकथेंतून सांपडते, एवढें सांगितले म्हणजे तिच्या भविष्याविषयीं काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं.

---

## युवक महोत्सवांतील फेरफटका

**कु. उषा ज्ञानेश्वर मोहोळकर,** प्रथम वर्ष, विज्ञान

कॉलेज सुटल्यावर नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें मुख्य सूचनाफलकावरील सूचना पाहून मग घरीं जायचें या शिरस्त्यानुसार मी तिकडे वळलें. बऱ्याच वाचून झालेल्या नोटिसा पहातां पाहतांच त्यांत दिल्ली युवकमहोत्सवाची नोटिसहि पाहिली, मोठ्या उत्सुकतेनें वाचली. युवक-महोत्सवांत होणाऱ्या निरनिराळ्या स्पर्धांकरितां नांवें मागविलेलीं होतीं. आपल्याला त्यांत कांहीं भाग घेण्यासारखा आहे का? म्हणून पाहिलें, तर शास्त्रोक्त गायन, वादन, नृत्यकला, चित्रकला, फोटोग्राफी अशा सर्व चढाओढींमध्यें कुठेंच भाग घ्यायला वाव नव्हता. तेव्हां ही फारच चांगली संधि, पण आपल्याला कांहीं येत नसल्यामुळें ती गमवावी लागणार असें वाटून मनाला खंत वाटली, आणि मुख्य द्वारांतून घरीं जाण्यास बाहेर पडणार तोंच शेजारची 'लोकनृत्या' ची नोटीस मला दिसली आणि लगेच मी मनांतल्या मनांत विचार केला कीं पाहूं मिळाली संधि तर .........

झालें! अशा रीतीनें दिल्ली यूथ फेस्टिव्हल ह्या वर्षी माझ्या नशिबांत असल्यामुळें माझी गाण्याकरितां निवड झाली, आणि भाग्याची गोष्ट अशीं कीं पुणें विद्यापीठानें आपल्याच कॉलेजचा संघ नियुक्त करून पाठवायचें ठरविलें. त्यावेळीं आम्ही आनन्दानें नाचलों. तो आनंद दिल्लीला जाऊन आल्याच्यापेक्षांहि मोठा होता हें सांगावयास नकोच.

दि. २० ला आम्ही सर्व पुणेंकर मंडळींनीं "पूना एक्स्प्रेस" नें निघावयाचें ठरविलें. आमच्या लोकनृत्याच्या संघांतील व इतर निरनिराळ्या म्हणजे नाटक, शास्त्रोक्त गायन, वादन, रेडिओ प्ले, या कार्यक्रमांकरितां आम्ही एकंदर सर्व कॉलेजमधील मिळून ४० जण जाणार होतों. आमच्याबरोबर उत्साही अशा वाडियाच्या प्रा. मिसेस् घुमटकर व आपल्या कॉलेजचे प्रा. भुपटकर हे होतेच. विद्यापीठानें आम्ही येथून जाण्यापूर्वी सर्व यूथ फेस्टिव्हलच्या मंडळींना खाना दिला. त्यावेळींच फक्त आम्हीं एकमेकांना पाहिलें असल्यामुळें साहजिकच पुणें स्टेशनवर कॉलेजप्रमाणें गट निर्माण झाले व तें वातावरण मुंबईला पोंचेंपर्यंत कायम राहिलें. मुंबईहून दि. २० ला च रात्रींच्या पठाणकोटनें आम्ही निघणार होतों. पण 'पूना एक्स्प्रेस' ला आम्हां पुणेंकर मंडळींचा वियोग लवकर करावासा वाटेना, म्हणून कीं काय ती तब्बल ३॥/४ तास उशिरां व्ही. टी. ला पोहोंचली. अर्थात्च 'पठाणकोट' डोळ्यां-समोरून टा टा ऽ ऽ ऽ करीत निघून गेली. मग रात्रभर मुंबईंत मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं म्हणजे दि. २१ ला पंजाब मेलनें पुढें प्रयाण करण्याचें ठरलें. तेव्हां आम्हीं रात्रीं अकरा वाजतां तिघी तिघी, चौघी चौघी अशा एकेक जणींच्या नातेवाईकाकडे गेलों.

दुसऱ्या दिवशीं अर्थात्च पंजाब मेलचें रिझर्व्हेशन केलेलें नसल्यामुळें जातां आलें नाहीं. तेव्हां दोन तीन तास थांबणें भाग पडलें, त्यामुळें उत्साहावर थोडेंसें विरजण पडलें, व सगळींच तशीं दमलेलीं असल्यामुळें वेळ थोडासा कंटाळवाणा गेला. रात्रीं ९॥ ला पठाणकोट प्लॅटफॉर्मला लागली. डबा रिझर्व्ह असल्यामुळें जागेचा प्रश्न नव्हता. भराभर सामान वर चढवून इतर कांहीं न करतां प्रथम होल्डॉल्स् पसरून दिलें. व गाडी हलते आहे कीं नाहीं हें पाहून ताबडतोब झोपीं गेलों.

साधारणपणें चांगले फटफटल्यावर आम्हीं एक एक जण जाग्या होत असतांनाच पलीकडच्या डब्यांत कोंबडा आरवायला सुरुवात झाली, लगेच लक्षांत आलें कीं 'फोकडान्स्' मध्यें कोंबड्याचा आवाज काढणाऱ्याचाच हा आवाज आहे. गाडी सारखी धांवतच असल्यामुळें स्टेशन आल्याशिवाय प्रातर्विधि आटपणें शक्यच नव्हतें. सगळीच मंडळी आतां अगदीं ताजीतवानी झाली होती. पण बडबडीला सुरवात व्हायला एकच वाण होती ती म्हणजे चहा; इतक्यांत स्टेशन आलें, आम्हीं तोंड वगैरे धुवून कॉफी मागविली आणि ही कॉफीच आहे असें समजून तें पेय व नाश्ता केला. न्याहारी झाल्यावर मात्र कोणाच्या तोंडाला खीळ घालावी तें कळणें मुष्किल होतें. तेव्हां नेहमीं श्रोत्याचे काम करणाऱ्या माझ्यासारख्या मुलींनीं खिडकीकडे मोर्चा वळविला. पठाणकोटनें जाण्यांत एक फार मोठा फायदा असतो तो म्हणजे दृष्टीला या मार्गानें जातांना फार आनंद मिळतो. जिकडे तिकडे हिरवळ, याच मार्गावर सातपुड्याचीं जंगलें, नर्मदानदीवरचा प्रसिद्ध पूल हीं पहावयास मिळतात. ह्यांतील जंगलें, त्यांतील वळणावळणाचे रस्ते, नर्मदेवरील पूल पहावयास मिळाला. पण झांशीला रात्रीं पोंचल्यामुळें किल्ला आगगाडींतून आम्ही पाहूं शकलों नाहीं. नर्मदानदींत पैसा टाकून पुण्य मिळवावयाचें कोणत्याहि पुणेंकरानें गमावलें नाहीं. दुपारीं जवळ-जवळ २॥ पर्यंत डब्यांतल्या डब्यांत सगळ्यांना खेळतां येईल असा "संगीत खुर्ची" चा खेळ खेळलों. निरनिराळ्या चांगल्या शिक्षा सर्वांना आल्या, आणि प्रत्येकानें त्या खेळीमेळीनें भोगल्या. इटारसी आल्यावर पोटोबाची आठवण झाली. तेथें जेवणाबरोबर जेव्हां मातीचीं पात्रें पाणी प्यायला मिळालीं तेव्हां उत्तरेकडच्या मुलुखांत प्रवेश केल्याचें लक्षांत आलें. हो, एक राहिलेंच.

मध्येंच जळगांवला आमच्यांतील आठल्यांचा तेथील त्यांच्या मित्रमंडळींनीं 'संगीत सत्कार' केला तेव्हां इतर लोकांनी त्यांना "ऐटी बाबा" म्हणून डोक्यावर घेतलें. जेवण झाल्यावर संध्याकाळपर्यंत जुन्या नव्या हिंदी मराठी गाण्याची उजळणी झाली, बऱ्याच लोकांनीं सर्वांच्या आवाजांत आवाज मिसळून गायचा चान्स घेतला. संध्याकाळीं ६–६॥ वाजतां आम्ही कांहीं-जणींनी शेजारच्या डब्यांत जाऊन सतारवादन ऐकलें. आमच्याबरोबर वादनाकरितां आलेली मंडळी त्या डब्यांत होती. दोनतीन तासांच्या या मेजवानीनंतर आम्ही आमच्या डब्यांत आलों. व उद्यां दिल्लीला पोंचणार अशा टाळ्या देत व एकमेकीला बजावीत झोपी गेलों.

दि. २३ ला जाग्या झालों तो सरांनीं सामान आवरावयास सांगितलें. तेव्हां भराभर सामान आवरले आणि गरम कपडे बाहेर काढले. इकडच्या वाऱ्यांनीं आम्ही दिल्लीच्या जवळ आलों असल्याचें सुचविलें. बाहेर सूर्योदयाचा सुंदर देखावा दिसत होता पण त्याच्यापेक्षां आसमंतात निरखण्यांत आम्हीं गर्क होतों. आणि उत्सुकतेनें राजधानीकडे पहात होतों. यमुनेच्या पुराचे अवशेष अजूनहि दिसत होते. नव्या दिल्लीचें स्टेशन मागें पडलें, आणि जुन्या दिल्लीच्या स्टेशनमध्यें आमची गाडी येऊन धडकली ! आलों ! दिल्लीला तर येऊन पोहोंचलों.

आमच्या स्वागताकरितां स्टेशनवर युवक महोत्सवाचे कार्यकर्ते हजर होतेच. आमच्या बरोबर असणाऱ्या प्राध्यापकांना महोत्सवाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम बुडेल अशी भीति वाटत होती. पण स्वागतासाठीं आलेल्या मंडळींनीं तो कार्यक्रम संध्याकाळीं असल्याचें सांगितल्यावर सर्वांना हायसें वाटलें. मग खास महोत्सवासाठीं येणाऱ्या मंडळींकरितां असणाऱ्या गाडींतून "यूथ फेस्टिव्हल विलेज्" मध्यें प्रवेश केला. दर्शनीच शुभ्र तंबूंच्या रांगांचें दर्शन झालें. मुख्य दरवाजां-तून थोडेसें आंत जातांच कोपऱ्यावरच चेतविलेला दीप हातांत घेऊन प्रगतीकडे झेंप घेणाऱ्या मजबूत अशा तरुणाच्या लोखंडी पट्ट्यांनीं केलेल्या आकृतिकडे मन आकर्षून घेतलें. आंत शिरल्या-बरोबर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वार्ताहरांचें पोस्ट ऑफिस, तार ऑफिस वगैरेकरितां तंबू उभार-लेले होते. त्या आकृतीला वळसा घालून उजवीकडच्या रस्त्याकडे नजर टाकली असतां मंत्रमुग्ध होण्याची पाळी आमच्यावर आली. त्या रस्त्याच्या एका बाजूला विद्यार्थिनींकरितां तंबू होते व त्या तंबूच्या समोर थोड्याशा हिरवळीपुढें प्रत्येक विद्यापीठाचा सूचित फलक व ध्वज एका रांगेंत होते. प्रत्येक विद्यापीठानें आपलें ध्येयवाक्य त्या फलकावर रेखाटलेलें होतें. आम्ही गेल्यावर पुणें विद्यापीठाचा फलक लावण्यांत आला. त्याच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला सुरेख कापलेले कंपाउंड असून तंबच्या पार्श्वभूमीवर तें फार खुलून दिसत होतें. तिकडील तंबूंत विद्यार्थ्यांची व्यवस्था होती. त्या रस्त्यानें पुढें चालून थोडेसें उजवीकडे वळलें असतां ओपन अेअर थिएटर होतें. आणि सरळ गेल्यावर जेवणघराचा गजबजलेला भाग दृष्टीस पडत होता. महोत्सवाच्या सर्व कार्यकर्त्यांचे तंबू मुख्य रस्त्याच्या एका बाजूला होते.

तिथें पोंचल्यावर जवळ जवळ १ वाजेपर्यंतचा वेळ आम्हांला तंबू मिळून सामान लावण्यांतच गेला. त्यानंतर जेवण उरकलें. जवळ जवळच्या कांहीं विद्यापीठांतील मंडळी आली होती, कांहीं येत होती. प्रत्येकजण आपआपली सोय लावून घेण्यासाठीं धडपडत होता. तसेंच तेथील कार्यकर्तेहि चपळाईनें व्यवस्था पहात होते. सर्व वातावरण हें लग्नघरासारखें उत्साह, गडबड, घाई, गोंधळ वगैरेंनीं गजबजून गेलें होतें. ही सर्व गडबड, व्यवस्था ४ च्या आंत संपावयास हवी होती, कारण ५ वाजतां पंतप्रधानांच्या हस्तें ह्या कॅम्पचें उद्‌घाटन होणार

होतें. एकंदर २६ विद्यापीठांचे १३०० विद्यार्थी तेथें जमले होते. तेव्हां थोडासा गोंधळ होणारच, पण त्यामानानें सर्व व्यवस्था फारच चांगली होती. आतां मात्र पुण्याच्या मंडळींत जी एक ग्रुपपद्धति निर्माण झाली होती ती जादूप्रमाणें एकदम नाहीशीं झाली.

४ वाजल्यापासूनच रंगीबेरंगी कपड्यांच्या विद्यार्थी विद्यार्थिनींची ओपन एअरकडे थिएटर-कडे–जिथें उद्घाटन व्हावयाचें तिकडे जा–ये सुरू झाली. प्रत्येकजण आपल्या पंतप्रधानांना चांगलें पहातां यावें, आपल्याला जवळून दिसावें म्हणून झटत होता. दिल्ली शहरांतीलहि बरेच निमंत्रित नागरिक ह्या समारंभास उपस्थित होते. त्यावर पं. नेहरूंनीं उद्घाटन करून विद्यार्थ्यांना आपल्या भाषणांत फारच बहुमोल उपदेश केला. ते म्हणाले कीं, “तुम्ही तरुण लोक भारताचे भावी नागरिक आहांत. तेव्हां भावी नागरिक हा लेचापेचा असतां काम नये तर तो धष्टपुष्ट पाहिजे. तसेंच त्याच्या संवयी, आवडी-निवडी उच्च दर्जाच्या असल्या पाहिजेत. तो सर्वगुणसंपन्न, शीलवान् , सुशिक्षित, पण त्याचबरोबर सुसंस्कृतहि असला पाहिजे.” त्यानंतर शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलम आझाद ह्यांचें भाषण वाचून दाखविलें, कारण ते प्रकृतिअस्वास्थामुळें उपस्थित राहूं शकले नव्हते. राष्ट्रपतींचा संदेशहि सर्वांना वाचून दाखविण्यांत आला व कार्यक्रम संपला. आम्ही मोठ्या खुषीनें तंबूकडे परतलों; कारण आज आमच्या पंतप्रधानांनीं–आमच्या नेत्यानें आम्हां सर्वांच्या मेळाव्यांत भाग घेतला होता. अशा रीतीनें दि. २३ हा युवक महोत्सवाचा पहिला दिवस पार पडला.

दि. २४ ला सकाळीं दिल्लीच्या वातावरणाशीं आम्ही थोडेंसें समरस झालों आहोंत असें वाटूं लागलें. कँम्पवरच्या एकएक गोष्टीचा परिचय होऊं लागला. आम्हांला जातांनाच आयडेंटिटि कार्ड्स् दिलीं होतीं, त्याबरोबर आतां सकाळच्या नाश्त्याचें, जेवणाचें, दुधाचें कार्ड व बिल्ला मिळाला. तेव्हां सकाळीं लवकरच उठून भराभर प्रातर्विधी उरकले आणि नाश्त्याचे 'क्यू'मध्यें उभे राहून नाश्ता मिळविला. ब्रेड, कॉफी, समोसा अथवा चहा, अंडें इत्यादि पदार्थ न्याहारीसाठीं असत.

आमच्या माहितीपत्रकाप्रमाणें येथें सकाळीं ९ ते ११, ११ ते १ ह्या वेळांत निरनिराळ्या चढाओढी होत्या. नंतर मध्यें १ ते २ विश्रांतीची वेळ, लगेच २ ते ४, ४ ते ७ व ९ ते १२ अशा स्पर्धा असत. दि. २३ लाच रात्रीं ९ वाजतां नाटक विभागाचें उद्घाटन जी. सी. चतर्जी ह्यांनीं केलें. त्या दिवशीं बनारस, बिहार, मुंबई, लखनौ ह्या चार विद्यापीठांच्या नाटकस्पर्धा झाल्या. पण आम्ही प्रवासाचा शीण घालविण्याकरितां लवकर झोपी गेल्यानें तो कार्यक्रम बुडला. येथें एक पद्धत फारच छान होती. ती म्हणजे प्रत्येक कला विभागाचें उद्घाटन त्या त्या कलेंत दर्दी असणाऱ्या व्यक्तींकडून होई. त्यामुळें भारतांतील अनेक कलांमध्यें दर्दी असणारी मंडळी पहाण्याचा अपूर्व योग सर्वांना लाभला. दि. २४ ला सकाळीं ९ वाजतां श्री. गुरुमुख निहाल-सिंगांच्या हस्तें शास्त्रोक्त गायनाचें उद्घाटन झालें. पण आमची आंघोळीच्या 'क्यू' मधून सुटका न झाल्यामुळें ह्या सकाळच्या कार्यक्रमाचा कांहीं भाग बुडला. शिवाय ह्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या असल्यामुळें आम्ही फारशा तिकडे वळलों नाहीं.

या युवक महोत्सवांत शिकण्यासारखें बरेंच होतें. अगदीं भारताच्या दक्षिण भूभागापासून अगदीं वरच्या टोंकापर्यंतचे म्हणजे कर्नाटक ते काश्मीरचे, सर्व विद्यार्थी येथें जमले होते. एकंदर २६ विद्यापीठांनीं ह्यांत भाग घेतला होता. गेल्या वर्षापेक्षांहि ह्या द्वितीय युवक महोत्सवांत अधिक विद्यापीठांनीं भाग घेऊन आपला सक्रिय पाठिंबा दर्शविला होता. आणि ह्याचें वैशिष्ट्य

म्हणजे प्रत्येक विद्यापीठानें आपल्या भागांतील वैशिष्ट्यपूर्ण व प्रातिनिधिक स्वरूपाचे कार्यक्रम बसविलेले होते. उदा. : आपण ज्याप्रमाणें महाराष्ट्रीय शेतकऱ्यांचें लोकनृत्य बसविलें होतें त्याप्रमाणें लखनौ विद्यापीठानें तिकडील मुसलमानी पद्धतीचें, तर नागपूरनें आदिवासी जनांचें नृत्य बसविलें होतें. पहिल्या दिवशीं ओळख होणें शक्यच नव्हतें; तेव्हां हळूं हळूं दुसऱ्या दिवशीं जेव्हां आम्ही स्नान, न्याहारी, जेवण, कार्यक्रम इत्यादि निमितानें एकत्र येत असूं तेव्हां इतर विद्यापीठांतील लोकांशीं ओळखी होऊं लागल्या. त्यांतल्या त्यांत मुंबईच्या एस. एन. डी. टी., ज्यांना आम्ही ' एस. एन्. डी. डी. टी. ' ह्या प्रेमाच्या नांवानें हांका मारीत असूं त्या विद्यापीठांतील मुलींशीं, व कर्नाटक युनिव्हर्सिटीशीं लवकर ओळख झाली. तसेंच काश्मीरच्या मुलींशीहि ओळख होऊन आस्ते आस्ते मोडक्या तोडक्या हिंदीचा आधार घेऊन आम्ही त्यांच्याशीं बातचित करून एकंदर चालीरीति, वागणूक ह्यांचीं माहिती काढली. निरनिराळ्या प्रांतांतील बोलण्याच्या पद्धति उदा. : कर्नाटकच्या मुली मराठी बोलत पण त्यांच्यांत कानडी सूर बेमालूम मिसळलेला असे. तर काश्मिरी, पंजाबी, दिल्ली युनिव्हर्सिटीचे हिंदी इतके सफाईदार कीं आम्हीं हिंदींतून बोललों असें बरेच वेळां त्यांना सांगावें लागत असें. आमच्या " ऐटी बाबा " ची काश्मिरी मुलींना फार मजा वाटली व त्या सारख्या ह्याचा अर्थ काय? असें विचारूं लागल्या, तेव्हां त्यांना " बहोत अच्छा " असें सांगितल्यावर त्या जरा कुणी नवे कपडे घातले की " ऐटी बाबा " म्हणून मोकळ्या होत.

दुसऱ्या दिवशीं ५ वाजतां हस्तव्यवसाय, फोटोग्राफस्, पेन्टिंगज् वगैरे विभागांचें उद्घाटन श्री हुमायून कबीर यांनीं केलें. हा प्रदर्शनाचा विभाग कँम्पपासून थोडा दूर होता. तेव्हां संध्याकाळीं त्याला आम्ही भेट दिली. फोटोग्राफस् विद्यार्थ्यांच्या मानानें फारच सुरेख होते. ड्रॉइंग्जहि कौतुक करण्यासारखीं होतीं. तीन चार शिल्पकलेचे नमुने होते व त्यांत कल्पकता होती. भरतकाम बहुतेक उत्तरेकडील होतें. अभिमानाची गोष्ट म्हणजे त्या विभागांत पुणें विद्यापीठानेंहि आपण मागें आहोंत असें न दाखवितां ६।७ बक्षिसें मिळवून प्रगतिपथावरच आहोंत हें सिद्ध केलें. रात्रीं नेहमींप्रमाणेंच पंजाब, सागर, पाटणा, ह्या विद्यापीठांचीं हिंदी नाटकें झालीं, त्यामुळें थोडी-फार हिंदी रंगभूमीविषयीं कल्पना येऊन तिच्यांत आपल्यापेक्षां फारसें भिन्नत्व नाहीं हें ध्यानांत आलें.

दि. २५ ला वाद्यवादन विभागाचें उद्घाटन श्री. नित्यानंद कानुगो ह्यांनीं केलें. हा कार्यक्रम फारच मनोरंजक असल्यामुळें आम्हीं लवकरच सर्व आटोपून गेलों. सकाळच्या वेळीं विद्यार्थ्यांच्या व दुपारीं विद्यार्थिनींच्या स्पर्धा झाल्या. मुख्यत्वें सतारवादन, तबलावादन, व्हायोलीनवादन ह्यांचे कार्यक्रम बरेच झाले. ह्याशिवाय मधूनच बांसरी, जलतरंग, वीणा वगैरे वाद्यांचे कार्यक्रम प्रामुख्यानें बरेच झाले. हें अर्थात्च कांहीं विद्यापीठांचेच झाले व उरलेल्या विद्यापीठांचे त्याच्या पुढील दिवसांत झाले. ह्या वाद्यवादनांत कलकत्याच्या जया बसूनें सतारवादनांत पहिलें बक्षिस मिळविलें. १२ वाजतां कार्यक्रमांतून उठूनच आम्हांला जेवायला जावे लागलें कारण १ वाजतां जेवणवांटप बंद होत असें. जेवणामध्यें " नंदुरकी रोटी, एखादी पातळ पंजाबी पद्धतीची भाजी, सांबार, भात, स्वीट डीश् व ताक ह्यांचा मुख्यत्वें समावेश होता. पहिल्या दिवशीं सर्व तिखट पदार्थांमुळें व जाड जाड पोळ्यांमुळें मुलींना जेवण जाईना पण नंतर संवय झाली.

अशा रीतीनें रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ कार्यक्रम होत असत. ज्या दिवशीं पुणें विद्यापीठाचा कार्यक्रम असे त्यादिवशीं तरी आम्हीं अगदीं सर्वच्या सर्व जण उपस्थित राहून प्रोत्साहन देत असूं. इतर वेळीं इच्छा असे पण वेळेच्या अभावी, इतर अन्य कारणांमुळें बरेचसें कार्यक्रम बुडतहि असत. एकंदर सहकार्याची भावना सर्वांच्यामध्यें बरीच दिसून आली. दि. २७ ला लोकनृत्याचा आमचा कार्यक्रम झाला. त्यावेळीं अर्थमंत्री सी. डी. देशमुख उपस्थित होते. त्यांनीं स्वतःला आमचा कार्यक्रम फारच आवडल्याचें सांगितलें, कदाचित् हे त्यांचे महाराष्ट्र-प्रेमहि बोललें असेल. कारण आमचा कांहीं नंबर आला नाहीं. 'नाहीं आला नंबर तर नाहीं आला' पुढच्यावेळेस प्रयत्न करूं. अशीं जवळ जवळ प्रतिज्ञा करूनच आम्ही थिएटरबाहेर पाऊल ठेवलें. नृत्याच्या श्री. रुक्मिणीदेवी अरुंडेल ह्या उद्घाटक होत्या.

युवक महोत्सवाच्या वेळांतच इतर विद्यापीठांनीं प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या पण आम्ही त्या वेळांत कोठेंच बाहेर पडावयाचें नाहीं असें ठरविलें होतें. तेव्हां २९ ला आमच्या विद्यापीठाच्या सर्व स्पर्धा संपल्यावर दिल्ली शहराला भेट द्यावयाचें ठरलें. दि. २९ ला नेहरूंच्या निवासस्थानापासून आम्ही भेट देण्यास सुरवात करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सकाळीं ६ वाजतां निघून ७ वाजतां पंतप्रधानांच्या भव्य प्रासादापाशीं आलों. आधींच भेटीची वेळ ठरविली होती, पण त्यांचे कार्यक्रम उरकून त्यांची व आमची भेट होण्यास आठ वाजले. त्यांच्या घरांत बसलों असतांनाहि घराच्या साधेपणानें मन आकर्षून घेतलें. नंतर १५।२० मिनिटांनीं पं. नेहरू आले. त्यांची ती प्रसन्न हांसरी मूर्ती पाहिल्यावर येथें येण्याचें सार्थक झालें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. प्रत्येकाच्या ओळखीचा कार्यक्रम, कुंकुमतिलक लावण्याच्या कार्यक्रमानंतर सर्वांचा ग्रुप फोटो काढला. त्यावेळींहि पंडितजींनीं स्वतः आम्हांला उभें केलें. कारण घाईमुळें आमच्यांत थोडा किलबिलाट उत्पन्न झाला होता. त्यानंतर कँम्पकडे परतलों.

दि. ३० ला बक्षिससमारंभाचा दिवस—युवक महोत्सवाची सांगता—त्याप्रमाणें आरोग्य मंत्री श्रीमती राजकुमारी अमृत कौर ह्यांच्या हस्तें बक्षिसें विजयी स्पर्धकांना दिलीं. त्यांत पुणें विद्यापीठानें ३ बक्षिसें मिळविलीं, म्हणजेच प्रगति तर निश्चितरीत्या केलीच. दि. ३१ व १ ला दिवसभर दिल्लींत भटकून कुतुबमिनार, चांदणी चौक, कॅनॉट प्लेस, जुम्मा मशीद, जंतरमंतर, लालकिल्ला, बिर्लाभवन, बिर्लामंदिर, इंडिया गेट पाहिलें. सर्वांत मनाला अत्यंत समाधान मिळालें तें महात्माजींची राजघाटावरील समाधि पाहिल्यावर. अतिशय रम्य, पवित्र असा यमुना नदीचा परिसर त्यामुळें समाधी फारच रम्य वाटते. रम्यतेच्या जोडीला कदाचित् भावनांचीहि जोड असूं शकेल. पण असो!

हीं सर्व स्थळें मुसलमानी पद्धतीचीं आहेत पण त्यावरील नक्षीकाम पाहिल्यावर मन वेडावून गेल्याशिवाय राहात नाहीं. लाल किल्ल्यांतील दिवाण-ई-खास, दिवाण-इ-आम आणि म्युझियम् तर पहाण्याजोगीं आहेतच आहेत. दिल्ली हें राजधानीचें शहर पण थोडीशी आपली कल्पना चुकते. आपण फार सुरेख असेल अशी कल्पना करून जातों व त्यामुळेंच चुकतें. दिल्ली शहर तसें वाईट नसलें तरी जुनी दिल्ली तशी वाईटच आहे. पण नव्या दिल्लींतील रस्ते, इमारती चांगल्या आहेत. त्यानंतर आम्ही पार्लमेंट हाऊस पाहिलें. राजधानींतील पार्लमेंट हाऊसमध्यें शिरल्यावर साहजिकच तेथें राष्ट्रपतींच्या पीठावर बसण्याचा मोह मुलींना आवरला नाहीं. सर्वत्र

एअर् कंडिशन्ड व मखमल पसरलेल्या आधुनिक फर्निचरनें सुसज्ज अशा राज्यसभेच्या, लोकसभेच्या आणि संयुक्त मंडळाच्या सभागृहांतून फिरतांना आपण हें पहावयास मिळाल्यामुळें फार भाग्यवान् आहोंत अशी खात्री पटली. पार्लमेंटच्या इमारतींतीलच वरिष्ठ न्यायालय मात्र कामकाज चालू असल्यामुळें पहावयास मिळालें नाहीं.

दि. ३१ लाच इतर बऱ्याच विद्यापीठांतील लोक गेले. दि. १ ला तर उरले सुरलेलेहि लोक गेले. फक्त आम्ही पुणेंकर मंडळीं तेवढीं तेथें उरलों. तेव्हां दि. १ ला रात्रीं आग्रा फत्तेपूर शिक्रीला जाऊन तेथें बुलंद दरवाजा, ताजमहाल, आग्राफोर्ट वगैरे पाहून दि. २ ला रात्रीं दिल्लीला आलों. दि. ३ ला दिवसभर भटकून संध्याकाळीं ३ ते ५ औद्योगिक प्रदर्शन २ तासांत उरकून कँपवर आलों. सामानाची बांधाबांध करून रात्रीच्या पठाणकोटनें निघून दि. ५ ला ११ वाजतां पुण्यांत आलों. युवक महोत्सवाचे आठहि दिवस कसे गेले तें कळलेंच नाहीं. इतर नव्या ओळखी झालेले लोक निरोप घेऊन जातांना त्यांना व आम्हांला वाईट वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. कारण ७ पावलें बरोबर चाललें असतां मैत्री होते. मग ७ दिवस एकत्र राहिल्यानंतरचा काय प्रश्न ? इकडे येतांना घरीं जाण्यासाठीं मन अत्यंत उत्सुक, तर सर्वांचा वियोग होणार अशी हुरहुरहि वाटत होती. पण नेहमीं सुख जर अल्प असेल तरच चाखावयास बरें वाटतें. या न्यायानें मिळालेली संधि अपूर्व मानून आम्हीं आनंद मानूनच स्वगृहीं पाऊल ठेवलें.

---

## श्रमदान शिबिरांतील पंधरा दिवस

लेखिका : कु. **सुलोचना नाईक** एफ्. वाय्. ' बी. ' ( साहित्य )

भारतसेवकसमाजातर्फे भरणाऱ्या श्रमदानशिबिरासाठीं मी माझें नांव नोंदविलें होतें आणि ठरविलेल्या गांवीं जाण्यासाठीं मी व इतर स्वयंसेविका सेवासदन ट्रेनिंग कॉलेजवर लॉरीची मार्गप्रतीक्षा करीत होतों. माझ्या मनांत निरनिराळ्या विचारमालिका येत होत्या. गांवासंबंधीं उत्सुकता शिगेस पोहोंचली होती. बाहेरगांवी जाण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग नव्हता, तरीसुद्धा गावांबद्दल, तेथील लोकांबद्दल व विशेषतः आमच्या कार्याच्या सफलतेबद्दल माझ्या मनांत विचारांची उलटसुलट गर्दी झाली होती.

आम्ही पुण्याहून निघालों. तेव्हां रात्रौ ८ चा सुमार होता. पुणें सोडल्यावर थोड्याच वेळांत इतिहास-प्रसिद्ध दिवेघाट लागतो. आमची गाडी घाट चढत होती. आम्ही घाटमाथ्यावर आलों तेव्हां आजूबाजूस कांहीं दिसत नव्हतें. काळोख चांगलाच पडला होता. त्यांत हडपसर-पुण्याचे असंख्य दिवे लुकलुकत होते. आकाशांत अगदीं वर जाऊन खालीं चांदण्या पहातांना माणसाची जी स्थिति होईल तशीच आमची झाली होती. त्या अवर्णनीय आनंदांत सारे गुंग झाले होते. कवी वसंत बापटांच्या ओळी एकदम मला आठवल्या

गगनांतील सदनांतून लखलखती लाख दिवे ।
क्षणभर कीं स्थिर झाले उल्कांचे दिव्य थवे ।
बघ वरती बघ वरती तेजःकण थरथरती ।
पुरुषार्थी मनुजानें निर्मियलें गगन नवें ॥

आम्ही काय पाहिलं तें स्वप्न होतें, कीं मतिभ्रम होता, का माया होती ! अशी आमची स्थिति होऊन गेली. केवढ्या त्या पर्वतराजी ! केवढी ती दरी ! केवढा तो अथांग काळोख आणि त्या असंख्य चांदण्या ! सारेच कल्पनातीत होतें. स्वर्गीय होतें. आम्ही पहातों तें खरोखरीच काय आहे हें कळण्याच्या आंतच आमच्या गाडीनें डोंगरमाथा सोडला, आणि ती सासवडच्या रस्त्यास लागली. आतां कोणीच कोणाशीं बोलत नव्हतें. सारें जणूं त्या स्वर्गीय आनंदांत गुंग झाले होते मी मनांत म्हटलें, " थोडाच वेळ का होईना, आपल्याला जें स्वर्गीय दिसलं त्याच्या नुसत्या स्मरणानेंहि बराच काळ आनंद लुटतां येईल." ह्या तंद्रींतून जागी होऊन मी पहातें तों गाडी ' शिवरी ' गांवांत थांबलेलीच होती.

सासवड ते जेजुरी रस्त्यावर पांचव्या मैलावर ' यमाईच्या शिवरीचा ' फाटा आहे, आणि तेथून सरळच आंत गेलं कि ४-५ फर्लांगाच्या अन्तरावर थेट डोंगराच्या पायथ्याशीं हें छोटसं शिवरी गांव वसलें आहे. आडबाजूस असल्यानें शहरी जीवनाचाच काय, पण सासवड जेजुरी सारख्या आसपासच्या मोठ्या गांवांचाही ह्या गांवावर फारसा परिणाम झाला नाहीं. ज्या गांवाच्या दर्शनाची मला उत्सुकता लागलेली होती, ज्याच्याबद्दल विचार करतां करतां माझे दिवस गेले होते, तें काळ्याकुट्ट अंधाराची घोंगडी घेऊन, डोंगराच्या पायथ्याशीं रातकिड्यांच्या संसर्गांत गाढ झोपीं गेलं होतं. त्याला कशाची दादच नव्हती. गांवाबद्दल पूर्वी केलेल्या कल्पना व दृश्य वस्तुस्थिति ह्यांची तुलना करतां करतां केव्हां झोंप लागली हें मला कळलंच नाहीं.

काळोख्या पहाटे मी जागी झालें. शुक्राची चांदणी ठळक दिसत होती. सर्वत्र गारवा लिंपला होता. झाडें उभ्यानें काळोखाचा पहारा करीत होतीं. थोड्याच वेळांत, दूरवर जात्याची घरघर सुरू झाली. बायकांनीं दळणं टाकलीं आणि एकमेकींना साथ देत त्या ओव्या म्हणत होत्या. सारं लक्ष देऊन मी ऐकत होतें. त्या ओव्यांत निरनिराळे प्रसंग होते. विवाहित स्त्रीला माहेराबद्दल वाटणाऱ्या भावनांचं हृदयंगम वर्णन त्या ओव्यांत होतं; आई, वडील, बहीण, भाऊ साऱ्यांची तिला आठवण येत होती. त्यांना ती तिची खुशाली सांगत होती. गोठ्यांतल्या बैलाचीच काय, पण परसांतल्या आंब्याचीं पण आठवण येत होती. एक ना दोन कितीतरी नाजूक प्रसंग त्यांत आळवले होते. मला उगांचच ऊब आल्यासारखं वाटूं लागलं, आणि मनांत आलं कीं, ' मूर्तिमंत काव्य ' ज्याला म्हणतात तें ह्यांहून कांहीं निराळें असतं ? आणि ज्याला ह्यांची गोडी चाखावयाची असेल त्यानें असें खेड्यांतच गेलें पाहिजे. माझ्या कार्यक्रमाची सुरवात इतक्या सुंदर रीतींनें झालेली पाहून मी मनांत अगदीं खूष होऊन गेलें. ह्यानंतर प्रार्थनेचा कार्यक्रम झाला, उद्घाटन झालें, आणि आमच्या सर्वांत महत्त्वाच्या कार्यक्रमास सुरवात झाली.

७–७॥ च्या सुमारास आम्हां सेविकांची पलटण हातांत झाडू घेऊन सज्ज झाली. आज पहिलाच दिवस होता. अन् उत्साहाला अगदीं पूर आला होता. आमची ही पलटण पाहून मला अहिल्यादेवीच्या पलटणीचीच आठवण झाली. मी मनांत म्हटलं, " स्वराज्य मिळवावयास हातांत तलवार घ्यावी लागेल पण सुराज्य करण्यासाठीं हातीं झाडूच घेतला पाहिजे." हमरस्त्यांवर येऊन आम्ही झाडूं लागलों. भराभर हात फिरूं लागले, धूळ उडूं लागली. त्यामुळें दिसेनासें झालें. गांवांत एखादी सर्कस किंवा 'सोंग' यावं अन् तेव्हां जसं कुतुहलानें लोक बघत बसतात त्याप्रमाणें सर्वजण आमच्याकडे पाहूं लागले. सर्वांना चांगलंच आश्चर्य वाटूं लागलं होतं. ह्या ' प्रकाराचा ' अर्थ

लावण्याचा प्रत्येकजण आपापल्यापरीनें प्रयत्न करूं लागला. पागोट्याला पागोटीं भिडूं लागलीं व बायकांच्यामध्यें पण कुजबूज सुरूं झालीं. येव्हांना मी फार दमलें होतें. वाकून वाकून कमरेचा काटा ढिला झाला होता, उन्हानें चेहरा लाल झाला होता, अन् अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या होत्या, त्यावर धुळीचे थरावर थर बसूं लागले होते. रस्त्यावरची सर्व धूळ जणं आमच्याच अंगावर येऊन बसल्यासारखं वाटत होतं. अजून आमचं तें रूप जरी नुसतं आठवलं तरी माझ्या अंगावर शहारे येतात. पाण्याविना जिभेला कोरड पडली होती, आणि जरा कुठें तोंड उघडलें किं धुळीनें ठसका बसलाच म्हणून समजा. रस्ता सफाईपेक्षा अंगसफाईचंच काम आतां जास्त बिकट झालं होतं.

सभोंवतालच्या येवढया गर्दीपैकीं कोणालाहि आमची कींव येत नव्हती. त्यांच्या चेष्टा कुचेष्टांना तर फारच ऊत आला होता. माझ्या शेजारची एक बाई चक्क म्हणालीच, "अग्गोबय्याऽझाडूवाल्या ममईच्या दिसत्यांत जनु!" दुसरीनें साथ दिली, "त्यानला शेर काय अन् ख्याड काय समदी एकूच. बया! सरकारचा पैका खात्यात त्यांचं काय जातय झाडाया" तिसरीनें तर्क केला, "शाळेंतल्या ल्हेणारन्या दिसत्यांत, मज्जेनं आल्यात अन् तपल्यांच गोडीनें काम करत्यात". आतां पहिली बोलली नसती तर काय बिघडलं असतं? पण छे? म्हणते कशी "हल्लींच्या कलीच्या-राज्यांत कोन नाय बया कोनासाठीं फुकाट राबायंच पैक्याविना. त्वा तरी काम करशिन व्हय?" अन् मग सर्वत्र हंशाच हंशा पिकला. ह्याहिपेक्षां कमाल म्हणजे माझ्या त्या भयंकर 'अवताराकडे' पाहून एक तर चक्क ओरडलीच, "ए बया म्होर व्हो की वाईच, शिवशील मना." अरे बापरे! मनांत म्हटलं, 'म्हणजे एकूण ह्यांच्यापाशीं आमची एका झाडूवाली इतकींहि किंमत नाहीं म्हणायची तर!" हें सर्व ऐकून माझ्या आशाआकांक्षांचा अगदीं खुर्दाच झाला. वाटलं उगाच येथें आलों. ह्या खेड्यांत काय विनोद कमी होता? का आमची चेष्टा करायला पुण्यनगरी अपुरी पडत होती? कांहीं कळत नाहीं. बाकी ह्या सरकारची कांहींतरीच फॅड असतात झालं. अशी रस्ते झाडून का कधीं समाजसेवा होत असते? बर, ज्यांच्यासाठीं आम्ही हें सारें करीत आहोंत तें सारें बघ्यासारखें बाजूला उभे होते. बरं राहिनात कां उभे, पण वर हें वाक्‌बाण कशाला? काय माणसाचा स्वभाव असतो पहा, स्वतः कांहीं करणार नाहीं तें नाहींतच, दुसरा कांहीं करीत असला तर मदत तर राहोच पण त्याचीच टिंगल करतील. मग मात्र मनांत ठरविलें, 'झाला येवढा मूर्खपणा बस्स झाला, परत श्रमदानाला म्हणून यावयाचें नाहीं.' पण त्याला आतां कांहीं इलाज नव्हता. साठमारीच्या आखाड्यांतून पळून जाणें जसें अशक्य असतें, तसेंच इथें माझें झालें होतें.

सफाईचा कार्यक्रम झाला कीं मुलांसाठीं दूधपानाचा कार्यक्रम होई. ह्या गांवांतील भावी पिढीला सुधारण्यासाठीं, त्यांना स्वानंदी, शिस्तीच्या आणि स्वच्छतेच्या जीवनाची ओळख करून देण्यासाठीं आम्हीं निरनिराळे कार्यक्रम आखलें होते. त्यांना खेळ, कवायत, नमस्कार ह्यांचे धडे दिले. त्यांच्याशी खेळीमेळीनें गोष्टी सांगितल्या. हंसत खेळत विविध माहिती सांगितली. त्यामुळें गांवांत सर्वांत लवकर आमच्या बद्दल आपुलकी निर्माण झाली असेल तर ती ह्या छोट्या मुलांच्यांत. 'आदर्श शिक्षक व्हावयाचें असेल तर त्यानें छडी ऐवजीं सुईदोऱ्याचाच अवलंब केला पाहिजे' ह्या पू. साने गुरुजींच्या संदेशाप्रमाणें आम्हीं मुलांच्या कपड्यांकडे लक्ष पुरविलें. ह्या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्यामध्यें विलक्षण उत्साहाचें वारें खेळूं लागलें. ते

आमच्यावर इतके खूष होऊन गेले, कीं त्यांना आमच्यासाठीं काय करूं अन् काय नको असें झालें.

आपुलकी निर्माण व्हावयास 'ग्रामपरिचय' ह्या कार्यक्रमाचा फारच उपयोग झाला. ह्या वेळांत आम्हीं ग्रामस्थांच्या घरीं जात असूं. त्यांच्या दाराशीं आल्यावर, "काय करताय आई?" किंवा येऊ कां आजी मदतीला? अशा प्रकारें अगदीं घरगुती आणि आपुलकीनें त्यांच्याशीं बोलत असूं. आणि मुख्यतः त्यांना शिकवायला आलों नसून त्यांच्याकडूनच शिकून घेण्यासाठीं आलों आहोंत, आम्ही अशी जाणीव ठेवून वागत असूं, व त्यांच्यांशीं खेळीमेळीनें बोलतां बोलतां किंवा त्यांच्या मुलांना आंघोळी किंवा मुलींच्या वेण्या घालतां घालतां, त्यांना आरोग्यासंबंधीं किंवा शिक्षणासंबंधीं माहिती करून देत असूं आणि त्यामुळें अनुकूल वातावरण निर्माण झालें.

आमच्याबद्दलचे दूषितग्रह निवळले हे लोक आपल्या मदतीकरतां आले आहेत, त्यांचा फायदा आपण घेतला पाहिजे, त्यांच्यापासून कांहीं शिकलं पाहिजे, त्यांचा सल्ला घेतला पाहिजे. ही जाणीव त्यांच्यांत रुजली, आपण होऊन आम्हांस मदत करूं लागले. सर्वत्र उत्साहाचें वातावरण दिसूं लागलें आणि आमच्या शिबिराला अगदीं उत्सवाचेंच स्वरूप आलें. आम्ही त्यांच्या कुटुंबियांपैकींच झालों होतों. एकमेकांच्या सुखदुःखांच्या गोष्टी एकमेकाला सांगूं लागलों होतों. एकमेकांच्या अडचणी समजावून घेऊं लागलों होतों. सर्वत्र आपुलकीचें राज्य सुरू झालें होतें. परकेपणाच्या लाटा पार निवळल्या होत्या आणि ग्रामस्थांच्या अंतःकरणाचा तळ स्वच्छपणें दिसत होता.

भोजनोत्तर बौद्धिक होई. निरनिराळ्या क्षेत्रांतील विचारवंतांचे विचार आम्हांस ऐकावयास मिळत. ह्या कार्यक्रमांतसुद्धां खेडुतांनीं अपेक्षेपेक्षां जास्तच सहकार्य केलें. ह्या व्याख्यानांमुळें तेथील खेडुतांनाहि सामाजिक समस्यांची ओळख होई व आम्हांसहि सभेंत बोलण्याचा सराव होई. 'पंचवार्षिक योजनेवरील' श्री. दि. के. देशपांडे ह्याचें व्याख्यान तर फारच रंगलें होतें. त्यांनीं हा विषय अत्यंत साध्यारीतीनें व खेळीमेळीनें हाताळला. खेडुतांशीं त्यावर प्रश्नोत्तरें झालीं व त्यांच्या शंकाकुशंका दूर होऊन खेडुतांनाहि ह्या प्रश्नाविषयीं बरीच 'आस्था' वाटूं लागली.

खुद्द शिबिरामध्यें पण कौटुंबिक जिव्हाळा आला होता, आणि ह्यामध्यें सेवासदनमधील शिक्षिकांनीं दाखविलेला प्रेमळपणा व आस्था ह्यामुळें शिबीर म्हणजे घरच आहे असें वाटे. आम्ही आजारी असतांना त्यांनीं दाखविलेली तत्परता व केलेली शुश्रूषा मी कधींहि विसरूं शकणार नाहीं.

ह्या दिवसांतून सवड काढून आजूबाजूच्या गांवांना पण आम्हीं भेटी दिल्या. त्यांत तक्रारवाडी, साकुर्डे व जेजुरी अशा गांवांचा समावेश झाला होता. तक्रारवाडीच्या लोकांतील एकी विशेष नमूद करण्यासारखी होती. गांव जरी लहान होतें, तरी तेथील बहुतेकजणांनीं मिळून शाळेची जागा करण्यासाठीं केलेलें श्रमदान स्पृहणीय होतें ह्यांत शंकाच नाहीं.

हसंतखेळत लोकांना शिक्षण देण्यासाठीं लोकनाट्याचा आम्ही उपयोग केला व त्याचा प्रभाव अपेक्षापेक्षांहि जास्त पडला. ह्या नाटयांतून आम्ही आरोग्य, शिक्षण, नागरिकशास्त्र, इत्यादि प्रश्न हाताळले होते. ह्यामध्यें 'ठकूनें मत दिलें' 'स्वराज्य' व 'ओवाळणी' हीं नाटकें विशेष गाजलीं. शेवटच्या दिवशीं आम्ही खेडुतांना भारतांतील वीर स्त्रियांची ओळख करून देण्यासाठीं

'भारतीय नारीदर्शन' ह्या अभिनय गीतांचा प्रयोग केला. यांत रंगरंगोटी अगर कुठल्याहि प्रकारच्या सजावटीच्या साधनांचा उपयोग केला नव्हता, तरीहि तो इतका परिणामकारक ठरला कीं त्याच उत्साहाचे भरांत गांवकन्यांनीं 'शूर्पणखा' हा प्रयोग करून दाखविला. ह्यांतील शूर्पणखेचें काम एका वृद्ध माणसानें केलें होते. अजूनहि तो प्रयोग आठवला कीं माझी हसतां हसतां मुरकुंडी वळते. तेथील शाळकरी मुलांमुलींकडून आम्ही दोनतीन लोकनृत्यें बसवून घेतली व त्यांनीं तीं फारच यशस्वी करून दाखविलीं.

अशा तऱ्हेनें आमचे पंधरा दिवस कसें निघून गेले हें कळलेंच नाहीं. आतांपर्यन्त निरोप घेण्याचे बरेच प्रसंग मी अनुभवलें आहेत परन्तु येथील गांवकन्यांनीं दिलेला हृदयस्पर्शी निरोप मी केव्हांहि विसरणार नाहीं. त्या दिवशीं निरोप देण्यासाठीं सारा गांव लोटला होता. आम्हांस कांहींतरी विसरलें आहे अशी उगीचच जाणीव होत होती. आमचे डोळे भरून आले होते. परत येण्याचीं गांवकन्यांनीं आमन्त्रणें दिलीं होतीं. सारं सारें आतां एक झालें होतें. पंधरा दिवसांतील गांवांतील उत्साह आज निघून जाणार ह्या जाणिवेनें सर्वत्र सुन्नता पसरली होती. आमची गाडी सुरू झाली तशी कांहींजणींनीं डोळ्याला पदर लावले. गाडींत कुणीकुणाशीं बोलत नव्हतें. सर्वत्र जडता पसरली होती. अत्यन्त पवित्र व मधुर स्मृति बरोबर घेऊन आम्ही चाललो होतों. तरीपण फिरून परत एकदां यावयाची इच्छा मागें राहिलीच होती.

ज्या ग्रामीणजीवनाचें दर्शन व्हावें म्हणून मी उत्सुक होतें त्यांचें थोडें कां होईना पण आपल्यास दर्शन झालें, ह्या जाणिवेनें एकप्रकारचा आनंद वाटत होता. मन कृतज्ञतेनें भरून आलें होते. आणि दूरदूर जाणारें खेडुतांचें जीवन मला जणूं कांहीं म्हणत होतें.

॥ सुदुर्दर्शम् इदं रूपं दृष्टवान् असि यन् मम ।
। देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ॥

---

## मी पुन्याला येनार

कु. **दया अलूरकर** प्रथमवर्ष साहित्य (क)

दरडीवरून आम्ही खालीं उतरलों मात्र, सर्वांच्या तोंडून वा ! असा उद्गार बाहेर पडला अन् धांवतच आम्ही ओढ्यांत शिरलों. डाव्या बाजूच्या एका छोटयाशा बोगद्यांतून पाणी खळाळत येत होतं. अन् आजूबाजूच्या खडकांवर फेंसाळत होतं. खडकावर उडणारे तुषार अंगावर घेण्यांत काय मजा येत होती पण ! मधूनच एखाद्या उंच खडकाला गरकन् वळसा घालून पाणी सट्‌कन पुढें जात होतं अन् खूप लांबवर संथपणें वहात होतं. एका बाजूला विस्तीर्ण, खडकाळ माळरान अन् त्यावर डोलणारी तिळाची असंख्य पिवळीं फुलें ! मी जर 'वर्ड्‌सवर्थ' असतें तर 'Daffodils' सारखी अमर कविताच लिहून काढली असती. दुसऱ्या बाजूला बाजरीचीं हिरवट-पिवळसर शेतें पसरली होतीं त्यांत मधूनच एखादं चिंचेचं झाड उंच चढलेलं दिसे.

श्रमदान करून मुली थकलेल्या होत्या. मातीच्या पाटया उचलल्यामुळें अंगावर धुळीचें थर बसले होते. पण भूमातेच्या अंगावरून वागडत येण्याऱ्या त्या छोटया ओढ्यांत उतरतांच आम्ही

अगदीं ताज्यातवान्या झालों. फेसाळत येणाऱ्या पाण्याशीं मी कितीवेळ खेळत होतें कुणास ठाऊक ! पण --

'अग ए बया, आटप बिगिबिगी कवाचं खेळतीया पाण्यांत. आजारी पडायचं हाय कां ?'

या बोलण्यानें चमकून मी बाजूला पाहिलें. एक उंचपुरी अन् घट्टीकट्टी बाई माझ्याकडे पहात उभी होती. धुणं धुण्यासाठीं पाण्यांत उतरल्यामुळें आधींच 'गेहू' कांतीच्या असणाऱ्या तिच्या पोटऱ्या अधिकच तजेलदार दिसत होत्या. विशाल भालप्रदेशावर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पसरलेला कुंकवाचा आडवा पट्टा अन् मोठे पण काळे-भोर डोळे. त्यांत एक विलक्षण चमक दिसली मला. चेहरा हंसरा अन् त्यावर भाबडेपणा ओसंडतांना दिसत होता. काचा सोडून नेसलेलं उदी रंगाचं नऊवारी पातळ अन् गौरवर्णाला शोभणारी लाल चोळी ! निसर्गानें आपल्या अंकावरच तिला वाढवली होती अन् आपलें प्रतिबिम्ब तिच्यांत उमटवलें होतें. चेहऱ्यावरील तकाकीवरून अन् उत्साही वृत्तीवरून ही बाई यौवनाचा उंबरठा अजून ओलांडून गेली नाहीं हें कुणालाहि समजलं असतं.

काय बोलावं हेंच मला समजेना मी फक्त हंसून त्यांच्याकडे पाहिलं अन् झटकन् पाण्याच्या बाहेर आलें. मग माझ्याजवळ येऊन त्या म्हणाल्या "पुन्यासनं आला व्हयं ? अन इकतं शिकश्यान् घेऊनश्यानि रस्तं कशापायि झाडतां ? अन् जेव्हां मी त्यांना आमच्या शिबिराबद्दल माहिती सांगितली अन् स्वच्छतेचें महत्त्व सांगितलं तेव्हां त्यांना आमचं खूप कौतूक वाटलं आणि 'मी येईन तुमच्या शिबिरामंदीं' असं यमुताई म्हणाल्या. हो ! विसरलें 'यमुना' त्यांचं नांव. ओढ्यावरच्या ओळखीपासून त्यांची आणि आमची इतकी गट्टी जमली कीं आम्ही त्यांना 'यमूताई' म्हणूं लागलों. अन् हो ! दुसऱ्याच दिवशीं यमूताई शिबिरांत दाखल झाल्या. मग काय ? १५ दिवसांत आमच्यांत बहिणीप्रमाणें ओढ निर्माण झाली अन् या सहवासांत आम्हांला त्यांचे अनेक पैलू पाहतां आले.

त्यांच्या डोळ्यात कसली चमक होती ठाऊक आहे ? तल्लख बुद्धीची ! कोणतंहि नवीन काम त्या चटकन् आत्मसात् करीत. शिबिराचीं नेमलेलीं कामें तर त्या इतक्या झटपट करीत कीं बाईंना 'यमूताई पुरें आतां काम ! असं म्हणायची वेळ यायची.

शिबिराला भेट द्यायला एक सन्माननीय पाहुण्या यायच्या होत्या. म्हणून स्वागतासाठीं लांबलचक आंब्यांच्या पानांचीं तोरणें आम्ही तयार केलीं होतीं. आंब्यांचीं पानें सुईंत न ओवतां त्यांचे देंठ पानांतच खोवून ती तयार केलीं होतीं. दुसरे दिवशीं 'अवं, जोशीबाय, मी बी केलंया पगा असलं तोरण, तुमचं बगुनश्यानी. चला कीं घरला,' असं यमूताईंनीं म्हणतांच मोठ्या उत्सुकतेनं आम्ही त्यांच्या घरीं गेलों. भरघोस तोरण वाऱ्याच्या झुळकीबरोबर पुढें मागें हेलकावे खात होतं.

ओढ्यावर जायचा रस्ता यमूताईंच्या घरावरून होता. ११ वाजले कीं आमच्या शिबिराची सकाळची कामें संपत अन् मुलींचे घोळके ओढ्याकडे धांवत सुटत. परंतु यमुताईंचें घर आलं कीं एक एक घोळका त्यांच्या दारापुढें थांबे अन् "यमुताई ऽ ऽ, येतांना ओढ्यावर ?" म्हणून साद घाली. मग एखाद्या घोळक्याबरोबर त्या ओढ्यावर जात. विशेषतः आमच्या 'सप्तर्षि' मंडळावर फार त्यांचं प्रेम. आंघोळ झाली असली तर एखादा कपडा धुण्या-

साठीं कां होईना, त्या पुन्हां ओढ्यावर येत, अन् मग ओढ्याचं मनसोक्त खळाळणं अन् यमूताईंची भाबडी बडबड यांचं छानदार मिश्रण होत असे !

गांवाला वेढून जाणाऱ्या या ओढ्यानें किती जणांचीं सुखदुःखें पोटांत घेतलीं असतील कुणास ठाऊक ! गांवच्या गप्पा, जावई, सासरासुनांची कुरबूर अन् दुर्दैवी स्त्रियांच्या कहाण्या, सारं सारं हा ओढा निमूटपणें ऐकत असे अन् त्यांच्या जीवनसुरांत आपला नादसूर मिसळून त्यांना साथ करीत असे. यमूताईची ' कहाणी ' याच ओढ्यावर बसून ऐकली आम्हीं. भरल्या डोळ्यांनीं त्या सांगूं लागल्या—

" धा वर्सं झालीं माज्या लग्नाला. एक पोरगा होता. पन् देवाला नाहीं पगवला. नवरा टाकून गेला मला. पांच वर्सं झालीं. ' मला मूल होणार नाय् ' म्हनुन्श्यानी त्यानं बाइल् ठेवली हाय ! मी माज्या बापाकडं राहतें. असं कसं हो झालं ? कोन हाय मला आतां ? कसं दिवस काढूं हो ऽ ?

२५ वर्षांची उमर ! ऐन तारुण्यांतलं शरीर. नवऱ्याचं सुख तर नाहींच पण मातृपदाचं सुखहि नाहीं. नवरा कसाहि असला तरी आई ' मुलाकडे ' पाहून आशा धरून–त्याच्यासाठीं जगते–पण यमूताई ऽ — साराच डाव विचित्र अन् अर्धवट झाला होता. आयुष्याचा पाव हिस्सा सरला होता अन् अजून कितीतरी वाटचाल करायची होती त्यांना—पण अगदीं एकाक्या असाहाय्य स्थितींत—

' मला कोण हाय आतां ? ' त्यांच्या या कळवळून निघालेल्या दुःखपूर्ण उद्गारानें आम्हांला गलबलून आलें. आमच्या दाटलेल्या गळ्यांतून अस्फुट आवाज बाहेर पडला ' यमूताई, आम्ही आहोंत ना ! नाहीं विसरणार तुम्हांला. ' त्यांच्या टपोऱ्या डोळ्यांतून अश्रू ओघळूं लागले. आम्हांला मिठी मारून त्या ओक्साबोक्शी रडूं लागल्या. आमच्या डोळ्यांतूनहि अश्रु धांवूं लागले अन् पाहतां पाहतां ओढ्यांत लुप्त झाले. शहरचे अन् खेड्याचे अश्रू एक झाले. भावना एकरूप झाल्या—मधलं विस्तीर्ण अंतर तुटलं अन् ते अश्रू, नव्हे, शहरच्या व खेड्यांच्या हृदयांचा मिलाफ झालेलें तें " मौक्तिक " घेऊन ओढा जलदगतीनें पुढें जात होता. आपली ठेव कुणी हिरावून घेऊं नये असं तर त्याला वाटलं नसेल ना ? आजूबाजूचीं झाडें गर्द हिरव्या नजरेनें हें मीलन पाहूं लागली. विशाल खडकांचें कठीण हृदय पाझरूं लागलें. पण सारीं स्तब्ध उभी होतीं, ही गोष्ट जगाला सांगण्यासाठींच कीं काय सूर्यमहाराज आणखीनच वर चढूं लागले —

भावनावेग ओसरला. परंतु आम्हांला एकत्र बांधून मगच ! " अवं शशीताय्. घरला चला कीं, समदं घर दाखवतें माजं " चटकन्, डोळे पुसून त्या म्हणाल्या. त्यांचा चेहरा हंसरा झालेला पाहून आम्हांला फारच आश्चर्य वाटलं. निसर्गानें त्यांना दोन मनें तर दिलीं नव्हतीं ना ? एक जगाला दाखवायचं–आनंदी मन, अन् दुसरं—होरपळलेलं ?

खेडेगांवचं घर तें, ३–४ अंधाऱ्या खोल्या होत्या. वर एक पडका माळा, ४–६ गोधड्या अन् ओव्या ऐकून थकून गेलेलं जातं ! स्वयंपाकघर मात्र व्यवस्थित होतं. एका बाजूला मडक्यांची उतरंड अन् दुसऱ्या बाजूला ओळीनें लावलेलीं चकचकीत भांडीं : मातीच्या एका कट्ट्यावर नवरात्राचे घट बसवले होते. त्यावर यमूताईंनीं केलेल्या तिळाच्या फुलांच्या पिवळ्या माळा लोंबत होत्या. दोन्ही बाजूला बाजरीचीं इवलीं इवलीं रोपटीं कोंब धरून आलीं होती. अंधाऱ्या

जागेंत उजेड पडावा म्हणून छपराचं एक कौल उडवलं होतं अन् त्या झरोक्यांतून डोकावणारीं सूर्याचीं किरणें थेट घटांवर पडत होतीं. मोठं मनोहर दृश्य दिसत होतं तें! "दसऱ्याला पुरणपोळी खायाला यायाचं बरं कां?" यमूताईंनीं आम्हांला बजावलं.

सुशिक्षित लोकच उत्तम कविता करतात असं आपण समजतों. परंतु आमच्या यमूताई बोलतां बोलतां चटकन् यमक जुळवीत अन् २–२ ओळींचीं कडवीं करीत. आपले शहरी अलंकार, सुंदर शब्द, गूढगुंजनात्मक वाक्यें त्यांत नसतील. पण भावनांचा गोडवा मात्र कुठल्याहि भावगीताच्या तोंडांत मारील असा असायचा. प्रेम, आदर, तळमळ यांनीं ओथंबलेलं भाबडं मन त्यांत प्रकट व्हायचं. आपले डोळे मोठे करून त्या एक एक चरण जुळवायच्या अन् विस्मयचकित होऊन आम्ही तो वा! वा! करीत ऐकायच्या. ' गांधींबद्दल आदर त्या गाण्यांत ओतप्रोत भरलेला असायचा. अडाणी मनांतहि प्रतिभेची भरारी किती दिसून येते. आमच्या यमूताईंना शिकण्याचं भारी वेड! बुद्धीची झेंप असून शिकतां येत नाहीं याचं फार वाईट वाटे त्यांना. "बाई, तुमच्या संग न्या की मला पुन्याला. साळंत शिकुनश्यानी मी शिकवीन समद्यांना' असें त्यांनीं उद्‌गार कांढले कीं आम्हांला वाटे 'खरंच यांना पुण्याला नेलं तर आयुष्याला दिशा लागेल. अन् नक्की त्या कुणीतरी मोठ्या होतील'. तुमच्यासारखं मी चार शब्द चावडीम्होरं बोलणार म्हणून त्या म्हणायच्या. आम्ही शिकवलेलीं गाणीं चटकन् पाठ करायच्या. आमच्या कार्यक्रमांत नाटकांत भाग घेण्याची त्यांची खूप इच्छा! पण...एकदां मात्र कसोटीचा प्रसंग आला होता.

रात्रीचे ८॥ वाजले असतील. जेवायला बसलों होतों. तोंच घाबऱ्या घाबऱ्या धांवत येथून एक मुलगी सांगूं लागली 'यमूताईंना केव्हांची फीट् आली आहे. अजून त्या शुद्धीवरच येत नाहींत. तोंडांतला घास कसाबसा गिळून अन् हातावर पाणी ओतून आम्ही यमूताईंच्या घराकडे पळत सुटलों होतों. पहातों तों त्यांची दांतखिळी बसलेली होती, अन् त्यांच्या घरच्या लोकांनीं उलथन्यानें ती उचकटल्यामुळें त्यांच्या तोंडाला खूप लागलें होतें. आमच्या एका प्रेमळ चालिकेनें मुलींना, काय करायचें तें चट्कन् सांगितलें. तत्पूर्वीच आम्ही माळावर धांवत गेलों होतों. वेखंडाची पूड, अमोनिया, अमृतांजन वगैरे औषधें आणलीं. लगेच दोन मुलीं त्यांच्या उशाशीं दोन पायापाशीं बसल्या, विटकरीनें त्यांचे हात, पाय, पोट शेकूं लागल्या. एकजण डोकें चेपूं लागली. बाईंनीं त्यांच्या नाकापुढें 'अमोनिया'ची बाटली धरली. यमूताई केव्हां डोळे उघडतात याची आम्ही वाट पहात होतों, सर्वांचे चेहरे केविलवाणे झाले होते. अन् सतत अर्ध्या तासाच्या परिश्रमानंतर त्यांनीं हलकेंच डोळे उघडले. बाईंना समोर पाहून त्यांनीं अर्धवट शुद्धींत त्यांना नमस्कार केला अन् आमच्या गळ्यांत एकदम मिठी मारली. अन् पुन्हां त्यांची शुद्ध गेली. पुन्हां चोळणें शेकणें सुरू—

मधूनमधून त्या शुद्धीवर येत. आमच्याशीं गप्पा मारीत. 'उद्यां दसरा—पुरणपोळी खायला या बरं कां!—मी उद्यां फेरीला येनार हाय!' असें म्हणायच्या. सर्वांची चौकशी करायच्या. पुन्हां मध्येंच डोळ्यांत पाणी आणून "बाई, मला पुन्याला न्या. मी येनार" म्हणायच्या. या शशीताई, यांना मी काल फुलांचीं माळ करून दिली, एक ना दोन सर्व आठवणी गोष्टीं चालूं होत्या. रात्रीं १२ वाजेपर्यंत त्यांना अशा फीट्स येत होत्या. आमचे प्रयत्न अविरत सुरू होते. डोळ्यावरची झोंप केव्हांच उडाली होती. मुली, बाई एकसारखे प्रयत्न करीत होत्या.... यमूताईनीं सर्वांचीं हृदयें काबीज केलीं होतीं. आमच्या बाईंना पण त्यांच्याबद्दल खूप वाईट वाटे. शुद्धीवर

आल्यावर यमूताई आमच्या व बाईंच्या हातानेंच दूध घ्यायच्या. घरच्या माणसांच्या हातानें नाहीं. किती हें प्रेम! स्वतः आजारी असतांना देखील त्यांनीं आतिथ्य चुकवलें नाहीं. नीट बोलतां येत नव्हतं तरी 'दोन बोटें' त्यांनीं आपल्या बहिणीला दाखवलीं. तिला कांहींच अर्थबोध होईना. मग त्या एकदम संतापल्या अन् पुन्हां बेशुद्ध पडल्या. दोन बोटें याचा अर्थ, दोन कप दूध. बाईंनीं व आम्ही दूध घेतल्याखेरीज त्या ऐकेनातच. एकीकडे यमूताई केव्हां बऱ्या होतात म्हणून आमचा जीव टांगला होता. पण दुसरीकडे त्यांच्या समाधानासाठीं आम्ही दूध नव्हे प्रेमामृत पीत होतों. सोमण तर सर्वांची लाडकी. तिला पहातांच तिच्या गळ्यांत मिठी मारून त्या अस्पष्ट आवाजांत पुटपुटल्या—

शिबिराच्या मुली लइ लइ ग्वाड !
अन् सोमण बायचं मला लागलंया याड !

सर्वांच्या डोळ्यांत पाणी तरारलें. प्रेम, आदर, अस्वस्थता सगळ्याचं मिश्रण होतं त्यांत. बारा वाजतां त्यांना झोंप लागल्यावर आम्ही एका उदात्त भावनेनें भारावून बाहेर पडलों. डोळे सारखे भरून येत होते. एकजण तर म्हणाली, "खरंच, माणुसकीचं दर्शन इथं आहे. बुद्धीची चमक सारं सारं इथं आढळलं. खेडेगांवचा एक उंबरठा चढला कीं गोष्ट–कथाच काय, पण कादंबरी निर्माण होईल. अन् त्या दिवशीं अर्धवट समाधानाच्या, गहिंवरलेल्या अन आनंदाच्या विचित्र मनःस्थितींत आम्ही झोंपी गेलों.

पंधरा दिवस कसे संपले कळलं नाहीं. यमूताईंना सोडण्याचा दिवस उजाडला. काय वाटलं आम्हांला वर्णन करून सांगतां येत नाहीं. 'याड लाऊन गेलासा. उद्यांपासून करमायचं नाय. मला–मी पन येऊं कां पुन्याला ? त्यांचीं वाक्यें आमच्या हृदयांत शिरत होतीं. अन् ओक्साबोक्शीं रडणाऱ्या त्यांना समजावतां समजावतां आम्हांलाच रडूं आलें. मोटारी निघाल्या सर्वांच्या डोळ्यांत पाणी तरारलें. अन यमूताई, तो आवडता ओढा, सर्वांना अखेरचा रामराम ठोकला. आजूबाजूला शेतें धांवत होतीं, पण पाणावलेल्या डोळ्यांपुढें फक्त उभ्या आडव्या चौकटी दिसत होत्या, अन् त्या शेतांमधून प्रतिध्वनित होणारे शब्द कानावर आदळत होते--.

"मी पुन्याला येनार !"

---

## सुखस्वप्नें

लेखक : **बबन दत्तात्रय नाईक,** इंटर आर्ट्स बी.

स्वप्नसृष्टींत विहार करण्याची मला फार वाईट संवय जडली आहे. ती संवय कांहीं आतां जात नाहीं. एकप्रकारचें व्यसनच तें, त्यामुळें मनाला क्षणभर आनंद होतो. मन प्रफुल्लित होतें.

सुखस्वप्नांचीं मधुर वलयें निर्माण करून त्या वलयांभोंवतीं पिंगा घालीत घालीत मी कुठंतरी दूर खूप दूरदूर जातों. कल्पनेच्या पंखावर बसून विविध सुखांचीं सुवासिक स्वप्नं हुंगतांना मन कसल्या तरी विचारांनीं गहिरून जातें. कल्पनेच्या हळुवार कुंचल्यानें मनांतील स्वप्न डोळ्यांसमोर चितारून त्यांत विविध सुखांच्या रंगाची मोहक शिंपण करून, त्या रम्य आल्हाददायक चित्रांकडे एकसारखे

पाहात राहिल्यामुळें डोळ्याला यत्किंचितहि शीण न होतां उलट आनंदच होतो. हृदयांतील सुप्त आशा एकदां का जागृत झाल्या कीं, त्या ह्या जगांतून निघून जातात, व अत्यंत चित्ताकर्षक अशा जगांत प्रवेश करून मनाला अनुपमेय असें सुख देतात. कल्पनेच्या कुंचल्यानें काढलेलीं तीं चित्रें डोळ्यांसमोर सारखीं तरळत रहातात. तीं विलोभनीय चित्रें पाहून डोळे तृप्त होतात. त्या सुंदर जगांत हिंडतांना, भटकतांना कांहीं निराळाच आनंद होतो. वाऱ्याच्या तरंगलहरीवर हिरव्या चाफ्याचा सुगंध येतो, व मन प्रसन्न करतो—अगदीं तसेंच कांहींसें होतें.

पण क्षणभरचें तें सुख—इंद्रधनुष्य जसें पाहतां पहातां नाहींसें व्हावें, किंवा पाण्याच्या लाटा जशा किनाऱ्यावर आपटून दूर फेकल्या जाव्यात त्याप्रमाणें—दूर कुठेंतरी फेकलें जातें. मनाच्या तरंगलहरीवरचा शांतपणा नाहींसा होऊन त्याचीं शकलें शकलें होतात; व मग अश्रूंच्या धारांनीं मन ओलेचिंब होऊन मनाळा कसली तरी हुरहूर वाटते! एखाद्या कसलेल्या चित्रकारानें रात्रंदिवस खपून अत्यंत कलापूर्ण अशी कलाकृति निर्माण करावी, फक्त शेवटचा कुंचला फिरविण्याचें काम तेवढें रहावें, आणि नकळत धक्का लागून शाईची बाटली उपडी होऊन त्या चित्राचा नाश व्हावा; तसेंच कांहींसें या सुखस्वप्नांच्या बाबतींत होत असतें.

आणि व्यवहाराच्या ह्या जगांत मनानें प्रवेश केला कीं जिकडे तिकडे नैराश्याचे लोट, दुःखांचे डोंगर व अश्रूंचा पूर दिसूं लागतो. भोंवतालचें वातावरण धूसर दिसतें. हेवेदावे, टवाळी, गरिबांची पिळवणूक, भाकरीच्या तुकड्यासाठीं आक्रोश—ह्या व असल्याच दृश्यांनीं मन कसं व्यथित होतं, व डोळे पुनः पुन्हां भरून येतात. टीचभर पोटाची भूक शमविणारी, फाटक्या संसाराला पुनः पुन्हां टांके घालणारीं माणसं आणि त्यांचे कष्ट पाहिले कीं मन पिळवटून येतं. जीवनांतील कटू अनुभवाचें दर्शन होऊन मन पुनःपुन्हां पाठीमागील हिरवळीवर उड्या घेतें. व त्याकाळचें क्षणैक सुख आठवून, त्या मधुर स्मृतींना बंदिस्त करून सुख उपभोगतें, तर केव्हां केव्हां तें दूर दूर भटकत जातें व सुखस्वप्नांच्या पाठीमागें पळून क्षणभर आनंद मिळवितें.

मृगजळाप्रमाणें हीं सुखस्वप्न असलीं तरी त्यामुळें मनाला केवढा विरंगुळा वाटतो, नाहीं!

---

# काव्य-कुंज

## सांगितल्याविण तुज उमगावें

चन्दा मराठे, सी. बी. ए.

अध्याहृताचे झांकुन डोळे—
आली होतिस अवचित सदनीं—
भटकत होतों तुलाच शोधित—
कलंदरासम मींहि त्या क्षणीं !

धुक्यांत जळत्या अकल्पिताच्या—
कितीक दंवबिंदू जमवावे—!
तुझ्याकडे येण्या शब्दांनीं—
पंख कितिकदां अन् पसरावे ?

पेंगत पेंगत घुमती नुसते—
होउन आतां शब्द पारवे—
असें वाटतें आणि आतांशा—
सांगितल्याविण तुज उमगावें ! !

———

## —* कृष्णार्पण *—

कमलबेन चितळे सी. बी. ए.

सोडुनी जगाची मायानगरी मोठी
चल दूर साजणी, दूरच रानोमाळीं
मांडून गरिबिची दौलत ओढ्याकाठीं
संतोषें येथें वास्तुदेवता वसली.
मम संसाराचें निंबोणीचें झाड
तूं चंद्रमुखी हांससी तयाच्या आड
तव गौर पाउलें लक्ष्मी उधळित आलीं
अन् ओठामध्यें अमृतबोली भरली
तुज सदा आवडे मेघ निळा आकाशीं
जो हितगुज करितो निळया निळ्या शिखराशीं
निलवर्णी डोळे तुझे भारुनी गेले
मज ब्रह्मांडीचे त्यांत पसारे दिसले
तूं देवदर्शना जासी रम्य सकाळीं
न्हाउनी रेखिलें कुंकू लाल कपाळीं
चमकती रेशमी कुंतल काळे मृदुला
सळसळे भासला गर्भ रेशमी शेला
अभिमानें लेउन काळी पोत मण्यांची
जागुनि राखसी नीति पतिव्रतेची
माध्यान्हीं येतां अतिथी दारापाशीं
हे शुभान्नपूर्णे, लाख दुवे तुजपाशी
दिनभरी थकुनियां सायंकाळीं यावें
तुजपाशी अवघ्या सुखदुःखां सांगावें
मग अंगणिं प्रेमळ पिता विधू ग येतो
कौतुकें तोंडभर आशीर्वादा देतो
तूं ज्ञानेशाची ओवी मंजुळ गावी
मी अर्थ सांगुनी नयनें तव भिजवावी
जोडुनी करांना स्मरुनी सारीं कर्में
'कृष्णार्पण' करुं या जीवन नत भावानें

पॅसेंजर गाडींत अगदीं ऐसपैस खिडकीशेजारीं जागा मिळाली. गाडीच्या गतीशीं—मनाच्या गतीहि एकरूप झाल्या. आणि त्या गतींत, त्या लयींतः—

## एक सहजस्फूर्त साक्षात्कार झाला

सुधाकर इनामदार, एफ्. वाय्. आर्टस् 'ए'

वेग घेउनि गाडी निघाली
पुढे पुढे नव मार्ग आक्रमित ॥ ध्रु ॥
मित्र जिवाचे
हळु हृदयाचे
भाव लपविती
जणु विरहाचे
विरहा साहुनि भरल्या हृदयीं —पुढे पुढे... १
दृष्टिआड जरि
झाल्या काया
परि अनुसरते
वेडी माया
वेडी माया सवें घेउनि—पुढे पुढे... २
हिरवी पिवळी
सृष्टी नटली
कणाकणाने
जणु मोहरली
मोहरलेली किमया दावित—पुढे पुढे... ३
उजाड रानें
मधुनि दिसती
खडक कोरडे
पिसाट हंसती
पिसाट सारे मागे टाकुन—पुढे पुढे... ४
कुठे उन्नती
कधीं अवनती
मार्ग सारखे
बदलत असती
अंतिम ध्येया पुढे ठेउनि—पुढे पुढे... ५
सुख-दुःखाचे
डोंगर सखया
शिकवित गाडी
पार कराया
जीवन जगण्या शिकवित मनुजा—पुढे पुढे... ६

---

## क्षणाचें महत्त्व

नि. ह. वायकोळे. एफ्. वाय्. सायन्स [सी]

क्षण एकच वाटे व्यर्थ परी
मोल तयाचें किती तरी ॥ ध्रु ॥
क्षणांत पुत्रा प्रसवी माता
दाखवितो जो सुमार्ग जगता
लोक जयाची गाति श्रेष्ठता
अमोल घटना खरोखरी ॥ १ ॥
क्षणांत एका हार फुलांचा
गळ्यांत पडतो वधू–वरांच्या
संगम दो जीवन–धारांचा
मोल क्षणाचें कोण करी ! ॥ २ ॥
क्षणांत एका निघुनी जाती
इहलोकांतुनि थोर विभूति
जिवलगहि वा प्रिय सांगाती
जीवनिं क्षण चिरविरह करी ॥ ३ ॥
क्षणाक्षणानें जीवन बनतें
क्षणाक्षणाला वस्तु बदलते
क्षणोक्षणीं गति पुढची मिळते
उदयास्ताची असे जरी ॥ ४ ॥

---

## एक संवाद

शरद् घाटे, इंटर आर्ट्स 'ए'

सुनीत

एका कृष्णदिनीं दिनांतसमयीं पाहूनिया तारका
झाली शंकित एक मुग्ध ललना; नाथास हें बोलली :
" येती रोज बहू सुहासवदना या तारका अंबरी
क्रीडा त्या करिती सतेजनयना जाती कुठें नंतरी ?
तैसे जीव जगीं असंख्य जगती, हा त्यांतला मानव
' मी–माझे ' म्हणुनी बहू झगडतो, थोडें मिळेंही यश.
कां हें भांडण, वैर, युद्ध अथवा स्वार्थीपणा या जगीं ?
सारें हें यश पूर्ण जाय विरुनी जेव्हां जिवात्मा मृत."
बोले तो फुललें अखंड नभ हें या तारकांनीं परी
जातां संपुन चांदरात, विझती हे सर्व तेजोकर
दिवसाचा पसरून भव्य पडदा होतो जगा विस्मर
तैसी मानवजात रोज उपजे जाते लया सर्वही
काळाच्या लपते पहा पलिकडे हें मानवी जीवन,
विज्ञानांतील तत्त्वः— ' नाश नसुनी साधेंच स्थित्यंतर.'

---

# विज्ञान विभाग

## हैड्रोजन बॉम्ब व त्याचे परिणाम

लेखक : **ग. वि. कुलकर्णी.** सी. बी. एस् सी.

६ ऑगस्ट १९४५ ! सकाळीं ८ वाजण्याचा सुमार होता तो ! अशा त्या प्रशांत समयीं अमेरिकन विमानांनीं ३० हजार फूट उंचीवरून जपानमधील हिरोशिमा नांवाच्या व्यापारीदृष्ट्या प्रसिद्ध असलेल्या शहरांवर पहिला अणुबॉम्ब टाकला. तीनच दिवसांचा कालावधि लोटला आणि जपानी लोकांना तशाच प्रसंगाला पुनः तोंड द्यावें लागलें. अमेरिकन विमानांनीं आणखी एक अणुबॉम्ब औद्योगिक प्रगतींत नाणावलेल्या नागासकी शहरांवर टाकला. या दोन्ही हल्ल्यांत जपान्यांची अतिशय हानि झाली. हिरोशिमामधील ४ चौरस मैलांचा टापू उध्वस्त झाला; व अदमासें ८० हजार माणसें मृत्युमुखीं पडलीं. तीच गोष्ट नागासकीची ! जवळ जवळ १॥ चौ. मैलांचें क्षेत्र बेचिराख झालें. आणि ४० हजार माणसांचा संहार झाला. जपानी पुढाऱ्यांना राष्ट्र जगतें कीं मरतें याची काळजी वाटूं लागली. दुसऱ्या महायुद्धाचें पारडें फिरलें. जपान्यांचा पराभव झाला, व युद्ध थांबलें.

युद्धसमाप्तीनंतरहि अमेरिकन शास्त्रज्ञांनीं अणुसंशोधनाचें कार्य चालूं ठेवलें, व त्यांतूनच त्यांना एका महान् अस्त्राचा शोध लागला. ते अस्त्र म्हणजेच 'हैड्रोजनबॉम्ब'! १९५२ मध्यें ऐन्टवर्क बेटांवर या पाशवी अस्त्राच्या अजस्र शक्तीची चुणूक जगाला दिसून आली, आणि तें बेट महासागराच्या उदरांत गडप झालें. १ मार्च १९५४ या दिवशीं मार्शल बेटांवर पुन्हां तोच प्रयोग करण्यांत आला व अणुबॉम्बच्या ७५० पट हा स्फोट भयंकर होता. अशा या अस्त्राच्या भयंकर शक्तीची कल्पना करतां, साहजिकच मनांत येतें कीं, 'हायड्रोजन बॉम्ब म्हणजे आहे तरी काय?'

यासाठीं कांहीं प्राथमिक गोष्टी माहीत असणें आवश्यक आहे. १८०३ सालीं डाल्टन् या शास्त्रज्ञानें 'कोणताहि पदार्थ लहान लहान कणांचा बनलेला असतो' हें दाखवून दिलें. याच लहान कणांना त्यानें 'परमाणु' असे संबोधिलें. [ Greek :- atom can't be cut. ] आतां, एकाच मूलद्रव्याचे दोन अथवा दोनांपेक्षां जास्त परमाणु जवळ आले असतां किंवा निरनिराळ्या द्रव्याचे परमाणु एकत्र आले असतां जो कण तयार होतो, त्यांस 'अणु' ( Molecule ) म्हणतात. २० व्या शतकांत शास्त्रज्ञांनीं आणखी कांहीं पावलें पुढें टाकलीं, व 'परमाणु हे लहान लहान

कणाल्पकांचे बनलेले असतात' हें सिद्ध केलें. मुख्यत्वेंकरून हीं अल्पकें प्रोटॉन, व इलेक्ट्रॉन हीं होत. ज्याप्रमाणें सूर्यमालेंत सूर्य केन्द्रस्थानीं असतो, व इतर ग्रह त्याभोंवतीं फिरत असतात त्याप्रमाणें परमाणूंत प्रोटॉन व न्यूट्रॉन केन्द्रस्थानीं असून त्यासभोंवतीं निरनिराळ्या कक्षेंत इलेक्ट्रॉनस् फिरत असतात.

अमेरिकेमध्यें असलेल्या अणुशक्ति कमिशनमधील शास्त्रज्ञांनाच फक्त हायड्रोजन बॉंबची माहिती आहे. [आतां इतरहि दोन बलाढ्य राष्ट्रांनीं आपण हा बॉम्ब तयार केल्याचें जाहीर केलें आहे.] त्या देशांतील कायद्यामुळें तेथील शास्त्रज्ञ हे गुपित फोडूं शकत नाहींत. बाहेरील राष्ट्रांतील शास्त्रज्ञांना स्वतःच्या संशोधनावर व अणुशक्ति कमिशनमधून मिळणाऱ्या माहितीवरच या बॉम्बचें चित्र रेखाटणें प्राप्त आहे. आतां आपण या चित्राचें साधारण स्वरूप काय आहे तें पाहूं!

हायड्रोजन बॉम्बचे मुख्य तत्त्व म्हणजे "न्युक्लीअर एनर्जी"! हलक्या मूलतत्त्वांच्या संयोजनांतून ही शक्ति प्राप्त होते. १९३२ सालीं केंब्रिज विद्यापीठांतील विज्ञान-शास्त्रज्ञ जॉन-डी-कॉकक्रॉफ्ट व जे. एस्. वाल्टन् यांनीं संयोजनशक्तीचा अभ्यास करण्याकरितां हायड्रोजन न्युक्लीअसूचा (प्रोटॉनस्) लिथीयमन्युक्लीअरवर मारा केला; व फारच थोडे हायड्रोजन प्रोटीनस् लिथीयमवर आपटतात, असें त्यांना आढळून आलें. या ठिकाणीं बरीचशी शक्ति मुक्त होते. त्याचप्रमाणें हायड्रोजनसारख्या सर्वांत हलक्या मूलतत्त्वाचें अणु जर एकत्र आणले व त्यांचा एक मोठा अणु तयार केला, तर ह्या संयोजककृतींत अणूंचें कांहीं वजन कमी झालेलें आहे असें दिसून येतें. आतां ज्याप्रमाणें संयोजनापासून शक्ति मुक्त होते, त्याप्रमाणें अणू विभाजनापासूनहि शक्ति मुक्त होते. आतांपर्यंत पृथ्वीवर ९२ मूलतत्त्वांचा शोध लागलेला आहे. हीं सर्व मूलतत्त्वें जर त्यांच्या वजनाप्रमाणें एका रांगेंत ठेविली, तर ह्या रांगेच्या मध्यावरील मूलतत्त्वाचें वजन 'जेवढें असावयास पाहिजे' त्यापेक्षां कमी भरत असल्याचें शास्त्रज्ञांना आढळून आलें. युरेनियम हें तर सर्वांत जड. त्याच्या परमाणूचे दोन तुकडे केले, तर त्यांचें वजन मूळ परमाणूंच्या वजनांपेक्षां कमी भरूं लागलें. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आईन्स्टाईन ह्यांच्या 'रिलेटिव्हिटीच्या' सिद्धान्ताप्रमाणें हें जें वजन कमी भरतें, तेवढ्या वजनाची शक्ति ह्या विभाजनांत युरेनियमच्या परमाणूपासून मुक्त झालेली असते.' अणुबॉंबमध्यें ही शक्ति अणूंच्या विभाजनांतून निर्माण होते, तर हायड्रोजन बॉंबमध्यें अणूंच्या संयोजनापासून ही शक्ति मुक्त होते.

पृथ्वीमध्यें युरेनियमपेक्षां हलक्या मूलद्रव्यांचा सांठा भरपूर आहे; व त्यापासून मिळणारी शक्तीहि निश्चितपणें अधिक आहे, हें शास्त्रज्ञांना कळलें होतें, पण हें संयोजन कसें करावयाचें हा एक मोठा प्रश्न होता. पण कितीही झालें तरी 'जगाला तारणारे किंवा मारणारे' शास्त्रज्ञच ते! असल्या अडचणींना ते थोडीच भीक घालणार! प्रयोगांतीं त्यांना असें आढळलें कीं अशा प्रकारच्या संयोजनास उष्णतेची जरूरी असते. एकादी वस्तु तापविली असतां, तिच्यांतील अणू अधिकाधिक वेगानें फिरूं लागतात; व तीच वस्तु खूप तापविली तर तिच्यांतील अणू जोरानें फिरूं लागून एकमेकांवर अतिशय जोरानें आपटतात; व मग त्यांच्या संयोगानें मोठे अणु तयार होतात; व ह्या संयोजनांतूनच शक्ति निर्माण होते. आतां एवढी उष्णता निर्माण करण्याकरितां इंधनहि फार लागणार! रासायनिक साधनांनीं निर्माण होणारी उष्णता ही या कामीं फारच अपुरी! मग ह्या गोष्टीला आवश्यक असलेली उष्णता कोठून मिळवावयाची? शास्त्रज्ञांनीं हें कोडें देखील सोडवलें, व

अणुबॉम्बच्या स्फोटांतच ही उष्णता मिळते असें सिद्ध केलें. ५ कोटी सेंटिग्रेड एवढी भयंकर उष्णता या स्फोटांत निर्माण होते. [ ही उष्णता सूर्याच्या अंतर्भागांतील उष्णतेपेक्षांहि अधिक असावी, असा तर्क आहे. हायड्रोजन बॉम्बचा स्फोट करण्याकरितां शास्त्रज्ञांनीं या उष्णतेचा उपयोग करण्याचें ठरविलें. अणुबॉम्बचा स्फोट होतांच एक अग्निगोल ( Fire-ball ) तयार होतो. त्याचें उष्णतामानहि अतिशय असतें. मात्र स्फोटानंतर लगेंच तो प्रसरण पावूं लागतो व त्यांतील उष्णता हळूं हळूं कमी होऊं लागते. ही उष्णता हायड्रोजन अणूंचे संयोजन करण्यास पुरेशी आहे. मात्र यावेळीं अग्निगोलांतील उष्णता हळूं हळूं कमी होत जाते; व हें संयोजनहि बंद पडूं लागतें. शास्त्रज्ञांपुढें पुन्हां एक नवीन प्रश्न उभा राहिला ! व तो म्हणजे ही संयोजन-क्रिया सतत चालू ठेवणें ! त्याकरितां त्यांनीं नवीन अणुबॉम्बस् तयार केले. ते बराच काळपर्यंत उष्णता देऊं शकतात.

आतां कोणकोणत्या हलक्या मूलतत्त्वांचा उपयोग हायड्रोजन बॉम्बमध्यें करण्यांत आला तें पाहूं. लिथियम्, हायड्रोजन व ड्युटेरियम ह्यांचें संयोजन होण्यास बऱ्याच कालपर्यंत टिकणाऱ्या उष्णतेची आवश्यकता भासूं लागली. एवढी उष्णता पहिल्या प्रथम तयार केलेल्या अणुबॉम्बमध्यें मिळेना; त्याचप्रमाणें ह्या संयोजनाला खर्चहि फार येऊं लागला; म्हणून ट्रिटियम व ड्युटेरियम् ह्यांचें मिश्रण तयार केलें. ह्या संयोजनाला उष्णता कमी असली तरी चालते. ह्या संयोजनापासून हेलियम् व न्युट्रॉन तयार होतात व ते अधिक शक्तींही देतात. ट्रिटियम हें द्रव्य नैसर्गिक अवस्थेंत सांपडत नाहीं. तें कृत्रिम रीतीनें तयार करावें लागतें. त्याकरितां पूर्वी ' साल्व्हेना रिव्हर प्लॅन ' ( किंमत अदमासें १·५ लाख डॉलर्स ) तयार करण्यांत आलें होतें. परंतु पृथ्वीतलांवरील यःकश्चित् माणसें मारण्याकरितां एवढा खर्च ! छेः छेः-तें शक्य नाहीं. म्हणून शास्त्रज्ञांनीं लिथियम हायड्राईड व ड्युटेरियम् ही स्वस्त व भरपूर प्रमाणांत असणारीं मूलतत्त्वें वापरण्यास सुरवात केली.

या हायड्रोजन बॉम्बचे प्रकार दोन आहेत. एक 'ओला' व दुसरा 'सुका' ऐन्टवर्क बेटांवर झालेला स्फोट हा बहुतेक 'ओल्या' बॉम्बचा असावा. ओल्या बॉम्बमधील सुरुंग द्रवस्थितीतील ड्युटेरियम व ट्रिटियम ह्यांचा असतो. त्यांची रासायनिक क्रिया ताबडतोब होते, व त्यामुळें उष्णतामानहि वाढतें. या संयोजनामुळें शक्ति मुक्त होते, परंतु हे बॉम्बस् व्यवहारांत फारसें उपयोगांत आणतां येत नाहींत. ते फार अवजड असतात. ड्युटेरियम् व ट्रिटियम् यांना द्रव-स्थितींत ठेवण्याकरितां प्रचंड दाबाची आवश्यकता असते. तें आकारानें फार मोठें असल्यानें त्यांची विमानांतून वहातूक करणें त्रासदायक असतें. १९५२ मध्यें ज्या बॉम्बचा स्फोट करण्यांत आला तो 'ओला' होता, व त्याचें वजनहि ६५ टन होतें.

मार्च १९५४ मध्यें स्फोट झालेले बॉम्बस् मात्र 'सुके' होते. त्यामुळें लिथियम हायड्राईड व ड्युटेरियम् हीं द्रव्यें वापरलेलीं होतीं व त्यापासून हेलिथियम्चे दोन अणू व बरीच शक्तीहि मिळते. बॉम्बस् वहातुकीस सोपे असतात; व त्यांना प्रचंड दाब किंवा ठराविक उष्णतामान यांची आवश्यकता भासत नाहीं.

हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांत अनेक गोष्टी घडून येतात. परंतु त्या सर्वांचा या ठिकाणीं साकल्यानें विचार करतां येणार नाहीं. आतां आपण या बॉम्बच्या परिणामासंबंधीं थोडासा विचार करूं या. ह्या बॉम्बचा स्फोट हिरोशिमांवर टाकलेल्या अणु-बॉम्बपेक्षां जवळ जवळ ७५० पट

भयंकर होता. आज अणुबॉम्बच्या स्फोटानें नुकसान झालेल्या प्रदेशाचे आंकडे उपलब्ध आहेत. नुकसानीची कल्पना येण्याकरितां ते या ठिकाणीं दिले तर अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें.

| नुकसान झालेल्या प्रदेशाचें अंतर | लोकांचें मृत्यु प्रमाण |
|---|---|
| ० ते १/४ मैल | ९५ %. |
| १/४ ते १/२ ,, | ८५ %. |
| १/२ ते ३/४ ,, | ५८ %. |
| ३/४ ते १ ,, | ३५ %. |
| १ ते १ १/२ ,, | १३ %. |
| १ १/२ ते २ १/२ ,, | १/२ %. |

सरकारीरीत्या प्रसिद्ध झालेले तें आंकडे वाचले म्हणजे अंगावर शहारे येतात! यावेळीं ७८१५० माणसें हिरोशिमांत मारलीं गेलीं तर १३९८३ लोकांचा थांगपत्ता लागत नाहीं. १५,००० निरपराधी शाळकरी पोरें प्राणांस मुकलीं. विद्युत्, तारायंत्र, टेलिफोन, टेलिग्रॅम्स्, वॉटर पंपिंग स्टेशन, रेल्वेजस्, सरकारी इमारती, वगैरेंचें फार मोठ्या प्रमाणांवर नुकसान झालें. यामुळेंच जपाननें तात्बडतोब शरणागती पत्करली व दोस्त राष्ट्रांचा विजय होऊन यशोदेवतेनें त्यांच्या गळ्यांत माळ घातली.

